नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : १८० | किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




शनिवार, दि. ०६ जून २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

# शिवस्मारकाचा विसर; अरबी समुद्रातील प्रकल्प कागदावरच?

मुंबई : (स. गांवकरी)

महाराष्ट्राच्या अस्मितेशी जोडला गेलेला मुंबई जवळील अरबी समुद्रात १६ हेक्टर समुद्र जागेवरील छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य अश्वारूढ स्मारक प्रकल्प गेल्या दशकभरापासून प्रत्यक्षात न येता केवळ कागदावरच असल्याची टीका होत आहे. मुंबई नवी मुंबईला जोडणारा अटल सेतू समुद्र प्रकल्प काही वर्षात पूर्ण झालेला असताना हे स्मारक न्याय प्रक्रियेत अडकले आहे. महायुती सरकारने निवडणुकीत केलेल्या घोषणे प्रमाणे २८ फेब्रुवारी २०१४ रोजी या प्रकल्पासाठी मुंबई जवळील अरबी समुद्रात ओहोटी मध्ये दिसणारी आणि भरती मध्ये पाण्याखाली जाणारी १५.९६ हेक्टर जागा निश्चित करण्यात आली. राजभवन पासून १.२, गिरगाव चौपाटी पासून ३.६ आणि नरिमन पॉईंट पासून २.६ किलोमीटर अंतरावर ही जागा निश्चित



करण्यात आली. समुद्र प्रकल्पासाठी लागणाऱ्या १२ केंद्रीय व राज्य स्तरावरील परवानग्या देखील सार्वजनिक बांधकाम विभागाने मिळविल्या. हा प्रकल्प लवकर व्हावा यासाठी तीन वेगवेगळ्या समित्या स्थापन करण्यात आल्या.

दिवंगत माजी आमदार विनायक मेटे यांच्या अध्यक्षतेखाली एक समन्वय समिती स्थापन करण्यात आली. त्यांच्या अकाली निधनानंतर त्या समितीची पुनर्स्थापना करण्यात आली नाही. मेटे यांना दोन्ही सभागृहात श्रद्धांजली वाहताना हा प्रकल्प लवकर होणे हीच मेटे यांना खरी श्रद्धांजली ठरेल, असे अनेक सदस्यांनी सांगितले. इजिस इंडिया कन्सल्टिंग प्रायव्हेट लिमिटेड व डिझाईन असोसिएट्स यांची सल्लागार म्हणून निवड करण्यात आली. त्यासाठी त्यांना ९४ कोटी ७० लाख रुपये त्यांना शुल्क देण्यात आले. २४ डिसेंबर २०१६ रोजी या प्रकल्पाचे जलपूजन मोठा गाजावाजा करून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्यात आले.

निविदेच्या पहिल्या टप्प्यात ७.१ हेक्टर एवढ्या जागेवर जागतिक दर्जाचे छत्रपती शिवाजी महाराजांचे सर्वात उंच असे २१० मीटर स्मारक बांधण्याची निविदा काढण्यात आली. या स्मारकात क्षेत्रात आर्ट म्युझियम, प्रदर्शन गॅलरी, समुद्र भिंत, ब्रेक वॉटर, प्रवासी जेटी, वेगळी व्हीआयपी जेट्टी, हेलीपॅड, तुळजाभवानी मंदिर, दहा रुग्ण शय्याचे हॉस्पिटल, उच्च दर्जाची सुरक्षारक्षक त्यांची निवासस्थाने, आयमॅक्स इत्यादी बाबींचा समाविष्ट करण्यात आला. फेब्रुवारी २०१७ मध्ये या कामाची ऑनलाइन निविदा प्राप्त झाल्या. तीन पैकी दोन निविदाकार अपात्र ठरल्याने लार्सन अँड टुब्रो लिमिटेड या बांधकाम कंपनीला ३८२६ कोटी रुपये खर्चाची निविदा स्वीकारण्यात आली.

तडजोडीनंतर २५२१ कोटी रुपये खर्चाचे हे काम करण्यासाठी २८ जून २०१८ रोजी लार्सन अँड टुब्रो बरोबर एक करार करण्यात आला. त्यानुसार कंत्राटदारा तर्फे समुद्राचे सर्वेक्षण करण्यात आले. या प्रकल्पासाठी एकूण ५० भूस्तर बोर मारली जाणार होती त्यापैकी २६ बोर मारण्यात देखील आल्या. कामाला सुरुवात झाल्यानंतर प्रकल्पाच्या विरोधात मुंबई उच्च न्यायालयामध्ये दोन वेगवेगळ्या जनहित याचिका दाखल करण्यात आल्या.

प्रकल्पाचे काम बंद करण्याची याचिकाकर्त्यांनी केलेली मागणी मुंबई उच्च न्यायालयाने अमान्य केली. त्या विरोधात याचिकाकर्तेनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. सर्वोच्च न्यायालयाने या प्रकल्पाचे काम सुरू करण्यात येऊ नये असे तोंडी आदेश दिले. न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी सरकारन १४ जानेवारी २०१९ रोजी काम थांबवण्याचे आदेश एल अँड टी ला दिले.

> हे प्रकरण न्याय प्रविष्ट आहे. मुंबई उच्च न्यायालयात सरकारच्या वतीने बाजू मांडली जात आहे. न्यायालयाने परवानगी दिल्या नंतर या प्रकल्पा बाबत सरकार निर्णय घेईल.
> **– आबासाहेब नागरगोजे, प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग.**

# क्लस्टर प्रकल्प महाप्रीतकडून एमएसआरडीसीकडे वर्ग

## *क्लस्टर प्रकल्पांना प्राधान्यक्रमातील सार्वजनिक गृहनिर्माण प्रकल्पाचा दर्जा*

ठाणे : (स. गांवकरी)

ठाणे शहरातील क्लस्टर पुनर्विकास प्रकल्पाला गती मिळावी यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मोठा निर्णय घेतला आहे. महाप्रीतकडून प्रकल्पाची धुरा एमएसआरडीसीकडे सोपविण्याबरोबरच क्लस्टर प्रकल्पांना प्राधान्यक्रमातील सार्वजनिक गृहनिर्माण प्रकल्पा (व्हायटल पब्लिक हौसिंग प्रोजेक्ट) चा दर्जा देण्याची घोषणाही त्यांनी केली. एमआयडीसीची ६०.७२ हेक्टर जमीनही पुनर्वसनासाठी तातडीने हस्तांतरित करण्याचे निर्देश त्यांनी दिले आहेत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे ठाणे समुह विकास प्रकल्पाबाबत आढावा घेतला. यावेळी उपमुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव असीम गुप्ता, प्रधान सचिव



नवीन सोना, ठाणे महानगरपालिकेचे आयुक्त सौरभ राव, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. वेलारासु आणि सबंधित विभागाचे प्रमुख अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते. प्रकल्पाला अधिक गती देण्यासाठी आणि पायाभूत सुविधांचा मोठा अनुभव लक्षात घेता, हा प्रकल्प आता 'एमएसआरडीसी'कडे सोपवण्याचा निर्णय शिंदे यांनी बैठकीत घेतला. महाप्रीत कडून एमएसआरडीसीकडे हा प्रकल्प वर्ग करण्यासाठी जी कायदेशीर आणि प्रशासकीय प्रक्रिया आवश्यक आहे, ती विनाविलंब आणि तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश त्यांनी प्रशासनाला यावेळी दिले. ठाणे समुह विकास प्रकल्प हा देशातील पहिला भव्य समूह विकास प्रकल्प आहे. ठाणे शहराचा हा समूह विकास प्रकल्प नागरिकांना सुरक्षित आणि हक्काची घरे मिळवून देणारा ठरेल. हा केवळ एक गृहनिर्माण प्रकल्प नसून, नागरिकांचे जीवनमान उंचावणारा समूह विकास प्रकल्प आहे, असे शिंदे यांनी सांगितले.

# मराठा समाजाला ८ योजनांमध्ये सवलती

मुंबई : (स. गांवकरी)

मराठा समाजाच्या आर्थिक आणि शैक्षणिक प्रगतीसाठी फडणवीस सरकारनं एक अत्यंत महत्त्वपूर्ण आणि मोठा निर्णय घेतला आहे. आता इतर मागासवर्गीय समाजाप्रमाणेच मराठा समाजातील विद्यार्थ्यांनाही सर्व शैक्षणिक सवलती आणि सोयी-सुविधा लागू करण्याचा ऐतिहासिक निर्णय शासनानं घेतला आहे.

शासनाने घेतलेल्या या निर्णयानुसार, ओबीसी प्रवर्गाच्या धर्तीवर मराठा समाजासाठी तब्बल 8 विशेष योजना सुरू करण्यात येणार आहेत. यामुळे मराठा समाजातील हजारो विद्यार्थ्यांना उच्च आणि व्यावसायिक शिक्षणासाठी मोठा आर्थिक दिलासा मिळणार आहे. या महत्त्वपूर्ण योजना नेमक्या कोणत्या आहेत, त्याची सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे. मराठा समाजातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक



प्रवाहात सक्षम करण्यासाठी शासनाने लागू केलेल्या योजनांचा तपशील खालीलप्रमाणे आहे:

शालांत परिक्षोत्तर शिष्यवृत्ती : दहावीची परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर पुढील उच्च शिक्षणासाठी ओबीसी विद्यार्थ्यांना मिळणारी शालांत परिक्षोत्तर शिष्यवृत्ती योजना आता मराठा समाजाच्या विद्यार्थ्यांनाही लागू होईल.

वाहन चालक व वाहक प्रशिक्षण : मराठा समाजातील तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी विशेष मोटार वाहन चालक व वाहक प्रशिक्षण योजना सुरू करण्यात येणार आहे.

## थोडक्यात...



### तुकाराम मुंढे यांच्या रडारवर आता वडापाव व्यावसायिक?

मुंबई (स. गांवकरी) : मुंबईतील एका प्रसिद्ध वडापाव विक्रेत्याकडून अन्न पॅक करण्यासाठी (बांधण्यासाठी) आणि वाढण्यासाठी वर्तमानपत्राचा वापर केला जात असल्याचे अलीकडेच निदर्शनास आल्याच्या पार्श्वभूमीवर, भारतीय अन्न सुरक्षा आणि मानके प्राधिकरण (एफएसएसएआय, पश्चिम क्षेत्र) आणि बृहन्मुंबई महानगरपालिका (एमसीजीएम) यांनी संयुक्तपणे कारवाई केली. या शिवाय एफएसएसएआय नवे दिशानिर्देश जारी केले आहेत. तसेच एफएसएसएआय आणि एफडीआय एकत्र काम करणार आहेत. त्यामुळे वडापाव व्यावसायिक मुंढे यांच्या रडारवर आले आहेत. शहर आणि परिसरात अशा प्रकारच्या घटना पुन्हा घडण्याची शक्यता लक्षात घेऊन, एफएसएसएआय (पश्चिम क्षेत्र) ने अन्नपदार्थ विक्रेत्यांना निर्देश दिले आहेत की, त्यांनी अन्नपदार्थ बांधण्यासाठी किंवा वाढण्यासाठी, तसेच इतर कोणत्याही प्रकारे अन्नाचा थेट संपर्क येईल अशा गोष्टींसाठी वर्तमानपत्रांचा वापर बंद करावा.

### पुणे, लातूर केंद्रावर विशेष लक्ष ठेवा

मुंबई (स. गांवकरी) : 'राष्ट्रीय पात्रता व प्रवेश परीक्षा' (नीट) देणाऱ्या राज्यातील विद्यार्थ्यांसाठी पारदर्शक आणि तणावरहित वातावरण असावे. सर्व यंत्रणांनी सतर्क राहून परीक्षा केंद्रांवर आवश्यक उपाययोजना करून कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार होऊ नये, यासाठी अधिक दक्षता घ्यावी. पुणे आणि लातूर केंद्रावर विशेष लक्ष केंद्रीत करण्याचे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी दिले. नीट परीक्षेच्या पूर्व तयारीसंदर्भात आयोजित बैठकीत फडणवीस बोलत होते. गृह विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा म्हैसकर, पोलीस महासंचालक सदानंद दाते, मुख्यमंत्री कार्यालयाचे अप्पर मुख्य सचिव लोकेश चंद्रा, प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी, राज्य गुप्तचर विभागाचे आयुक्त शिरीष जैन, वैद्यकीय शिक्षण विभागाचे सचिव धीरज कुमार, महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा (सीईटी) कक्षाचे आयुक्त दिलीप सरदेसाई, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव बी. वेणुगोपाल रेड्डी, सहसचिव संतोष खोरगडे, राज्य सूचना विज्ञान अधिकारी सपना कपूर, तसेच संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते.






# थोडक्यात पण महत्वाचे



## भुंगाऱ्यांच्या नियंत्रणासाठी प्रकाश सापळे लावणे फायदेशीर - चव्हाण

आळेफाटा (स. गांवकरी) : उसातील हुमणी किडीच्या नियंत्रणासाठी पहिल्या पावसानंतर शेतात प्रकाश सापळे लावावेत, असे आवाहन विघ्नहर साखर कारखान्याचे तज्ज्ञ संचालक व 'आत्मा' सदस्य विकास चव्हाण यांनी केले आहे. पहिल्या पावसानंतर बाहेर पडणारे हुमणीचे भुंगेरे संध्याकाळी ७ ते ११ दरम्यान प्रकाशाकडे आकर्षित होतात. यावेळी शेतात बल्बखाली पाण्याने भरलेले टप ठेवल्यास भुंगेरे त्यात पडून मरतात. एक मादी ६० अंडी घालते, त्यामुळे एक भुंगा पकडला म्हणजे ६० अळ्या रोखल्या जातात. हा उपाय बिनखर्चिक व पर्यावरणपूरक आहे.शेतकऱ्यांनी पकडलेले भुंगेरे विघ्नहर कारखान्याच्या गट कार्यालयात जमा करावेत. कारखान्याकडून २०० प्रति किलो दर दिला जात आहे. हुमणीची अळी उसाची मुळे कुरतडते, त्यामुळे ऊस वाळतो व उत्पादनात २० ते ४०% पर्यंत घट येते. वेळेत नियंत्रण न केल्यास नुकसान वाढते. सध्या पाऊस सुरू झाल्याने हीच सापळे लावण्याची योग्य वेळ आहे, असे चव्हाण यांनी सांगितले.



## वळणावर टेम्पो उलटला; चालक किरकोळ जखमी

डांग-गुजरात (स. गांवकरी) : डांग जिल्ह्यातील सापुतारा–वघई या आंतरराज्य महामार्गावर आज मोठा अपघात टळला. मिळालेल्या माहितीनुसार, सापुतारा–वघई मार्गावरील चिखली गावाजवळील अत्यंत तीव्र आणि धोकादायक वळणावर एक टेम्पो अचानक पलटी झाला. अपघात इतका अचानक घडला की काही क्षणांतच रस्त्यावर वाहतूक कोंडीची परिस्थिती निर्माण झाली. स्थानिक सूत्रांच्या माहितीनुसार, महाराष्ट्रातून सुरतकडे जाणारा हा टेम्पो चालक भरधाव वेगाने चालवत होता. सापुतारा–वघई रस्त्यावरील चिखलीजवळील तीव्र वळणावर चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि त्याने स्टेअरिंगवरील ताबा गमावला. परिणामी, भरधाव टेम्पो रस्त्याच्या मध्यभागीच पलटी झाला. अपघातानंतर परिसरातील नागरिकांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले. सुदैवाने या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नाही. टेम्पो पूर्णपणे रिकामा असल्याने मालाचे नुकसान किंवा मोठे आर्थिक नुकसानही टळले.या अपघातात टेम्पो चालकाला शरीरावर किरकोळ दुखापत झाली असून त्याची प्रकृती धोक्याबाहेर असल्याचे समजते.



## कृषीकन्यांचे वंजारवाडी येथे ग्रामस्थांकडून स्वागत

अहिल्यानगर (स. गांवकरी) : महात्मा फुले कृषी विद्यापीठ,राहुरी संलग्नित सद्गुरु कृषी महाविद्यालय, मिरजगाव ता.कर्जत, जि.अहिल्यानगर च्या कृषी कन्या राजश्री भोईटे,ईश्वरी भुजबळ,अंकिता गोफणे, वेदांतिका खरात,वैष्णवी बंडगर,स्नेहल गजरमल,प्रतीक्षा आटोळे यांचे ग्रामीण कृषी कार्यानुभव आणि कृषी औद्योगिक संलग्नता उपक्रम २०२६-२७ च्या अभ्यास दौऱ्यानिमित्ताने जामखेड तालुक्यातील वंजारवाडी या गावामध्ये आगमन झाले. ग्रामीण कृषि कार्यानुभव व कृषी औद्योगिक संलग्नता उपक्रम चतुर्थ वर्षाच्या अभ्यासक्रमाचा एक महत्त्वाचा भाग असून,यात विद्यार्थ्यांना ग्रामीण जीवन, सामाजिक आर्थिक परिस्थितीची आणि शेतीशी संबंधित समस्यांची प्रत्यक्ष माहिती व्हावी.त्यासाठी या कार्यक्रमांतर्गत पुढील तीन महिने या विद्यार्थिनी गावांमध्ये मुक्कामी राहून अभ्यास दौरा करणार आहे. वंजारवाडी येथील ग्रामस्थांनी कृषी कन्यांचे स्वागत केले. त्यांच्या स्वागतावेळी गावचे सरपंच कोमल जायभाय , उपसरपंच हरी आढाव तसेच रमेश जायभाय,भागवत जायभाय,विष्णू जायभाय इतर ग्रामपंचायत सदस्य,ग्रामपंचायत कर्मचारी व ग्रामस्थ उपस्थित होते. यावेळी कृषीकन्या शेतकऱ्यांना शेतीविषयक शास्त्रीय माहिती, हंगामाप्रमाणे पीक पद्धती, रासायनिक खतांचा योग्य वापर, कीटकनाशके फवारताना घ्यावयाची काळजी, कीटकनाशक आणि सेंद्रिय शेती याबद्दल माहिती देतील.तसेच माती परीक्षण,पाणी व्यवस्थापन,कीड रोग पीक संरक्षण,इतर कृषी संबंधित प्रात्यक्षिके कृषिकन्या मार्फत घेतली जातील.तसेच शेतकऱ्यांसाठी विविध कृषी विषयक कार्यक्रम राबवणार आहेत. या उपक्रमासाठी विद्यार्थ्यांना संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. शंकर नेवसे,अध्यक्षा सौ. कल्याणीताई नेवसे,सचिव राजेंद्र गोरे,प्रशासकीय अधिकारी सखाराम राजळे, समन्वयक श्री राहुल म्हेत्रे, प्राचार्य डॉ.रामदास बिटे, कार्यक्रम समन्वयक प्रा.चांगदेव माने,कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रियंका जाधव यांचे मार्गदर्शन लाभत आहे.

## पथदिवे २४ तास सुरू राहिल्याने वीजेचा अपव्यय



किनवट (स. गांवकरी) : किनवट शहरातील अनेक भागांमध्ये पथदिवे दिवसभर सुरू राहत असल्याने मोठ्या प्रमाणात वीजेचा अपव्यय होत असून, यामुळे शहरातील वीज पुरवठ्यावर अतिरिक्त ताण येत असल्याची बाब समोर आली आहे. या पार्श्वभूमीवर उपनगराध्यक्ष हसन खान पठाण यांनी महावितरण उपविभाग, किनवट येथील उपअभियंत्यांना निवेदन देऊन पथदिवे वेळोवेळी सुरू-बंद करण्यासाठी योग्य व्यवस्था करण्याची मागणी केली आहे. या संदर्भात माध्यमांशी बोलताना उपनगराध्यक्ष हसन खान पठाण यांनी सांगितले की, उन्हाळ्याच्या दिवसांत विजेची मागणी मोठ्या प्रमाणात वाढलेली असताना शहरातील काही ठिकाणी भारनियमन करावे लागत आहे. अशा परिस्थितीत दिवसा सुरू असलेले पथदिवे पूर्णपणे निरुपयोगी ठरत असून त्यामुळे वीजेचा अनावश्यक वापर होत आहे. हे पथदिवे वेळेत बंद करण्यात आल्यास शहरातील वीज पुरवठ्यावरचा भार कमी होण्यास मदत होईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

# ग्रामीण भागातील मुलींचे यश प्रेरणादायी : आ. काशिनाथ दाते

## मुंबई पोलीस दलात निवड झाल्याबद्दल वडगाव सावताळच्या कन्यांचा गौरव

पारनेर : (स. गांवकरी)

पारनेर तालुक्यातील वडगाव सावताळ येथील काजल मच्छिंद्र खामकर व सुप्रिया अशोक आंधळे यांची मुंबई पोलीस खात्यात कॉन्स्टेबल पदावर नियुक्ती झाल्याबद्दल पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार मा. काशिनाथ दाते सर यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करून गौरव करण्यात आला.



या सत्कार समारंभास जिल्हा बँकेचे संचालक प्रशांत गायकवाड, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य वसंतराव चेडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अशोकराव सावंत, तालुकाध्यक्ष विक्रमसिंह कळमकर, आर. एस. कापसे सर, देवराम शेठ मगर, सुभाषराव सासवडे, राष्ट्रवादी काँग्रेसच्या तालुका महिला अध्यक्षा सुषमाताई रावडे, भाऊसाहेब खामकर सर, दत्तात्रय सरोदे, प्रदीप रोकडे, माजी सरपंच बाबासाहेब शिंदे, कैलास खामकर, मंगेश खामकर, तुषार खामकर, विठ्ठल खामकर, शैलेश जांभळकर, शुभम आंधळे, विठ्ठल बर्डे, अमोल शिंदे, आप्पा गायकवाड, जयवंत खामकर, विश्वनाथ गोरडे, शुभम चौधरी, दिपक खामकर, मच्छिंद्र खामकर, इरफान शेख यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे विविध पदाधिकारी, कार्यकर्ते व तालुक्यातील विविध गावांतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सत्कारानंतर उपस्थित मान्यवरांनी दोन्ही युवतींचे अभिनंदन करत त्यांच्या भावी सेवेसाठी शुभेच्छांचा वर्षाव केला.

ग्रामीण भागातील मुलींनी कठोर परिश्रम, चिकाटी आणि ध्येयाप्रती असलेली निष्ठा यांच्या बळावर मिळविलेले हे यश निश्चितच नव्या पिढीसाठी प्रेरणादायी ठरणार आहे, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

> ग्रामीण भागातील मुली जिद्द, मेहनत आणि आत्मविश्वासाच्या बळावर आज विविध क्षेत्रांत उल्लेखनीय यश संपादन करत आहेत. काजल खामकर आणि सुप्रिया आंधळे यांची मुंबई पोलीस दलात झालेली निवड ही केवळ त्यांच्या कुटुंबासाठी नव्हे तर संपूर्ण पारनेर तालुक्यासाठी अभिमानाची बाब आहे. त्यांच्या यशामुळे ग्रामीण भागातील इतर विद्यार्थिनींनाही मोठी प्रेरणा मिळणार असून त्यांनी प्रामाणिकपणे कर्तव्य बजावत समाजसेवेचा आदर्श निर्माण करावा. **- आ. काशिनाथ दाते सर, (विधानसभा सदस्य)**

# मुळा कारखाना निवडणुकीत गडाखांचे पारडे जड?

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

मुळा सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीने आता चांगलाच वेग घेतला असून, निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण तापू लागले आहे. निवडणूक जाहीर झाल्यानंतर सत्ताधारी गटाचे नेते तथा माजी मंत्री शंकरराव गडाख यांच्यावर विरोधकांकडून मोठ्या प्रमाणात आरोप- प्रत्यारोप होतील, अशी अपेक्षा अनेकांना होती. मात्र प्रत्यक्षात चित्र काहीसे वेगळे दिसून येत आहे. कारखान्याविरोधात एकत्र येत निवडणूक लढवण्याचा निर्धार केलेल्या विरोधी गटाकडून सोशल मीडियावर विविध प्रकारच्या पोस्ट, टीका आणि प्रचार मोहिमा सुरू करण्यात आल्या आहेत. कारखान्याच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्याचा प्रयत्न होत असला तरी या पोस्टना अपेक्षित प्रतिसाद मिळताना दिसत नाही.



उलटपक्षी, सोशल मीडियावर प्रसिद्ध होणाऱ्या अनेक पोस्टवर कारखान्याचे सभासद, ऊस उत्पादक शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिक प्रतिक्रिया देत विरोधकांच्या भूमिकेवरच प्रश्न उपस्थित करत आहेत. काही ठिकाणी विरोधी नेत्यांच्या पूर्वीच्या राजकीय भूमिकांपासून ते त्यांच्या कार्यपद्धतीपर्यंत विविध मुद्द्यांवर टीका होत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

# स्वामी भक्तीच्या प्रबोधनातून भक्त लोक स्वावलंबी बनत आहेत

## सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांचा वटवृक्ष मंदीरात नगरसेवक महेश इंगळे यांच्या हस्ते सत्कार

अक्कलकोट : (स. गांवकरी)

स्वामींनी 'एकमेकांना साह्य करू अवघे धरू सुपंथ' हा विचार आपल्या कृतीतून दाखवलं आहे. 'भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे' हा स्वामींचा अभयमंत्र स्वामी भक्तांच आत्मा आहे.

श्री स्वामी समर्थ यांनी वेळोवेळी केलेले भक्ती, सेवा आणि समाजप्रबोधन हे भाविकांसाठी कल्याणकारी आहेत, त्यामुळे स्वामी भक्तीच्या प्रबोधनातून भक्त लोक स्वावलंबी बनत आहेत. असे मनोगत राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे राज्याचे विद्यमान सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी व्यक्त केले.



सहकार मंत्री महाराष्ट्र बाबासाहेब पाटील यांनी नुकतेच येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरास भेट देऊन श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. यावेळी मंदिर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन व नगरसेवक महेश इंगळे यांनी सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांचा श्री स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देऊन यथोचित सत्कार केला. यावेळी सहकारमंत्री पाटील बोलत होते.

पुढे बोलताना सहकारमंत्री पाटील यांनी स्वामी आजही दुःखी-पीडितांना आधार देत आहेत. स्वामींनी 'एकमेकांना साह्य करू अवघे धरू सुपंथ' हा विचार कृतीतून दाखवला.

आपल्या सहकार खात्याचे धोरणही तेच आहे. शेतकरी, बचतगट, संस्था यांनी एकत्र येऊन स्वावलंबी व्हावे. स्वामी समर्थांनी केवळ चमत्कार केले नाहीत, तर लोकांना स्वावलंबी बनवले. सहकारातूनही नशिबवादी न होता प्रयत्नवादी

व्हा हाच स्वामींचा खरा संदेश असल्याचे मनोगतही सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी व्यक्त केले व आज येथे झालेल्या सन्माना प्रित्यर्थ मंदीर समितीचे व चेअरमन महेश इंगळे यांचे विशेष आभार मानले. यावेळी युवा नेते प्रथमेश इंगळे, अक्कलकोटचे सहायक उपनिबंधक थंबोरे साहेब, जिल्हा उपनिबंधक कुंदन भोळे साहेब, राष्ट्रवादी पक्ष तालुका अध्यक्ष दिलीप भाऊ सिध्दे, रूद्रय्या स्वामी, सिध्देश्वर कुंभार, प्रसन्न हत्ते, संदीप पंडीत, श्रीशैल गवंडी, विपूल जाधव, प्रसाद सोनार, आदीत्य पाटील, सोमशेखर अरबाळे, रवी वाघमोडे, संतोष पवार, श्रीकांत मलवे आदींसह भाविक भक्त व राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# हिंदू देवस्थानांच्या अस्तित्वास बाधक असलेला मसुदा तात्काळ मागे घ्या

## विश्व हिंदू परिषद ,मंदिर, अर्चक, पुरोहित संपर्क आयामाचेवतीने आमदार संग्राम जगताप यांना निवेदन

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

राज्य शासनाच्या महसूल व वन विभागाद्वारे प्रस्तावित "महाराष्ट्र देवस्थान इनाम निर्मूलन प्रारूप अधिनियम. २०२६" हा घटनाबाह्य व हिंदू देवस्थानांच्या अस्तित्वास बाधक असलेला मसुदा तात्काळ मागे घेण्याबाबत विश्व हिंदू परिषद,मंदिर,अर्चक,पुरोहित संपर्क आयामाचे वतीने आमदार संग्राम जगताप यांना निवेदन देण्यात आले.

याप्रसंगी विश्व हिंदू परिषदेचे मंदिर अर्चक पुरोहित संपर्क आयामाचे विभाग टोळी सदस्य गजेंद्र सोनवणे,जिल्हाप्रमुख श्रीकांत नांदापूरकर,जिल्हा प्रसिद्धी प्रमुख अमोल भांबरकर,श्री तुळजाभवानी पलंगाचे मानकरी गणेश पलंगे,दिनेश परदेशी, मनोहर भाकरे, मुकुल गंधे, अंबादास गोटीपामूल आदी उपस्थित होते. या निवेदनात सांगितल्याप्रमाणे अहिल्यानगर मतदारसंघातील तसेच राज्यातील विविध हिंदू देवस्थान संस्था,मंदिर विश्वस्त,



भाविक व महाराष्ट्र मंदिर महासंघ यांनी राज्य शासनाच्या महसूल व वन विभागामार्फत प्रसिद्ध करण्यात आलेल्या "महाराष्ट्र देवस्थान इनाम निर्मूलन प्रारूप अधिनियम, २०२६" या मसुद्याबाबत गंभीर आक्षेप व तीव्र चिंता व्यक्त केलेली आहे. सदर प्रस्तावित कायद्यामुळे हिंदू देवस्थानांच्या इनाम जमिनीवरील पारंपरिक,धार्मिक व कायदेशीर हक्क संपुष्टात येण्याची भीती निर्माण झाली असून, मंदिरांच्या आर्थिक स्वायत्ततेवर व धार्मिक व्यवस्थेवर दूरगामी परिणाम होण्याची शक्यता आहे. विशेषतः संविधानातील अनुच्छेद १४,२५,२६ व ३००-अ अंतर्गत संरक्षित अधिकारांवर या मसुद्यामुळे गदा येत असल्याचे विविध कायदे तज्ज्ञ,धार्मिक संस्था व नागरिकांनी निदर्शनास आणून दिले आहे. यासंदर्भात महाराष्ट्र मंदिर महासंघाने तयार केलेले सविस्तर निवेदन, कायदेशीर आक्षेप व मागण्या यांची प्रत सोबत जोडली आहे तरी आपण सदर विषयाची गांभीर्याने दखल घ्यावी.तसेच यासंदर्भात महाराष्ट्र मंदिर महासंघाने काही मागण्या केल्या आहेत त्या पुढीलप्रमाणे १) "महाराष्ट्र देवस्थान इनाम निर्मूलन प्रारूप अधिनियम, २०२६" हा प्रस्तावित मसुदा तात्काळ मागे घेण्यात यावा.२) संबंधित सर्व हिंदू देवस्थान संस्था, कायदे तज्ज्ञ व भाविक यांच्याशी व्यापक चर्चा केल्याशिवाय कोणताही अंतिम निर्णय घेऊ नये.३) हरकती व सूचना सादर करण्यासाठी मुदतवाढ देण्यात यावी.४) देवस्थान जमिनींचे संरक्षण करण्यासाठी स्वतंत्र कठोर कायदेशीर यंत्रणा निर्माण करण्यात यावी.

# गणोरेत जिल्हा बँकेचे नवीन एटीएम सुरू



गणोरे : (स. गांवकरी)

जिल्हा सहकारी बँक आता शाखांना नवीन एटीएमची सुविधा देत नाही परंतु सिताराम पाटील गायकर व मुख्य कार्यकारी संचालक रावसाहेब वर्पे यांच्या प्रयत्नाने जिल्हा बँकेने एक खास बाब म्हणुन गणोरे शाखेस एटीएमची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे जिल्हा बँक व विका सोसायट्यांनी शेतकऱ्यांना मोठे सहकार्य केले आहे. शेतकऱ्यांच्या विकासामध्ये जिल्हा बँक व विविध कार्य सोसायट्यांचे महत्त्वाचे योगदान आहे.

नव्वद टक्के शेतकऱ्यांच्या घरावरील पाचट काढण्याचे काम जिल्हा बँकेने केले असल्याचा मत अकोले शाखेचे विकास अधिकारी भारत वाकचौरे यांनी केले.


# AI फॉर टीचर्स कार्यशाळेचे आयोजन



अहिल्यानगर : (स. गांवकरी)

गेल्या मंगळवार दि. २ जून २०२६ रोजी ज्ञानसंपदा शाळेत कृत्रिम बुद्धिमत्तेचा (AI ) चा प्रभावी वापर करून अध्यापन प्रक्रिया अद्ययावत करण्याच्या हेतूने शिक्षकांसाठी विशेष प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेला प्रमुख मार्गदर्शिका म्हणून डॉ. सुनिता भागवत यांनी शिक्षकांना मोलाचे मार्गदर्शन केले. डॉक्टर सुनिता भागवत या शिक्षणतज्ञ असून ए .आय ( AI) सर्टीफाईड ट्रेनर आहेत. सध्या त्या अनेक शाळांमधून( AI ) फॉर टीचर्स ' यासंदर्भात शिक्षकां साठी कार्यशाळा घेत आहेत. नवीन शैक्षणिक धोरणानुसार (NEP) नुसार ज्ञानसंपदा शाळा मागील वर्षापासून याची अंमलबजावणी करत आहे, यात सूत्रबद्धता येण्यासाठी या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. शिक्षकांनी प्रत्यक्ष प्रात्यक्षिकाच्या माध्यमातून विशिष्ट क्रमाने कृती सादर केली.

कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजेच (AI) च्या सहाय्याने अध्यापन अधिक प्रभावी, आकर्षक परिणामकारक व विद्यार्थी केंद्रित कसे बनवता येईल त्या संदर्भात विशिष्ट क्लुप्त्या डॉ.भागवत यांनी शिक्षकांना उलगडून दाखवल्या. त्यांनी (AI) चा सुयोग्य वापर करत असताना त्याची परिणामकारकता, त्यातील नावीन्यता लक्षात घेऊन पाठ नियोजन तयार करण्यासाठी विशिष्ट व ठळक टेम्पलेटनुसार शिक्षकांना प्रशिक्षण दिले. पाठ नियोजन करताना योग्य प्रॉम्प्ट कसे वापरायचे याचे तंत्र उलगडून सांगितले. योग्य प्रमाणात त्याचा वापर करून नवीन शैक्षणिक धोरणानुसार म्हणजे




(NEP) व तंत्रज्ञानाच्या सुयोग्य वापरामुळे शिक्षकांना अधिक सक्षम बनवण्यासाठी तसेच शिक्षणाच्या प्रवाहाला अधिक अर्थपूर्ण बनवण्यासाठी हा अत्यंत उपयुक्त ठरू शकतो, असे प्रतिपादन केले.

कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर किती प्रमाणात व कशा स्वरूपात करावा याबाबत साक्षरता असायला हवी, विचाराला चालना देणे विचारांचा प्रवास सतत प्रवाहित व्हायला हवा, कृतीयुक्त शिक्षणामधून, प्रत्यक्ष अनुभवातून विविध नाविन्यपूर्ण उपक्रमातून अध्ययन -अध्यापन प्रक्रियेचा दर्जा (AI) च्या माध्यमातून वाढवायला हवा, याविषयी जागरूकता निर्माण करत त्यात सूत्रबद्धता कशी निर्माण व्हायला हवी या बद्दल मार्गदर्शन केले.

पाठ नियोजन,विविध उपक्रम (AI )च्या माध्यमातून बनवताना तो विद्यार्थी केंद्रित, विद्यार्थी निरीक्षण,स्तर, वयोमर्यादा लक्षात घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे (AI) आपल्या ज्ञानाचा, माहितीचा सहकारी आहे, पर्याय नव्हे, तो आपल्याला मार्ग दाखवणारा आहे, रस्त्याने आपल्याला चालायचे आहे हे या कार्यशाळेत डॉ. भागवत यांनी अधोरेखित केले. तसेच ए.आय वापरताना कोणती काळजी घ्यावी व कोणती जबाबदारी स्वीकारावी हे ज्ञात असणे अत्यंत गरजेचे आहे. ए.आय मुळे विद्यार्थ्यांचे संवादकौशल्य, निर्णयक्षमता, कल्पनाशक्ती वृद्धिंगत होऊन शिक्षणातील अडथळे दूर करण्यास सहकार्य करेन ,तसेच व्यवस्थापन सुसह्य करण्यासाठी त्याचा सुयोग्य उपयोग कसा करून घ्यावा त्याबद्दलचे तंत्र शिकवले. पुष्कळ वेळेला अभ्यासक्रमातल्या अनेक संकल्पना ह्या शिक्षकांना स्वतःलाच नीट कळलेला नसतात किंवा त्या सोप्या करून विद्यार्थ्यांना कशा सांगाव्यात हे समजत नसते. अशा वेळेला AI चा वापर कसा करावा याच्यावर पण त्यांनी भर दिला याचाच अर्थ स्वतःच्या शिक्षणासाठी आपला विषय पक्का करण्यासाठी शिक्षक व विद्यार्थी यांच्यासाठी( AI) चा कसा वापर होऊ शकतो हे या कार्यशाळेतून उलगडले. त्याचप्रमाणे वर्गातील मागे पडणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शिक्षकांनी नक्की काय करावे. त्यासाठी( AI) कसे मदत करू शकेल त्या विद्यार्थ्यांच्या आकलनशक्ती प्रमाणे कुठल्या प्रकारचा आशय ,कुठल्या प्रकारच्या परीक्षा, त्यांच्यासाठी घेता येतील व त्यासाठी ( AI ) कशी मदत करू शकेल , या विषयावर पण प्रकाश टाकला. डॉ.भागवत यांनी घेतलेल्या कार्यशाळेत शिक्षकांचा आत्मविश्वास वाढला, त्यांच्या शंकांचे सुयोग्य निरसन झाले, योग्य, अयोग्य गोष्टीचा वापर याबद्दल माहिती मिळाली. डिजिटल कौशल्य विकसित झाले .अध्यापन परिणामकारक होण्यासाठी कल्पकतेला चालना मिळाली. कृतीयुक्त शिक्षणात मूल्यमापन प्रक्रिया अधिक सुलभ होण्यास मदत झाली. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा लक्षात घेऊन, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी आयोजित केलेल्या या कार्यशाळेचा शिक्षकांना , विद्यार्थी हितासाठी नक्कीच उपयोग होईल.



# माणुसकीचा अखंड झरा : नानजीभाई ठक्कर

(स. गांवकरी)

समाजात काही व्यक्ती अशा असतात की, त्यांचे मोठेपण त्यांच्या संपत्तीत किंवा प्रसिद्धीत नसते; तर ते असते त्यांच्या माणुसकीत, संवेदनशीलतेत आणि समाजासाठी झटण्याच्या वृत्तीत. ठाणे शहराने अनेक यशस्वी उद्योगपती, शिक्षणप्रेमी आणि समाजसेवक पाहिले आहेत; मात्र नानजीभाई खिमजीभाई ठक्कर (ठाणावाला) हे नाव या सर्वांमध्ये एका वेगळ्याच उंचीवर उभे दिसते. कारण त्यांनी केवळ स्वतःचे आयुष्य घडवले नाही, तर हजारो लोकांच्या जीवनात आशेचा किरण पेटवला.

आजच्या धकाधकीच्या आणि स्वार्थी होत चाललेल्या जगात अनेकजण स्वतःपुरते विचार करतात. यश, संपत्ती आणि प्रतिष्ठा मिळविण्याच्या शर्यतीत समाजाप्रती असलेली बांधिलकी अनेकदा मागे पडते. अशा काळात नानजीभाई ठक्कर यांच्यासारखी व्यक्तिमत्त्वे समाजाला दिशा देणारी ठरतात. व्यवसायात यशस्वी होत असतानाच त्यांनी समाजाशी असलेली नाळ कायम जपली. "समाजाने आपल्याला दिले आहे, तर समाजालाही काहीतरी परत दिले पाहिजे," हा त्यांचा विचार केवळ शब्दांत नव्हता; तो त्यांच्या प्रत्येक कृतीतून दिसून येत होता.

समाज परिवर्तनाचा सर्वात प्रभावी मार्ग म्हणजे शिक्षण, यावर त्यांचा दृढ विश्वास होता. शिक्षणामुळे व्यक्ती घडते, कुटुंब उभे राहते आणि समाज प्रगत होतो, ही त्यांची धारणा होती. त्यामुळे त्यांनी शिक्षण क्षेत्राला विशेष प्राधान्य दिले. अनेक विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत, विविध उपक्रमांना सहकार्य आणि शिक्षणाची संधी सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी त्यांनी मोलाचे योगदान दिले. आर्थिक अडचणींमुळे शिक्षणापासून वंचित राहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ते आधारवड ठरले.

आज विविध क्षेत्रांत यशस्वी झालेल्या अनेक व्यक्ती त्यांच्या योगदानाची कृतज्ञतेने आठवण करतात. डॉक्टर, अभियंते, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी आणि उद्योजक घडविण्यामागे त्यांच्या प्रेरणेचा वाटा असल्याचे अनेक जण मान्य करतात. कारण त्यांनी केवळ आर्थिक मदत केली नाही, तर विद्यार्थ्यांच्या मनात आत्मविश्वास आणि स्वप्ने पाहण्याची हिंमत निर्माण केली. नानजीभाई ठक्कर यांच्या दानशूर वृत्तीची खरी ओळख म्हणजे त्यांच्या मदतीमागील आत्मीयता. त्यांनी केलेली मदत ही केवळ आर्थिक व्यवहार नव्हती; ती माणुसकीची अभिव्यक्ती होती. एखाद्या गरजू कुटुंबावर संकट आले असेल, एखाद्या विद्यार्थ्याचे शिक्षण अडचणीत आले असेल किंवा एखाद्या सामाजिक संस्थेला आधाराची गरज असेल, तर नानजीभाई मदतीसाठी तत्पर असत. विशेष म्हणजे, त्यांनी कधीही प्रसिद्धीची अपेक्षा ठेवली नाही. एका हाताने केलेली मदत दुसऱ्या हातालाही कळू नये, हा विचार त्यांनी आयुष्यभर जपला.

याच कारणामुळे त्यांच्या कार्याचा गाजावाजा कमी झाला; पण लोकांच्या मनातील आदर मात्र अधिक वाढत गेला. समाजसेवा ही प्रसिद्धी मिळविण्याचे साधन नसून माणुसकीचे कर्तव्य आहे, हे त्यांनी आपल्या जीवनातून दाखवून दिले.

कोरोना महामारीच्या काळात संपूर्ण जग अभूतपूर्व संकटातून जात होते. अनेक कुटुंबांचे रोजगार गेले, आर्थिक अडचणी वाढल्या आणि अनेकांच्या घरात अन्नाचा प्रश्न निर्माण झाला. अशा कठीण काळात समाजाला गरज होती ती आधाराच्या हातांची. नानजीभाई ठक्कर यांनी ही गरज ओळखली आणि संकटात सापडलेल्या अनेक कुटुंबांना मदतीचा हात दिला.

अन्नधान्य वाटप, जीवनावश्यक वस्तूंची उपलब्धता, सामाजिक संस्थांना सहकार्य आणि गरजूंना मानसिक आधार देण्याचे कार्य त्यांनी निःस्वार्थपणे केले. जेव्हा अनेकजण घराबाहेर पडण्यास घाबरत होते, तेव्हा संकटग्रस्तांच्या मदतीसाठी पुढे सरसावणाऱ्यांमध्ये त्यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जात होते. त्यांच्या या कार्यामुळे अनेक कुटुंबांना नव्याने जगण्याची उमेद मिळाली.

कोरोना काळ संपल्यानंतरही अनेकांच्या आठवणीत एक भावना कायम राहिली. "कठीण काळात ज्यांनी हात दिला, त्यांना कधी विसरता येत नाही." ही भावना नानजीभाई ठक्कर यांच्या व्यक्तिमत्त्वाचे सर्वात मोठे यश म्हणावे लागेल.

एखाद्या व्यक्तीचे मोठेपण त्याच्या संपत्तीत नसते, तर त्याच्या जाण्यानंतरही लोकांच्या मनात जिवंत राहणाऱ्या आठवणींमध्ये असते. नानजीभाई ठक्कर यांनी आयुष्यभर माणुसकी, शिक्षण, समाजसेवा आणि परोपकार यांचा जो दीप प्रज्वलित ठेवला, तो आजही अनेकांसाठी प्रेरणादायी आहे.

आज ठाणे शहरात आणि समाजात त्यांचे नाव केवळ एका यशस्वी उद्योगपतीचे म्हणून घेतले जात नाही; तर एका अशा व्यक्तीचे म्हणून घेतले जाते, ज्यांनी माणसांमध्ये देव शोधला नाही, तर स्वतःच्या कृतीतून देवत्व जपले.

म्हणूनच अनेक हिंदुस्थानात आजही भावनापूर्ण शब्दांत म्हणतात—

"देव दिसत नाही असे म्हणतात; पण संकटाच्या काळात मदतीचा हात देणारा माणूसच देव असतो. आणि अशा देवमाणसांमध्ये नानजीभाई ठक्कर यांचे नाव सदैव अग्रस्थानी राहील."



## डॉ. विश्वासराव आरोटे

कळसुबाई शिखरावरून

## शाईचा प्रवास | प्रतिक गंगणे

## "या जन्मावर, या जगण्यावर शतदा प्रेम करावे."

**त्याप्रमाणे बाबांनी आयुष्यभर हिंदुस्तानातच नव्हे तर नेपाळ, लंडन, अमेरिका या ठिकाणी शाळा-महाविद्यालये सुरू करून लाखोंचा पोशिंदा म्हणून कार्य केले. वयाच्या ८४ व्या वर्षातदेखील बाबा आज हिंदुस्थानात पायाला भिंगरी लावून फिरतात. हीच त्यांच्या कार्याची खरी पावती आहे.**

बाबांनी आयुष्यात पैशापेक्षा माणसं कमावली. बाबांकडे आजही मंत्री, खासदार, आमदार, सर्वसामान्य कार्यकर्ता, सर्वसामान्य माणूस जेव्हा जातो, तेव्हा बाबा कधीही त्याला माघारी येऊ देत नाहीत. "अरे, गिऱ्हाईक पाठवा, माझ्याकडून घेऊन जा. हे सर्व परमेश्वराचे आहे. परमेश्वराने मला देण्याचे भाग्य दिले. ते देत असताना दुसऱ्याच्या चेहऱ्यावरील आनंद हाच माझ्या जीवनातील आनंद आहे."

"मला काही कमवायचे नाही. मला कोणत्याही प्रकारची देणगी मिळवायची नाही. मला कोणत्याही प्रकारची शिफारस नको, कारण माझ्यामागे मला ईडी लावून घ्यायची नाही. सध्या हिंदुस्थानामध्ये ईडी मागे लावून बिड्या पिण्यापेक्षा सर्वसामान्य जनतेच्या पिढ्या घडवणे हे माझे उद्दिष्ट आहे."

तरुणांना माझा एकच संदेश राहील— व्यसनापासून दूर राहा. आळंदी-पंढरपूरला जाण्यापेक्षा आपल्या घरातच आई-वडील आहेत, त्यांची सेवा करा. त्यांच्या सेवेतून जो आशीर्वाद आपल्याला प्राप्त होईल, तीच आपल्या खऱ्या जीवनाची शिदोरी आहे.

"कोणी करा निंदा, कोणी करा वंदा, काम करत रहा आणि हाच माझा धंदा." हाच बाबांनी आयुष्यभर जपलेला संदेश आहे.

बाबा म्हणतात, मंदिरात जाण्यापेक्षा खरे मंदिर हे शालेय विद्यार्थ्यांमध्ये आहे. येथे सरस्वती आहे, येथे लक्ष्मी आहे, येथे ज्ञानोबा आहेत, येथे तुकोबा आहेत. विद्यार्थ्यांसाठी मदत करा. शैक्षणिक कार्यासाठी केलेली मदत कधी वाया जात नाही. ज्यावेळेस तो विद्यार्थी अधिकारी, उत्कृष्ट शेतकरी किंवा उत्कृष्ट व्यापारी बनेल, त्यावेळी त्याला त्याच्या शाळेत मिळालेले शालेय साहित्य आणि ते देणारा माणूस कायम त्याच्या हृदयात राहतो.

अशा हृदयस्पर्शी लोकांची या हिंदुस्तानात कमतरता नाही. "देणाऱ्याने देत जावे, घेणाऱ्याने घेत जावे, घेणाऱ्याचे हातही घ्यावे" असे म्हटले जाते. मात्र जे कराल ते चांगल्यासाठी करा.

एनकेटी ट्रस्टने आयुष्यात कधीही कोणत्याही प्रकारची देणगी घेतली नाही आणि घेणारही नाही. ज्याला कोणाला द्यायचे आहे, त्याने शाळा, महाविद्यालये या ठिकाणी विद्यार्थ्यांना साहित्य द्यावे. एनकेटी ट्रस्टच्या माध्यमातून अनेक वर्षांपासून दानधर्म केला जातो. आम्हाला कोणत्याही प्रकारची जाहिरात करायची नाही. आम्हाला कोणत्याही प्रकारचे शासनाकडून अनुदान मिळवायचे नाही. आम्हाला फक्त वेळप्रसंगी जे काही देता येईल, ते देण्याचे काम करायचे आहे.

देत असताना किती देतो यापेक्षा सुरुवात करणे महत्त्वाचे आहे. मग या ठिकाणी देणाऱ्यांची लाईन लागते. ते काम पूर्णत्वास जाते. ते पूर्ण झाल्यानंतर पाया, रचना व त्याचा कळस पूर्ण करण्याची जबाबदारी आम्ही घेतो. हे काम पूर्णत्वास नेण्यासाठी सर्वांचे सहकार्य लाभले.

हिंदुस्थानातील गावागावांत, शहरांमध्ये आम्ही हे काम करत असताना आम्हाला काही मिळवायचे नाही. कोणत्याही राजकीय निवडणुका लढवायच्या नाहीत, कोणतीही पदे मिळवायची नाहीत. जे काही करायचे ते जनतेसाठी करायचे. जनता जनार्दन हेच आमचे आराध्य दैवत असून या दैवतासाठी आम्हाला जे करण्याचे भाग्य प्राप्त झाले, त्याबद्दल आम्ही परमेश्वराचे ऋणी आहोत.

परमेश्वराला प्रत्येकाच्या घरात राहता येत नाही, म्हणून त्याने आई दिली. खरंतर महिलांमध्ये सरस्वती आहे, लक्ष्मी आहे. तिचा आदर करा, तिला सन्मान द्या, प्रेरणा द्या. नक्कीच उद्याच्या आदर्श भारताच्या कर्तबगार नागरिकांमध्ये महिलांचेही मोठे योगदान असेल.

या देशाच्या राष्ट्रपतीपदावर महिलांनी उत्कृष्ट काम केले. प्रतिभाताई पाटील यांचे उदाहरण आपल्यासमोर आहे.

शेतकरी सुखी झाला तरच हा देश सुजलाम-सुफलाम बनू शकतो. या देशातील पहिला शेतकरी सुखी होवो, नंतर औद्योगिक क्षेत्राकडे लक्ष दिले पाहिजे. या देशातील सैनिकांमुळेच आपण सुखात आहोत, हेही मान्य केले पाहिजे.

प्रत्येकाने जीवनामध्ये कमावलेल्या पैशातून दानधर्म करत असताना तो दानधर्म शालेय शिक्षणासाठी दिला, तर नक्कीच एक आदर्श निर्माण होऊ शकतो.

वयाच्या ८४ व्या वर्षातदेखील पायाला भिंगरी लावून संपूर्ण हिंदुस्थानात मदतीचा ओघ माझ्याकडे येत असतो. त्यातून मी दानधर्म करत असतो. आणि तो दानधर्म करत असताना मला एक व्यसन प्राप्त झाले आहे. दिवसभरामध्ये मी काही दानधर्म केला नाही, तर मला सुखाची झोप येत नाही.

मला डॉक्टरांकडे जाण्याची गरज नाही. कारण माझ्या दारासमोर जेवढ्या चप्पल-बुटांची रांग दिसते, तेवढीच माझी श्रीमंती आहे. या श्रीमंतीपेक्षा मला बाकी काही मोठे वाटत नाही.

या देशाला भारतमाता का बोलतात? बाकीच्या देशांना कुठेही माता बोलत नाहीत. पण हिंदुस्थानाला भारतमाता म्हणतात. या हिंदुस्तानामध्ये पाच माता आहेत. आईमाता, गोमाता, भूमाता, जलमाता आणि भारतमाता. या पाच मातांनी हा हिंदुस्तान जगाच्या उंचीवर नेला आहे.

सर्वांनी जीवनात एक मंत्र जपून ठेवावा— "तुझे आहे तुजपाशी, तू जागा चुकलासी."

या सृष्टीला, या निसर्गाला जपण्याचे काम सर्वांनी करावे. आपल्या वाढदिवसानिमित्ताने, आई-वडिलांच्या स्मृतिदिनानिमित्ताने प्रत्येकाने घरासमोर किंवा मोकळ्या जागेत त्यांच्या नावाने वृक्षलागवड करावी. ही वृक्षलागवड अत्यंत महत्त्वाची आहे.

झाडे जगवली तरच आपल्याला शुद्ध हवा मिळू शकते. प्रत्येक ठिकाणी जंगलाचा ऱ्हास होत आहे. प्रत्येक जण झाडे तोडत आहे. प्रत्येक ठिकाणी इमारती उभ्या राहत आहेत. केंद्र व राज्य सरकारने परवानगी देताना वृक्षलागवडीला प्राधान्य द्यावे.

प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या घराजवळ, शेतामध्ये व मोकळ्या जागेत झाडांवर प्रेम करावे. झाडे मोठी झाली तर ती सावली देतील, फळे देतील आणि निसर्गाशी नाते जोडतील. आज कॅन्सरसारख्या रोगाने भारतामध्ये थैमान घातले आहे. या आजाराला थांबवण्यासाठी शेतीमध्ये रासायनिक खतांचा वापर कमी करावा. कारण अनेक लोक दुधामध्ये, मिठाईमध्ये भेसळ करतात. दुसऱ्याला विष पाजून आपण मोठे होण्याचे स्वप्न पाहणाऱ्यांची स्वप्ने परमेश्वर कधीही पूर्ण करत नाही.

•••

# अजिंक्य डी. वाय. पाटील अभियांत्रिकी' वर एन.बी.ए. मानांकनाचा शिक्कामोर्तब

आळंदी : (स. गांवकरी)

आळंदी येथील लोहगाव मधील अजिंक्य डी. वाय. पाटील स्कूल ऑफ इंजिनिअरिंगच्या तीन विभागांना नॅशनल बोर्ड ऑफ अ‍ॅक्रेडिटेशन ( एन.बी.ए. ) समिती कडून तीन वर्षांसाठी मानांकन प्राप्त झाले आहे. अभियांत्रिकी क्षेत्रात राष्ट्रीय स्तरावर एन.बी.ए. मानांकनाला फार महत्त्व आहे. या निमित्त परिसरातून व्यवस्थापन आणि सर्व संबंधित घटकांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. महाविद्यालयातील सिव्हिल, मेकॅनिकल व इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग या शाखांना मानांकन मिळाले आहे.या तीनही पदवी अभ्यासक्रमांना राष्ट्रीय मानांकन मंडळ (एन बी ए) कडून २०२६ ते २०२८ या कालावधीसाठी तीन वर्षांची मान्यता प्राप्त झाली आहे. यामुळे ‘अजिंक्य डी. वाय. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाची’ गुणवत्ता पुन्हा एकदा सिद्ध झाली आहे. एन.बी.ए. ही संस्था राष्ट्रीय स्तरावरील व्यावसायिक अभ्यासक्रमांना मानांकन देण्याचे



काम करते. समितीच्या डॉ. मित्तल यांच्या नेतृत्वाखाली सात सदस्यीय समितीने अजिंक्य डी. वाय. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयातील शिक्षण प्रणाली, सर्व सुविधा, प्राध्यापकांची गुणवत्ता व उपलब्धता, प्रत्येक विभागातील कागदपत्रांची तपासणी केली. यामध्ये टीचिंग-लर्निंग प्रोसेस, रिसर्च अँड कन्सल्टन्सी, स्टुडंट सक्सेस रेट, करिअर गायडन्स, प्लेसमेंट, इन्फ्रास्ट्रक्चर, प्रोजेक्ट, विद्यार्थ्यांचा फिडबॅक, आउटकम बेस्ड एज्युकेशन यांचे मूल्यमापन केले. त्याचबरोबर विविध विभागांना भेट दिली.

संस्थेचे अध्यक्ष डॉ अजिंक्य डी. वाय. पाटील यांनी सर्वांचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या. या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ अजिंक्य डी वाय पाटील यांनी अभिनंदन करताना सांगितले की, ही मान्यता संस्थेच्या गुणवत्तापूर्ण शिक्षण, नाविन्यपूर्ण अध्यापन पद्धती आणि विद्यार्थी केंद्रित दृष्टिकोनाची दखल आहे. त्यांनी भविष्यातही संस्था शैक्षणिक उत्कृष्टतेची परंपरा कायम राखेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

अजिंक्य डी वाय पाटील विद्यापीठाचे कुलगुरू डॉ आर के जैन यांनी महाविद्यालयाचे विशेष अभिनंदन करत सर्व प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी, माजी विद्यार्थी आदींनी केलेल्या सामूहिक प्रयत्नांचे कौतुक केले. या यशामागे संपूर्ण टीमचे समर्पण, कठोर परिश्रम आणि गुणवत्तेबाबतची बांधिलकी असल्याचे त्यांनी नमूद केले. प्राचार्य डॉ. एफ. बी. सय्यद यांनी या यशाचे श्रेय संस्थेचे व्यवस्थापन, सर्व विभाग प्रमुख, शिक्षकवृंद, कर्मचारी, विद्यार्थी, माजी विद्यार्थी आणि उद्योग क्षेत्रातील सहकार्यांना दिले. एन. बी. ए. मान्यता ही संस्थेच्या परिणामाधारित शिक्षण आणि सातत्यपूर्ण गुणवत्ता वृद्धीच्या प्रयत्नांची पावती असल्याचे त्यांनी सांगितले. मूल्यांकन यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी अजिंक्य डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. आर. के. जैन, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. फारूक सय्यद, सर्व डीन, विभागप्रमुख, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी यांचे सहकार्य लाभले.

## अहमदनगर जिल्हा पतसंस्थांचे सहकारी फेडरेशन मर्या.,अ.नगर

मुख्य कार्यालय:- महात्मा फुले चौक, मार्केट यार्ड,उपनिबंधक, ता.नगर कार्यालयाशेजारी, अ.नगर. ✆:०२४१-२३२६९१४

**जा. क्र. पतसंस्था फेडरेशन /३७४/ सन २०२६** **दिनांक -२६/०५/२०२६**

### स्थावर मालमत्ता जप्ती हुकूम

ज्या अर्थी **विवेकानंद ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या.,जामखेड,ता.जामखेड,जि.अ.नगर** यांनी खाली नमुद केलेल्या थकबाकीदारांविरुध्द महाराष्ट्र सह.संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१/९८ ब अन्वये वसुली दाखले मिळविले असुन त्यांच्यावर रितसर मागणी नोटीस बजावली आहे.तरीही त्यांनी त्यांच्याकडील थकबाकीची रक्कम भरली नसल्याने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ व नियम १०७/(१०) नुसार मला मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था अ.नगर यांनी प्रदान केलेल्या अधिकारास अनुसरुन मी **एम.ए.शेख** विशेष वसुली व विक्री अधिकारी खालील नमुद स्थावर मालमत्ता थकीत येणे रक्कम वसुलीकरिता जप्त करीत आहे. आणि महाराष्ट्र सहकारीसंस्था अधिनियम १९६० चे कलम ९९ मधील तरतुदीनुसार वसुली दाखला दिल्यानंतर सदर स्थावर मालमत्तेचे कोणतेही खाजगी हस्तांतरण / दुसऱ्याच्या स्वाधीन करण्यात आलेली असेल किंवा विक्री अथवा तिच्यावर कोणताही भार,गहाण,दान देण्यात किंवा बोजा निर्माण करण्यात आला असेल, तर त्या सर्व बाबी पतसंस्थेच्या बाबतीत रद्द / निरर्थक ठरतील.

| अ.नं. | थकबाकीदाराचे नाव | गांव | स्थावर मिळकत: वसुली दा.रक्कम | गट नं./प्लॉट नं./मिळकत नं. | क्षेत्र हे. आर | आकार रु. पै | चतु:सिमा (पुर्व / पश्चिम / दक्षिण / उत्तर) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | कर्ज - सुमन विजय जाधव यांची मिळकत व करिता<br>जामि - संदिप रामदास गायकवाड यांची मिळकत<br>जामि- सुरेश आण्णा गायकवाड | जामखेड<br>जामखेड<br>जामखेड<br>ता.जामखेड | ७३६९६/- +इतरखर्च+ होणार व्याज | ११८६पैकी<br>११८६पैकी<br>११८६ पैकी<br>११८६/१ | ०.०३पैकी<br>०.०२पैकी<br>०.०२पैकी<br>०.०१.१५ | ०.०३<br>०.०२<br>०.०२<br>४.०० | मुळ नकाशा प्रमाणे |
| ३. | कर्ज - राजेंद्र मारुती सदाफुले यांची मिळकत व करिता<br>जामि - गोकुळ शाहुराव पाबळ यांची मिळकत<br>जामि - शाहुराव भागुजी पाबळ | जामखेड<br>मोहा<br>ता. जामखेड | २३५४०/- +इतरखर्च+ होणार व्याज | ११८६<br>५५९ | ०.००८२<br>०.६३ | ०.०१<br>१.११ | मुळ नकाशा प्रमाणे |
| ४. | कर्ज - अमोल दत्तात्रय पंडित करिता<br>जामि - अनिल राजाराम हजारे यांची मिळकत<br>जामि- अशोक बाबासाहेब कोळपकर यांची मिळकत<br>संमतीदार- सुमन दत्तात्रय पंडित याची मिळकत | नान्नज<br>नान्नज<br>नान्नज<br>नान्नज<br>जामखेड<br>ता. जामखेड | १५५९३०३/- +इतरखर्च+ होणार व्याज | १५०<br>४०९<br>१२००<br>तारणातील मि.९८२/१<br>१५११/४ | १.५८<br>०.०३<br>०.५६<br>०.८०<br>०.०२.०० | १.८२<br>०.०७<br>१.१०<br>०.३९<br>०.०४ | मुळ नकाशा प्रमाणे |
| ५. | कर्ज - संगिता प्रकाश नागरगोजे करिता<br>जामि - महादेव शहादेव राख यांची मिळकत<br>जामि - रमेश प्रकाश क्षिरसागर यांची मिळकत<br>जामि- दादासाहेब मोहन वारे यांची मिळकत | जामखेड<br>जामखेड<br>जामखेड<br>ता. जामखेड | १७३३६०१/- +इतरखर्च+ होणार व्याज | १३५६<br>१३४५/२/२<br>४२४ | ०.०१.००<br>०.००७३<br>०.५२.०० | ०.०१.००<br>०.०७<br>१.६९ | मुळ नकाशा प्रमाणे |
| ६. | कर्ज - अनिता विलास जगदाळे यांची मिळकत व करिता<br>जामि - प्रकाश पंढरीनाथ जगदाळे यांची मिळकत<br>जामि - बाबासाहेब वामन खरात यांची मिळकत | चौंडी<br>जामखेड<br>चौंडी<br>चौंडी<br>चौंडी<br>ता. जामखेड | ५११०१८/- +इतरखर्च+ होणार व्याज | १९२/१२<br>२१७<br>९३<br>१३५<br>९३ | ०.८०.००<br>१.७६.००<br>०.०१.००<br>१.६०<br>०.४०.०० | १.२०<br>१.२९<br>-<br>१.३८<br>०.२१ | मुळ नकाशा प्रमाणे |
| ७. | कर्ज - विजय मारुती जाधव करिता<br>जामि - सुमन विजय जाधव यांची मिळकत<br>जामि- रामा मारुती गायकवाड | जामखेड<br>जामखेड<br>जामखेड<br>ता.जामखेड | ७७९९९/- +इतरखर्च+ होणार व्याज | ११८६<br>११८६पैकी<br>११८६पैकी | ०.०१.७२<br>०.०२.००पैकी<br>०.०३.००पैकी | ०.०२<br>०.०२<br>०.०३ | मुळ नकाशा प्रमाणे |
| ८. | कर्ज - मुरलीधर चंदुलाल चव्हाण यांची मिळकत<br>जामि - मोहन अर्जुन सुरवसे<br>जामि - बबन पांडुरंग कोथंबिरे | खर्डा<br>ता.जामखेड | २००००-/ +इतरखर्च+ होणार व्याज | मा.क्र. १०३ | ८४.५४ चौमी | - | मुळ नकाशा प्रमाणे |
| ९. | कर्ज -गणेश राजु पोकळे यांची मिळकत व करिता<br>जामि - विकास सुनील घोगरदरे यांची मिळकत<br>जामि - सुनिल जालिंदर चव्हाण यांची मिळकत | जाामखेड<br>गुरेवाडी<br>गुरेवाडी<br>आघी<br>आघी<br>ता.जामखेड | ११६६०८/- +इतरखर्च+ होणार व्याज | ९२९<br>१६८<br>१९४<br>१६०<br>१६५ | ०.०२.५०<br>०.०८.००<br>०.८४.००<br>पो.ख. ०.०१.००<br>०.३७.५०<br>०.६७.००<br>पो.ख. ०.००.५० | ०.०४<br>०.०७<br>०.८१<br>०.३०<br>०.३४ | मुळ नकाशा प्रमाणे |
| १०. | कर्ज -धम्मदिप श्रीपती जोगदंड यांची मिळकत व करिता<br>जामि - गंगाधर माणिक घोडेस्वार यांची मिळकत<br>जामि - रावसाहेब कुंडलिक पुलवळे यांची मिळकत | जाामखेड<br>जामखेड<br>साकत<br>साकत<br>साकत<br>ता.जामखेड | ५११६९७९८/- +इतरखर्च+ होणार व्याज | ११८६<br>११८६<br>११४७<br>१०३७पैकी<br>१०४६पैकी | ०.०१.४८<br>०.०१.५०<br>०.२०.००<br>१.५४.००पैकी<br>०.२६.००पैकी | ०.०१<br>०.०१<br>०.४०<br>३.४२<br>०.७९ | मुळ नकाशा प्रमाणे |
| ११. | कर्ज -दत्तात्रय किसन भोसले यांची मिळकत व करिता<br>जामि - पिराजी विठ्ठल दगडे यांची मिळकत<br>जामि - प्रकाश शामराव गोलेकर | खर्डा<br>खर्डा<br>ता.जामखेड | ११२५५४५/- +इतरखर्च+ होणार व्याज | ६०४<br>४ | ०.४०.००<br>पो.ख. ०.०१.००<br>०.०२.०० | ०.४९<br>०.१० | मुळ नकाशा प्रमाणे |
| १२. | कर्ज -प्रकाश जगन्नाथ नागरगोजे मिळकत व करिता<br>जामि - दादासाहेब मोहन वारे यांची मिळकत<br>जामि -रमेश प्रकाश क्षिरसागर<br>जामि- महादेव शहादेव राख | जामखेड<br>जामखेड<br>रत्नापुर<br>ता.जामखेड | १७३२८०४/- +इतरखर्च+ होणार व्याज | १३४५/२/१<br>१३४५/२/२<br>४१७ | ०.२०.००<br>७.१२.८०<br>०.५७.०० | ०.२५<br>७१.२८<br>१.४९ | मुळ नकाशा प्रमाणे |
| १३ | कर्ज - महेश शहाजी खंडागळे करिता<br>जामि - प्रविण सुर्यकांत राऊत यांची मिळकत<br>जामि -विठाबाई शहाजी खंडागळे | जामखेड<br>ता.जामखेड | ३७९६८१/- +इतरखर्च+ होणार व्याज | १०९३/१/१अ/१पैकी | ०.०६.५९पैकी | ०.१४ | मुळ नकाशा प्रमाणे |
| १४. | कर्ज - योगेश शहाजी काशिद करिता<br>जामि - शहाजी तुळशीराम काशिद यांची मिळकत<br>जामि -लक्ष्मण बबन वाघमोडे | जामखेड<br>जामखेड<br>ता.जामखेड | १८७६७५/- +इतरखर्च+ होणार व्याज | ७८१क<br>७८३/२ | ०.३४.००<br>पो.ख ०.०२.००<br>०.४९.०० | ०.६७<br>०.६० | मुळ नकाशा प्रमाणे |
| १५. | कर्ज - बाळु साहेबराव गायकवाड करिता<br>संमतीदार- किसन साहेबराव गायकवाड यांची मिळकत<br>संमतीदार- साहेबराव मारुती गायकवाड यांची मिळकत<br>जामि- ओंमकार अशोक तिवाटणे<br>जामि- मुड्डे सचिन शिवचलप्पा | जामखेड<br>जामखेड<br>जामखेड<br>जामखेड<br>ता.जामखेड | २०३७२०/- +इतरखर्च+ होणार व्याज | ११८४/१<br>११८६ | ०.००.६२<br>०.०१.२६ | ०.०१<br>०.०१ | मुळ नकाशा प्रमाणे |
| १६. | कर्ज - शिवाजी बाळा ढेरे यांची मिळकत व करिता<br>जामि- उध्दव सावळेराम क्षिरसागर यांची मिळकत<br>जामि-विभिषण रंगनाथ गोपाळघरे | खर्डा<br>खर्डा<br>खर्डा<br>खर्डा<br>खर्डा<br>खर्डा<br>खर्डा<br>ता.जामखेड | ६१५५५/- +इतरखर्च+ होणार व्याज | ५२०<br>५३८<br>५३९<br>५५५<br>५६५<br>५६७<br>४९४ | ०.१०.७५<br>०.१३<br>०.१३<br>०.०९<br>०.११<br>०.२९<br>१.४० | ०.२३<br>०.१६<br>०.३६<br>०.२३<br>०.१२<br>०.३१<br>१.५५ | मुळ नकाशा प्रमाणे |
| १७ | कर्ज - श्रीनिवास सोनबा खैरे यांची मिळकत व करिता<br>जामि- सुधिर वसंतराव जमकावळे यांची मिळकत<br>जामि- विनोद वसंतराव जमकावळे | वाकी<br>खर्डा<br>खर्डा<br>खर्डा<br>खर्डा<br>ता.जामखेड | २९५२०८/- +इतरखर्च+ होणार व्याज | १५२/२<br>२३६/१ पैकी<br>२३७<br>२४१<br>२४४ पो.ख ०.००.५० | ०.२१.००<br>१.७८०० पैकी<br>२.३५.००<br>१.५४.००<br>१२.०० | ०.५१<br>३.००<br>१.५४<br>३.१८<br>०.२३ | मुळ नकाशा प्रमाणे |

हा आदेश प्रसिध्द झाल्यापासुन तीस दिवसांच्या आत वसुल पात्र रक्कम व त्यावरील येणे व्याज न भरल्यास वरीलप्रमाणे जप्त केलेल्या स्थावर मालमत्तेचा जाहिर लिलाव करण्यात येईल व पतसंस्थेस येणे असलेल्या वसुल पात्र रक्कमेचा भरणा केला जाईल. वरील स्थावर जाहिर लिलावाने विक्री करुन ही वसुल पात्र रक्कमेएवढी रक्कम न आल्यास जामिनदारांकडुन वरील प्रमाणेच प्राधान्याने वसुली केली जाईल,याची जामिनदाराने नोंद घ्यावी.

स्थळ :- अ.नगर
दिनांक -२६/०५/२०२६

सिल

(एम.ए.शेख)
विशेष वसुली व विक्री अधिकारी
अहमदनगर जिल्हा पतसंस्थांचे सह. फेडरेशन मर्या,अ.नगर

# श्रीगोंदा रस्ते आदर्श तालुक्याकडे वाटचाल

■ चिखली-कोरेगाव पाच किलोमीटर शिव रस्त्याचे यशस्वी सीमांकन



श्रीगोंदा तालुका : (स. गांवकरी)

श्रीगोंदा तालुक्यातील चिखली-कोरेगाव परिसरातील शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वपूर्ण असलेल्या सुमारे पाच किलोमीटर लांबीच्या शिव रस्त्याचे यशस्वी सीमांकन करण्यात आले आहे. या सीमांकनामुळे परिसरातील शेतकऱ्यांच्या वहिवाटीचा मार्ग सुकर होणार असून शेती विकासालाही चालना मिळणार आहे. उपविभागीय अधिकारी श्रीकुमार चिंचकर (श्रीगोंदा-पारनेर), तहसीलदार सचिन डोंगरे (श्रीगोंदा) तसेच भूमी अभिलेख विभागाचे उपअधीक्षक अविनाश मिसाळ यांच्या आदेशानुसार आणि शिव पाणंद शेत रस्ते चळवळीचे मार्गदर्शक दादासाहेब जंगले पाटील व गोरख कडूस पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मोजणी अधिकारी वासुदेव पाटील यांनी या रस्त्याचे सीमांकन पूर्ण केले. या रस्त्यासाठी चिखली गावचे सरपंच कुलदीप भैय्या कदम पाटील, अजिंक्य झेंडे सर आणि रामदास झेंडे सर यांनी गेल्या तीन ते चार वर्षांपासून सातत्याने पाठपुरावा केला होता. विविध अडचणींवर मात करत त्यांनी शिव पाणंद चळवळ आणि प्रशासनाशी समन्वय साधून शेतकऱ्यांच्या हक्काच्या रस्त्यासाठी प्रयत्न केले.

त्यांच्या चिकाटीचे फळ अखेर मिळाले असून हा दिवस चिखली व कोरेगाव परिसरातील शेतकऱ्यांसाठी ऐतिहासिक ठरला आहे. सीमांकनावेळी दादासाहेब जंगले पाटील, वासुदेव पाटील, ग्राम महसूल अधिकारी भूषण कनगरे, बेलवंडी पोलीस स्टेशनचे अधिकारी वाघ व पवार, सरपंच कुलदीप कदम, उपसरपंच अक्षय बोखारे, माजी सरपंच मच्छिंद्र झेंडे, सामाजिक कार्यकर्त्या मनाली झेंडे पाटील, तंटामुक्ती अध्यक्ष केशव झेंडे, उपाध्यक्ष शिवाजी झेंडे यांच्यासह गोवर्धन कार्ले, विजयसिंह पाटील, सुहास झेंडे, विक्रम झेंडे, प्रदीप कार्ले, अंबादास कार्ले, अशोक झेंडे, ज्ञानेश्वर झेंडे, राजू शेख, सदाशिव ताठे, संभाजी कदम, दीपक झेंडे, जालिंदर झेंडे, विष्णू झेंडे, संदीप कासार, पप्पू कर्पे, केशव चौधरी तसेच शिवलगतचे शेतकरी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**खडवली (प्रतिनिधी) :** कल्याण तालुक्यातील खडवली आणि राया गावांमध्ये उभारण्यात आलेल्या अनधिकृत बांधकामांवर महसूल प्रशासनाने मोठी कारवाई करत अनेक गाळे निष्कासित केले. जिल्हाधिकारी ठाणे श्रीकृष्ण पांचाळ यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबविण्यात आली.

## थोडक्यात बातम्या...



### आईसह दोन चिमुकल्यांची विहिरीत उडी; तिघांचा दुर्दैवी मृत्यू

आंबेगाव (स. गांवकरी) : आंबेगाव तालुक्यातील गोहे बुद्रुक येथे अत्यंत दुर्दैवी घटना घडली असून एका महिलेने आपल्या दोन लहान मुलांसह विहिरीत उडी मारून जीवन संपवल्याची घटना समोर आली आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. मृतांमध्ये अश्विनी तानाजी वाळकोळी, अक्षिता तानाजी वाळकोळी आणि कार्तिक तानाजी वाळकोळी यांचा समावेश आहे. घटनेचे नेमके कारण अद्याप समजू शकलेले नाही. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी आणि संबंधित यंत्रणांनी तिघांना बाहेर काढून तातडीने घोडेगाव प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारासाठी दाखल केले. मात्र वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणीनंतर तिघांनाही मृत घोषित केले. या घटनेबाबत पोलिसांकडून अधिक तपास सुरू असून आत्महत्येमागील कारणांचा शोध घेतला जात आहे. अचानक घडलेल्या या घटनेने गोहे बुद्रुक परिसरात शोककळा पसरली आहे.

### विकासासाठी कटिबद्ध; उर्वरित प्रश्न सोडविण्यावर भर देणार : तटकरे



चिपळूण (स. गांवकरी) : कोकण स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून विधान परिषदेवर बिनविरोध निवड झाल्यानंतर आमदार अनिकेत तटकरे यांनी चिपळूण येथे पत्रकारांशी संवाद साधताना महाविकास आघाडीचे उमेदवार बाळ माने यांच्या भूमिकेचे स्वागत करत त्यांचे मनापासून आभार मानले. कोकणच्या विकासाशी संबंधित उर्वरित प्रश्न सोडविण्यासाठी आपण प्राधान्याने काम करणार असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले. अनिकेत तटकरे म्हणाले की, या निवडणुकीत महायुतीतील सर्व घटक पक्षांच्या नेत्यांनी, पदाधिकाऱ्यांनी आणि लोकप्रतिनिधींनी दिलेल्या पाठिंब्यामुळेच ही बिनविरोध निवड शक्य झाली. यासाठी त्यांनी महायुतीच्या सर्व नेत्यांचे, कार्यकर्त्यांचे तसेच मतदारसंघातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रतिनिधींचे आभार व्यक्त केले. महाविकास आघाडीचे उमेदवार बाळ माने यांनी उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा घेतलेला निर्णय हा लोकशाही प्रक्रियेत महत्त्वाचा असल्याचे सांगत तटकरे यांनी त्यांच्या भूमिकेचे स्वागत केले. "बाळ माने यांनी घेतलेल्या निर्णयामुळे निवडणूक बिनविरोध झाली. त्याबद्दल त्यांचे मनापासून आभार मानतो," असे ते म्हणाले.

### आरटीई २५ टक्के प्रवेश प्रक्रिया २०२६-२७ : दुसऱ्या फेरीस प्रारंभ

ठाणे (स. गांवकरी) : शिक्षण हक्क कायदा (RTE) २००९ अंतर्गत खासगी विनाअनुदानित शाळांमधील २५ टक्के राखीव जागांवरील प्रवेश प्रक्रिया २०२६-२७ साठी प्रतीक्षाधीन यादीतील (Waiting List) दुसऱ्या फेरीस दि. ०४ जून, २०२६ ते १२ जून, २०२६ पर्यंत कालावधी देण्यात आला आहे. राज्य शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या निर्देशानुसार आणि शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य यांच्या मार्गदर्शनाखाली ही प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे. पहिल्या फेरीतील प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर रिक्त राहिलेल्या जागांवर प्रतीक्षाधीन यादीतील पात्र विद्यार्थ्यांना प्रवेशाची संधी उपलब्ध करून देण्यासाठी दुसरी फेरी सुरू करण्यात आली आहे. या फेरीमध्ये निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांनी आरटीई प्रवेश पोर्टलवर उपलब्ध माहितीनुसार निश्चित कालावधीत संबंधित शाळेत आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहून प्रवेश प्रक्रिया पूर्ण करावी. मुदतीत प्रवेश निश्चित न केल्यास संबंधित जागा पुढील पात्र विद्यार्थ्यास उपलब्ध करून दिली जाईल. पालकांनी प्रवेश प्रक्रियेसाठी आवश्यक असलेली कागदपत्रे, निवासाचा पुरावा, जन्मनोंद प्रमाणपत्र, आधार कार्ड तसेच शासनाने निर्देशित केलेली इतर कागदपत्रे तयार ठेवावीत. प्रवेश प्रक्रियेदरम्यान कोणतीही अडचण आल्यास संबंधित गटशिक्षणाधिकारी कार्यालय, शिक्षण विभाग अथवा आरटीई हेल्पडेस्कशी संपर्क साधावा. आरटीई अंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल व वंचित घटकांतील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्याचा शासनाचा उद्देश असून, पात्र पालकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन शिक्षण विभागामार्फत करण्यात आले आहे. "शिक्षणाचा अधिकार प्रत्येक बालकाचा मूलभूत हक्क आहे. आरटीई प्रवेश प्रक्रियेच्या माध्यमातून गुणवत्तापूर्ण शिक्षणाची संधी समाजातील वंचित व दुर्बल घटकांपर्यंत पोहोचत आहे. प्रतीक्षाधीन यादीतील दुसऱ्या फेरीत निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांनी विहित मुदतीत प्रवेश प्रक्रिया पूर्ण करून या संधीचा लाभ घ्यावा," असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांनी केले आहे.

# अकोले शिवाजी महाराज बसस्थानक राज्यात प्रथम

अकोले : (स. गांवकरी)



महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या "हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ, सुंदर बसस्थानक स्पर्धा २०२५-२६" मध्ये अकोले येथील शिवाजी महाराज बसस्थानकाने राज्यस्तरावर प्रथम क्रमांक पटकावत २५ लाख रुपयांचे पारितोषिक मिळविले आहे. तसेच नाशिक प्रादेशिक स्तरावरही प्रथम क्रमांक मिळवत १ लाख रुपयांचे अतिरिक्त पारितोषिक प्राप्त केले असून एकूण २६ लाख रुपयांचा मानाचा पुरस्कार अकोले आगाराच्या नावावर झाला आहे.

प्रवाशांना स्वच्छ, सुंदर व दर्जेदार सुविधा असलेली बसस्थानके उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या मार्गदर्शनाखाली ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. राज्यातील २५१ आगारांमध्ये ही स्पर्धा राबविण्यात आली. बसफेऱ्यांच्या संख्येनुसार अ, ब आणि क अशा तीन गटांमध्ये बसस्थानकांचे वर्गीकरण करण्यात आले होते. दर तीन महिन्यांनी महामंडळाच्या मध्यवर्ती कार्यालयाने नियुक्त केलेल्या समितीकडून प्रत्यक्ष पाहणी करून गुणांकन करण्यात आले. अहिल्यानगर विभागातील अकोले आगाराने कल्पकता, स्वच्छता आणि सुशोभीकरणाच्या माध्यमातून बसस्थानकाचा कायापालट केला. बसस्थानक परिसर स्वच्छ, आकर्षक व प्रवाशाभिमुख करण्यासाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. या अभियानात अकोले विधानसभा मतदारसंघाचे आमदार किरण लहामटे यांनी वेळोवेळी भेट देत मार्गदर्शन केले, तर विविध सामाजिक संघटनांनीही सक्रिय सहभाग नोंदविला.

आगार व्यवस्थापक सुरेश दराडे यांनी कर्मचाऱ्यांना महामंडळाचा अतिरिक्त आर्थिक निधी न वापरता श्रमदान व स्वखर्चातून योगदान देण्याचे आवाहन केले होते. त्यास उत्स्फूर्त प्रतिसाद देत अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सामूहिक श्रमदान आणि आर्थिक सहकार्याद्वारे हे अभियान यशस्वी केले.

स्पर्धेचा अंतिम निकाल २९ मे २०२६ रोजी जाहीर झाला. त्यानुसार अकोले शिवाजी महाराज बसस्थानकाने राज्यस्तरावर आणि नाशिक प्रादेशिक स्तरावर प्रथम क्रमांक पटकावला. राज्य परिवहन महामंडळाच्या ७८ व्या वर्धापनदिनानिमित्त १ जून २०२६ रोजी मुंबई येथे आयोजित कार्यक्रमात परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते आगार व्यवस्थापक सुरेश दराडे यांना चषक, प्रशस्तिपत्र व पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले.

या यशाची बातमी समजताच अकोले आगार परिसरात विद्युत रोषणाई, फटाक्यांची आतषबाजी आणि जल्लोष करण्यात आला. प्रवासी, चालक, वाहक, कर्मचारी तसेच विविध सामाजिक संघटनांनी आनंद व्यक्त करत अकोले आगाराच्या कार्याचा गौरव केला. स्वच्छता, सुशोभीकरण आणि प्रवाशांसाठी उपलब्ध करून दिलेल्या उत्कृष्ट सुविधांमुळे अकोले शिवाजी महाराज बसस्थानक आज राज्यातील आदर्श बसस्थानक म्हणून ओळखले जात आहे.

# जिल्हाधिकाऱ्यांचा मुक्काम; ग्रामस्थांशी साधला थेट संवाद

नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)

'एक दिवस मुक्काम खेड्यामध्ये' या उपक्रमांतर्गत जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी काल रात्री ३ जून रोजी नांदेड तालुक्यातील लिंबगाव येथे भेट देऊन मुक्काम केला. यावेळी त्यांनी गावातील विविध कामांची पाहणी करत ग्रामस्थांशी थेट संवाद साधला. जिल्हाधिकारी कर्डिले यांनी प्राथमिक आरोग्य केंद्र, स्मशानभूमी परिसरातील वृक्षारोपण, घरकुल लाभार्थी, संजय गांधी व इंदिरा गांधी निराधार योजनेचे लाभार्थी तसेच अंत्योदय योजनेतील कुटुंबांना प्रत्यक्ष भेट दिली.

गावातील विविध समस्या आणि नागरिकांच्या अडचणी जाणून घेण्यासाठी बैठक घेण्यात आली. यामध्ये स्थानिक प्रश्नांवर चर्चा करून संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना देण्यात आल्या. यावेळी उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ, तहसीलदार संजय वारकड, गटविकास अधिकारी प्रवीण सुरडकर, तालुका कृषी अधिकारी संजय चातरमल, सहाय्यक पोलीस निरीक्षक बोधनकर, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. मुंडे, ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे उपअभियंता देशमुख, नायब तहसीलदार स्वप्निल दिगलवार व सुनील माचेवाड, पोलीस उपनिरीक्षक सय्यद, मंडळ अधिकारी अनिरुद्ध जोंधळे, तलाठी अंजुषा जाधव यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. ग्रामस्थांशी संवाद साधताना जिल्हाधिकारी राहूल कर्डिले यांनी विविध कल्याणकारी योजनांची माहिती दिली. तसेच शेतीतील आधुनिक तंत्रज्ञान, नवीन संशोधन, पीककर्ज आणि पीकविमा योजनांबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.

# अशोक कांडेकर यांचा भगवानराव पाचपुते यांच्या हस्ते सन्मान



श्रीगोंदा : (स. गांवकरी)

काष्टी येथील स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या नवभारत माध्यमिक विद्यालय, आनंदवाडी (गणेशा) येथील विद्यार्थिनी कु. वेदिका दिगांबर नलवडे हिने दहावीच्या परीक्षेत गणित विषयात १०० पैकी १०० गुण मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले. या यशामागे मार्गदर्शन करणारे गणित विषयतज्ज्ञ शिक्षक अशोक कांडेकर यांचा संस्थेचे अध्यक्ष भगवानराव (आबा) पाचपुते यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी बोलताना अध्यक्ष भगवानराव (आबा) पाचपुते यांनी सांगितले की, संस्थेच्या शाळांनी गुणवत्तापूर्ण निकालाची परंपरा कायम राखली असून ग्रामीण भागातील विद्यालये असतानाही विद्यार्थ्यांनी शैक्षणिक गुणवत्तेत आघाडी कायम ठेवली आहे. भविष्यातही ही यशस्वी परंपरा अधिक जोमाने सुरू ठेवावी, असे आवाहन त्यांनी केले.

या कार्यक्रमास संस्थेचे विश्वस्त ॲड. प्रताप पाचपुते, नवभारत माध्यमिक विद्यालय आनंदवाडीचे मुख्याध्यापक सुनील गिरमकर, मुख्याध्यापक रविंद्र पवार, मुख्याध्यापक शिवाजी उदार, नामदेव सोनटक्के, सुजाता दिवेकर, राहुल साळवे, जालिंदर कोळेकर, सुशांत शिंदे यांच्यासह शिक्षक व मान्यवर उपस्थित होते.

# विदेशी मद्य रॅकेट उघडकीस, ४.५० लाखांचा मुद्देमाल हस्तगत

नारायणगाव: (स. गांवकरी)



जुन्नर तालुक्यात बनावट विदेशी मद्याची वाहतूक आणि साठा करणाऱ्या एका रॅकेटचा राज्य उत्पादन शुल्क विभागाने पर्दाफाश केला आहे. या कारवाईत एका मुख्य आरोपीसह त्याला रिकाम्या बाटल्या पुरवणाऱ्या भंगार विक्रेत्यालाही अटक करण्यात आली आहे.

उत्पादन शुल्क विभागाच्या नारायणगाव पथकाने या कारवाईत बनावट दारू, रिकाम्या बाटल्या, बुचे आणि एक वॅगनआर कार असा एकूण ४ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी गोविंद शंकर जाधव (रा. निरगुडे, ता. जुन्नर, जि. पुणे) असे अटक करण्यात आलेल्या मुख्य आरोपीचे नाव आहे.

राज्य उत्पादन शुल्क विभागाचे आयुक्त डॉ. राजेंद्र देशमुख, सहआयुक्त प्रसाद सुर्वे, विभागीय उपआयुक्त सागर धोमकर आणि अधीक्षक अतुल कानडे यांच्या आदेशानुसार, ३० मे रोजी नारायणगाव विभागाचे पथक गस्त घालत होते.

यावेळी जुन्नर-गणेशखिंड रोडने एका कारमधून बनावट दारूची वाहतूक होणार असल्याची गुप्त माहिती या पथकाला मिळाली.मिळालेल्या माहितीनुसार,अधिकाऱ्यांनी गणेशखिंड रोडवर सापळा रचला. जुन्नरकडून येणारी संशयास्पद वॅगनआर कार (क्र. MH 01 AX 2884) थांबवून पंचांसमक्ष तिची झडती घेतली असता, त्यात चंदीगड राज्य निर्मितीचे लेबल असलेला बनावट विदेशी मद्याचा मोठा साठा आढळला.

यातील आरोपी गोविंद जाधव याला ताब्यात घेऊन त्याची कसून चौकशी केली असता, त्याने शिरोली खुर्द येथील त्याच्या मद्य निर्मिती तळाची माहिती दिली. उत्पादन शुल्क विभागाने तात्काळ शिरोली खुर्द येथे छापा टाकला. या छाप्यात बनावट दारू तयार करण्याचे साहित्य आणि मोठा साठा जप्त करण्यात आला.जप्त करण्यात आलेला मुद्देमाल पुढील प्रमाणे:

इम्पिरियल ब्लू व्हिस्की: १८० मिलीच्या ६० सीलबंद बनावट बाटल्या (बनावट बुचे व लेबलसह).

रॉयल स्टॅग व्हिस्की: १८० मिलीच्या १७३ सीलबंद बनावट बाटल्या.

युके नं. १ व्हिस्की (चंदीगड राज्य निर्मित): ७५० मिलीच्या ९६ सीलबंद बनावट बाटल्या.

मोठ्या प्रमाणावर बनावट बुचे, लेबल्स आणि रिकाम्या बाटल्या.

एक वॅगनआर कार आणि वनप्लस कंपनीचा मोबाईल.

पुण्याचे अधीक्षक आणि शिरूर विभागाच्या उप-अधीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली नारायणगावचे निरीक्षक शरद जाधव, दुय्यम निरीक्षक सौरभ आवटे, समृद्धी निकम, सहाय्यक दुय्यम निरीक्षक दयानंद माने तसेच जवान निलेश केदार, दिलीप केकरे, प्रियांका झांज आणि गणेश वाव्हळ यांच्या पथकाने ही यशस्वी कारवाई केली. या गुन्ह्याचा पुढील तपास दुय्यम निरीक्षक सौरभ आवटे करत आहेत.

# सुबोध भावे अभिनीत 'श्री बाबा नीब करोरी महाराज' ला उदंड प्रतिसाद

पुणे : (स. गांवकरी)



२९ मे २०२६ रोजी प्रदर्शित झालेल्या 'श्री बाबा नीब करोरी महाराज' या चित्रपटाला प्रेक्षकांकडून अत्यंत उबदार प्रतिसाद मिळत आहे. प्रेक्षक या चित्रपटातील आध्यात्मिक खोली, भावस्पर्शी कथाकथन आणि प्रामाणिक अभिनयाचे विशेष कौतुक करत आहेत. आदरणीय नीम करोली बाबा यांचे जीवन, त्यांची शिकवण आणि त्यांचा वारसा अत्यंत भक्तीभावाने व अस्सलतेने मोठ्या पडद्यावर मांडल्याबद्दल सोशल मीडियावर प्रेक्षक या चित्रपटाची भरभरून प्रशंसा करत आहेत. नीम करोली बाबा यांची भूमिका साकारणारे अभिनेते सुबोध भावे यांच्यावर विशेष कौतुकाचा वर्षाव होत आहे; त्यांच्या शांत, तल्लीन आणि मनाचा ठाव घेणाऱ्या अभिनयाचे सर्वत्र कौतुक होत आहे. आपल्या दमदार अभिनयासाठी आणि चरित्रपटांमधील भूमिकांसाठी ओळखल्या जाणाऱ्या भावे यांनी या आध्यात्मिक व्यक्तिमत्त्वात केलेले रूपांतर प्रेक्षकांच्या मनाला खोलवर भिडले आहे. ही भूमिका स्वीकारण्याबाबत यापूर्वी बोलताना सुबोध भावे यांनी सांगितले होते, "जेव्हा शरदजींना हा चित्रपट बनवायचा होता, तेव्हा ते गेल्या ४-५ वर्षांपासून त्यावर काम करत होते. त्यांनी यापूर्वीही कलाकार आणि तंत्रज्ञांना एकत्र आणण्याचा प्रयत्न केला होता, पण तो यशस्वी झाला नाही. जानेवारी २०२५ मध्ये, एका लेखक मित्राद्वारे मला समजले की त्यांना मला भेटायचे आहे. जेव्हा आमची भेट झाली, तेव्हा त्यांनी मला बाबांवर चित्रपट बनवण्याबाबतची त्यांची संकल्पना (व्हिजन) सांगितली आणि ही भूमिका मीच साकारवी अशी इच्छा व्यक्त केली. त्यावेळी मला त्यांच्याबद्दल फारशी माहिती नव्हती—मी केवळ त्यांचा एक छायाचित्र पाहिले होते आणि त्यांच्याबद्दल वरकरणी ऐकले होते. शरदजींच्या माध्यमातूनच मला बाबांचा आणि त्यांच्या जीवनाचा खऱ्या अर्थाने परिचय झाला."

एका संताची भूमिका साकारण्याबाबत विचार व्यक्त करताना भावे यांनी या गोष्टीवर भर दिला होता, "मला नेहमीच असे वाटते की, जेव्हा आपण एखाद्या संतावर चित्रपट बनवत असतो, तेव्हा अभिनेता त्या पात्राची निवड करत नाही; तर ते पात्रच अभिनेत्याची निवड करते. माझ्या बाबतीतही, मला असे वाटते की बाबांनीच मला त्यांची भूमिका साकारण्यासाठी निवडले."

या अभिनेत्याने दिग्दर्शक शरद सिंग ठाकूर यांची अनेक वर्षांची निष्ठा आणि संशोधन यालाही यशाचे श्रेय दिले. "शरदजींनी बाबांचे जीवन समजून घेण्यात अनेक वर्षे घालवली—त्यांच्यासोबत प्रत्यक्ष राहिलेल्या लोकांना ते भेटले, इतकेच नव्हे तर त्यांनी बाबांच्या कुटुंबीयांशीही संवाद साधला. त्या वर्षांमध्ये त्यांनी केलेल्या प्रत्येक अभ्यासाचा आणि जमा केलेल्या प्रत्येक तपशीलाचा त्यांनी माझ्याशी संवाद साधताना उल्लेख केला. जेव्हा तुमचा दिग्दर्शक इतक्या सखोल तयारीसह तुमच्यासमोर येतो, तेव्हा तुम्हाला इतरत्र कुठेही पाहण्याची किंवा शोधाशोध करण्याची गरज उरत नाही. तुम्ही केवळ त्यांचे म्हणणे ऐकता आणि ती सर्व माहिती आपल्या अंतर्मनात सामावून घेता." या भूमिकेकडे पाहण्याचा आपला दृष्टिकोन स्पष्ट करताना भावे यांनी नमूद केले होते, "एक अभिनेता म्हणून, तुम्हाला अनेकदा 'अभिनय' करण्याची इच्छा असते; परंतु इथे मात्र तुम्हाला काहीच करावे लागत नाही.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे - ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

आंतरभारती रुरल इंटरनॅशनल मेडिकल एज्युकेशन ट्रस्ट संचलित,

# आनंदगड शैक्षणिक संकुल

आनंदगड, वीरगाव ता. अकोले, जि. अहिल्यानगर



२५ गौरवमहोत्सवी वर्ष
वर्ष १९९९-२०२४

पाल्याच्या उज्वल भविष्यासाठी आनंदगड शैक्षणिक संकुल येथे स्वप्न प्रत्यक्षात साकारले जातात!

(D.T.E., MSBTE, DBAT University P.C.I. Approved)

DTE Code 5480

## मातोश्री राधा कॉलेज ऑफ फार्मसी

| | डी फार्मसी | बी फार्मसी |
|---|---|---|
| पात्रता | १२ वी पास (PCB / PCM) | १२ वी पास (PCB / PCM & CET) |
| कालावधी | २ वर्ष | ४ वर्ष |
| प्र.क्षमता | ६० विद्यार्थी | ६० विद्यार्थी |

विद्यार्थ्यांसाठी बस सुविधा उपलब्ध!

- संपर्क -
7709203202
9421190696 I 9689758321

ग्रामीण महाराष्ट्रातील ISO मानांकित शाळा



## धर्मवीर आनंद दिघे इंग्लिश मिडिअम स्कुल अॅण्ड ज्युनिअर कॉलेज

के जी ते १२ वी विज्ञान शाखा
(इंग्रजी माध्यम)

अत्यल्प फी सर्वोत्कृष्ठ शिक्षण



आपल्या पाल्याच्या शालेय प्रवेशासाठी संस्कारक्षम इंग्रजी माध्यमाची प्रयोगशील शाळा

- संपर्क -
9158077688
7875074070 I 9975276670

## आनंदगड पॉलिटेक्निक कॉलेज

पत्ता: आनंदगड शैक्षणिक संकुल, आनंदगड, वीरगांव, ता. अकोले, जि. अहिल्यानगर
DTE, Govt of Maharashtra M.S.B.T.E., Mumbai AICTE, New Delhi Approved

DTE Code 05662

- सिव्हिल इंजिनिअरिंग 60
- मॅकेनिकल इंजिनिअरिंग 60
- कॉम्प्युटर इंजिनिअरिंग 60
- इलेक्ट्रिकल अॅण्ड इलेक्ट्रॉनिक्स 60
- आर्टिफिशीअल इंटेलिजीअंस अॅण्ड मशीन लर्निंग 60

- संपर्क -
9209645837 I 9922545516
9765431168 I 7028724045 I 9922161686



महाराष्ट्र शासन वैद्यकिय शिक्षण व
औषधी द्रव्य विभाग महाराष्ट्र कौन्सिल ऑफ अॅक्युपंक्चर, मुंबई
- मान्यता प्राप्त वैद्यकीय अभ्यासक्रम -

Anandgad Virgaon

## मातोश्री गंगुबाई शिंदे अॅक्यूपंक्चर कॉलेज अॅण्ड हॉस्पिटल

डिप्लोमा इन अॅक्युपंक्चर थेरपी (DAT)

| | |
|---|---|
| प्रवेश क्षमता | ५० विद्यार्थी |
| डिप्लोमा कालावधी | २ वर्षे |
| शैक्षणिक पात्रता | इ. १२ वी पास |

सुविधा
- सर्व सुविधायुक्त भव्य कॉलेज व हॉस्पिटल इमारत
- तज्ञ व अनुभवी प्राध्यापक व अॅक्युपंक्चरिस्ट
- अॅक्युपंक्चर उपचार पद्धती सुविधा
- वसतिगृह सुविधा उपलब्ध

- संपर्क -
9011271729
9834719663 I 7028724045

॥ सुजाता ॥ अकोले 9970095289

# थोडक्यात पण महत्वाचे




## पत्नीच्या वाढदिवसानिमित्त भानुदास कोतकर यांनी दिली हेलिकॉप्टरची भेट

केडगाव (स. गांवकरी) : नगर कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती भानुदास कोतकर यांनी आपल्या पत्नी, जिल्हा बँकेच्या संचालिका सुरेखा कोतकर यांना त्यांच्या वाढदिवसानिमित्त हेलिकॉप्टर भेट म्हणून दिले. यामुळे कोतकर कुटुंबाच्या वाहन ताफ्यात हेलिकॉप्टरची भर पडली आहे. आज केडगाव येथे या हेलिकॉप्टरसाठी खास हेलिपॅड तयार करण्यात आले होते. हेलिकॉप्टर केडगावात दाखल होताच कोतकर दाम्पत्याने त्याची विधिवत पूजा केली. पूजेनंतर या हेलिकॉप्टरने हवेत भरारी घेऊन केडगावच्या रेणुका माता मंदिर, शहराचे आराध्य दैवत श्री विशाल गणपती मंदिर व माळीवाड्यातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्यावर पुष्पवृष्टी करण्यात आली. नगर, पुणे, मुंबई येथे हॉटेल व्यवसायात नावलौकिक असलेल्या कोतकर कुटुंबाचे स्वतःचे खासगी हेलिकॉप्टर खरेदी करण्याचे अनेक वर्षांचे स्वप्न होते. ते आज पूर्ण झाले, अशी भावना उद्योजक सचिन कोतकर यांनी व्यक्त केली. लवकरच खासगी हेलिकॉप्टर कंपनी स्थापन करून अलिशान हेलिपॅड उभारले जाणार आहे. केडगावच्या कोतकर कुटुंबाने हॉटेल व्यवसायात मोठा नावलौकिक कमावला आहे. त्यांच्या 'संदीप हॉटेल' ब्रॅन्डला अनेक पुरस्कार मिळाले आहेत. भानुदास कोतकर यांचे तीनही पुत्र हॉटेल व्यवसाय सांभाळतात. नगरचे माजी महापौर संदीप कोतकर सध्या पुण्यातील हॉटेल व्यवसायात आघाडीवर आहेत.

## नगर शहरातील बोल्हेगाव परिसरात दोन गटांत हाणामारी; सहा जण जखमी

अहिल्यानगर (स. गांवकरी) : शहरातील बोल्हेगाव परिसरातील खंडोबानगर येथील मोरया पार्क हाऊसिंग सोसायटीमध्ये सामाईक बोअरवेलच्या मोटरची पिन काढण्याच्या कारणावरून दोन शेजारी कुटुंबांमध्ये वाद होऊन तो हाणामारीपर्यंत पोहोचला. या प्रकरणात दोन्ही बाजूंनी एकमेकांविरोधात फिर्याद दिल्याने तोफखाना पोलीस ठाण्यात परस्परविरोधी दोन गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. दोन गटाचे सहा जण जखमी झाले आहेत. महादेव जालिंदर साळुंके यांनी दिलेल्या फिर्यादीवरून बबलू युनुस शेख, त्यांची पत्नी मुस्कान शेख, मुलगा अयान शेख, पप्पू नावाच्या व्यक्तीसह अन्य काही जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संशयित आरोपींनी घरात घुसून शिवीगाळ करत मारहाण केली तसेच जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. मारहाणीत फिर्यादीची पत्नी, बहिण, मेव्हणे व मुलगा जखमी झाले आहेत.

## अहिल्यानगर जिल्हा पोलीस दलातील अंमलदारांच्या बदल्यांना मुहूर्त



अहिल्यानगर (स. गांवकरी) : जिल्हा पोलीस दलातील चालू वर्षीच्या प्रशासकीय बदली प्रक्रियेला अखेर मुहूर्त मिळाला असून पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी गुरूवारी (४ जून) पोलीस मुख्यालयात बदली दरबार आयोजित केला आहे. या प्रक्रियेत जिल्ह्यातील सुमारे ३०० पोलीस अंमलदारांच्या बदल्या करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. एका पोलीस ठाण्यात किंवा शाखेत सलग अथवा खंडित स्वरूपात पाच वर्षे सेवा पूर्ण केलेल्या अंमलदारांकडून यापूर्वीच तीन पसंतीच्या ठिकाणांसह अर्ज मागविण्यात आले होते. तत्कालीन पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या कार्यकाळात ही प्रक्रिया सुरू झाली होती. मात्र, ३० एप्रिल रोजी त्यांच्या बदलीनंतर अंमलदारांच्या बदल्या रखडल्या होत्या. नव्याने रूजू झालेले पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी ही प्रक्रिया पुन्हा गतीमान केली आहे. बदलीपात्र अंमलदारांना गुरूवारी सकाळी ७.३० वाजता पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर उपस्थित राहण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. प्रत्येक अंमलदाराची भूमिका जाणून घेऊन तसेच त्यांच्या पसंतीच्या ठिकाणांचा विचार करून बदल्या करण्यात येणार असल्याचे समजते. या प्रक्रियेत पोलीस शिपाई, पोलीस नाईक, पोलीस हवालदार, सहायक पोलीस उपनिरीक्षक तसेच श्रेणी पोलीस उपनिरीक्षक पदावरील अंमलदारांचा समावेश आहे. एका पोलीस ठाण्यात पाच वर्षे सेवा पूर्ण केलेले, एका तालुक्यातील विविध पोलीस ठाण्यांमध्ये एकूण १२ वर्षांचा कालावधी पूर्ण केलेले तसेच विविध शाखांमध्ये पाच वर्षांपेक्षा अधिक सेवा बजावलेले अंमलदार बदलीस पात्र ठरले आहेत.

## माजी आमदार शंकरराव गडाखांवर विविध मुद्यावर टिका

अहिल्यानगर (स. गांवकरी) : मुळा सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीच्या प्रचाराला अद्याप सुरुवात झालेली नाही. परंतु राजकीय आरोप-प्रत्यारोपांमुळे वातावरण तापू लागले आहे. विरोधी गटाकडून माजी आमदार शंकरराव गडाख यांच्यावर विविध मुद्द्यांवर टीका केली जात आहे. विशेष म्हणजे या आरोपांचे पडसाद आता समाजमाध्यमांवरही उमटू लागले असून विविध पोस्ट, व्हिडीओ आणि संदेश मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहेत. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कारखान्याच्या कामकाजापासून विकासाच्या मुद्द्यांपर्यंत अनेक विषय चर्चेत आहेत. मात्र सध्या मतदारांमध्ये आणि समाजमाध्यमांवर सर्वाधिक चर्चा होत आहे ती 'बियाण्या' च्या मुद्द्याची. निवडणुकीशी थेट संबंध नसलेल्या या विषयाने अचानक प्रवेश केल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. विरोधकांकडून करण्यात येणाऱ्या पोस्टला उत्तर देताना समर्थकांकडून 'बियाण्या' संदर्भातील पोस्ट टाकल्या जात असल्याचे चित्र दिसून येत आहे. त्यामुळे केंद्रबिंदू विकास, कारखान्याचे भविष्य आणि सभासदांचे प्रश्न यापेक्षा सोशल मीडियावरील पोस्टयुद्धाकडे वळल्याची चर्चा सुरू झाली आहे. दोन्ही गटांकडून सोशल मीडियाचा प्रभावी वापर केला जात असून मतदारांचे लक्ष वेधून घेण्यासाठी विविध प्रकारचे संदेश प्रसारित केले जात आहेत. काही पोस्टमध्ये राजकीय टोलेबाजी, तर काही ठिकाणी उपरोधिक भाषेचा वापर करून एकमेकांवर निशाणा साधला जात आहे. त्यामुळे निवडणूक प्रचार अधिकच रंगतदार बनला आहे. राजकीय जाणकारांच्या मते, सहकारी क्षेत्रातील निवडणुकांमध्ये पूर्वी सभांमधून आणि प्रत्यक्ष भेटींमधून प्रचार होत असे. मात्र आता सोशल मीडिया हे प्रभावी शस्त्र बनले असून मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी त्याचा मोठ्या प्रमाणावर वापर होत आहे. मुळा कारखान्याच्या निवडणुकीतही हेच चित्र पाहायला मिळत आहे. दरम्यान, मतदारांमध्येही या पोस्टची चर्चा रंगू लागली असून आरोप-प्रत्यारोपांना उत्तर देताना 'बियाण्या'चा मुद्दा पुढे आणला जात असल्याने प्रचारात वेगळीच रंगत निर्माण झाली आहे. येत्या काही दिवसांत प्रचार अधिक तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात असून सोशल मीडियावरील हे पोस्टयुद्ध निवडणुकीच्या निकालावर कितपत परिणाम करते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# अविनाश मडीखांबे यांनी घेतली रामदास आठवले यांची सदिच्छा भेट

सोलापूर : (स. गांवकरी)



अक्कलकोटचे नगरसेवक तथा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया चे ,(आठवले गट) अक्कलकोट तालुका अध्यक्ष अविनाश मडीखांबे यांनी संविधान बंगला मुंबई येथे रामदास आठवले साहेब यांची सदिच्छा भेट घेतली या भेटीत रामदास आठवले साहेब यांनी अक्कलकोट च्या रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या कार्याबद्दल समाधान व्यक्त करून अविनाश मडीखांबे यांचे अक्कलकोट तालुक्यात कार्य अतिशय चांगले आहे असे गौरव उद्गार काढले आणि अविनाश मडीखांबे यांचे अभिनंदन देखील केले. अलीकडेच गेल्या चार दिवसांपूर्वी केंद्रीय मंत्री रामदास आठवले साहेब हे मोटारीने गुलबर्गा कडे जात होते. यावेळी त्यांचे अक्कलकोट शिरवळ वागदरी येथे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या वतीने असंख्य कार्यकर्ते नागरिक महिला यांनी उत्स्फूर्त स्वागत केले होते. याचा ही उल्लेख रामदास आठवले साहेब या वेळी करून म्हणाले की मला रस्त्यात अक्कलकोट शिरवळ वागदरी येथे कार्यकर्त्यांनी भेटून माझे स्वागत करून माझा मान सन्मान केला आहे. या बद्दल मी अतिशय भारावून गेलो आहे. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदासजी आठवले साहेबांची रिपाई आठवले अक्कलकोट तालुका अध्यक्ष तथा नगरसेवक अक्कलकोट नगर परिषद अविनाश मडिखांबे यांनी आठवले साहेब यांच्या संविधान निवासस्थानी सदिच्छा भेट घेतली या वेळी बोलताना रामदास आठवले साहेब म्हणाले की, अविनाश तू रिपब्लिकन पक्षाचे अक्कलकोट तालुक्यांमध्ये गावोगावी कार्यकर्त्यांचे मोठे जाळे उभे केले आहे या बद्दल तुझे खुप खुप अभिनंदन. असे मत आठवले साहेब यांनी यावेळी व्यक्त केले. आणि अविनाश मडीखांबे यांच्या कार्याचा गौरव केला.

# सचिन गढवे यांच्या सह ३ उपनिरीक्षक यांच्या बदल्या

नवीन नांदेड : (स. गांवकरी)



ग्रामीण पोलीस स्टेशन येथे कार्यरत सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन गढवे व उपनिरीक्षक महेश गायकवाड यांची लातूर येथे तर उपनिरीक्षक ज्ञानेश्वर मठवाड विमानतळ व ज्ञानेश्वर भोसले वजीराबाद येथे बदली झाली असून सहाय्यक पोलीस निरीक्षक रेखा काळे यांची एका वर्षासाठी बदलीसाठी स्थगिती देण्यात आली असून सपोनी गढवे यांना पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या उपस्थितीत कार्यमुक्त करण्यात येऊन त्यांना निरोप देण्यात आला. नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उप महानिरीक्षक शहाजी ऊमाप यांच्या आदेशानुसार विनंती वरून सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन गढवे व उपनिरीक्षक महेश गायकवाड यांची लातुरला बदली झाली आहे तर जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी जिल्हा अंतर्गत ग्रामीण पोलीस स्टेशन येथील उपनिरीक्षक ज्ञानेश्वर मठवाड विमानतळ व ज्ञानेश्वर भोसले यांची वजिराबाद पोलीस स्टेशन येथे बदली केली आहे, सहाय्यक पोलीस निरीक्षक रेखा काळे यांची एका वर्षासाठी बदलीसाठी स्थगिती देण्यात आली आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन गढवे हे ग्रामीण पोलीस स्टेशन येथे कार्यरत असतांना विविध आंदोलने, रास्ता रोको, विविध घटनांचा तपास कुशल पणे करून अनेक गुन्हे निकाली काढले आहेत, बदली झाल्यानंतर ग्रामीण पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी कार्यमुक्त केले.

# तामसा ग्रामपंचायत चार महिन्यांपासून प्रशासकाविना

तामसा : (स. गांवकरी)

- विकासकामे ठप्प, नागरिक संतप्त

तामसा ग्रामपंचायतीचा कारभार मागील चार महिन्यांपासून प्रशासकाविना सुरू असल्याने गावातील प्रशासन अक्षरशः वाऱ्यावर असल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. कार्यकाळ संपलेल्या सरपंचांनी प्रशासक पदाचा कार्यभार स्वीकारण्यास नकार दिल्याने ग्रामपंचायतीचा कारभार नेमका कोणाच्या नियंत्रणाखाली चालतो, असा प्रश्न नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे.

सुमारे २५ हजार लोकसंख्या असलेल्या तामसा गावात पिण्याचे पाणी, स्वच्छता, रस्ते, दिवाबत्ती, नालेसफाई यांसारख्या मूलभूत सुविधांचे प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत आहेत. प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे अनेक विकासकामे रखडली असून ग्रामपंचायत कार्यालयातील निर्णयप्रक्रियेलाही मोठा फटका बसत आहे. शासनाने कार्यकाळ संपलेल्या ग्रामपंचायतींवर ज्येष्ठ सरपंचांना प्रशासक म्हणून नियुक्त करण्याचे निर्देश दिले होते. मात्र अंतर्गत राजकीय वाद, गटबाजी आणि पदाच्या संघर्षामुळे तामसा ग्रामपंचायतीत अद्याप प्रशासकाची नियुक्ती होऊ शकलेली नाही. परिणामी ग्रामपंचायतीचा कारभार अधिकृत जबाबदार व्यक्तीशिवाय चालत असल्याचा आरोप होत आहे.

याच काळात ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा प्रश्नही गंभीर बनला आहे. अनेक महिन्यांपासून वेतन रखडल्यामुळे सफाई कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी पसरली असून कामकाजावर त्याचा परिणाम होत आहे. गावातील स्वच्छता व्यवस्था कोलमडण्याच्या मार्गावर असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

# अरबाज सय्यद यांचा भव्य सत्कार करून सन्मान

अहिल्यानगर (स. गांवकरी)



नगर तालुक्यातील नेप्ती येथील अत्यंत सामान्य आणि गरीब कुटुंबातील अरबाज जमीर सय्यद यांची मुंबई पोलीस पदी निवड झाल्याने संपूर्ण गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. कुटुंबाची आर्थिक परिस्थिती हलाखीची असतानाही मिळेल ते काम करत शिक्षण पूर्ण करून अरबाज यांनी मेहनत, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर हे यश संपादन केले. त्यांच्या या यशामुळे आई-वडिलांसह संपूर्ण नेप्ती गावाचा सन्मान वाढला असून ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा भव्य सत्कार करून गौरव करण्यात आला. पेढे वाटून फटाक्यांच्या आतषबाजीत ग्रामस्थांनी आनंद व्यक्त केला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी चेअरमन वसंत पवार होते. यावेळी ग्रामस्थांच्या वतीने प्राध्यापक एकनाथ होले सर यांच्या हस्ते अरबाज सय्यद यांचा सत्कार करून सन्मान करण्यात आला. कार्यक्रमास माजी उपसरपंच फारुक सय्यद, सरपंच संजय अशोक जपकर, माजी सरपंच संजय आसाराम जपकर, समता परिषदेचे नेते रामदास फुले, माजी उपसरपंच दादू चौगुले, जालिंदर शिंदे, जिल्हा नियोजन समिती सदस्य शिवाजी होळकर, माजी चेअरमन वसंत पवार, पोलीस पाटील अरुण होले, ग्रामपंचायत सदस्य बंडू जपकर, अतुल जपकर, प्राध्यापक बाबूलाल सय्यद, जमीर सय्यद, जावेद सय्यद, मोबीन सय्यद, सोन्याबापू कानडे, बाळासाहेब जपकर , रफिक सय्यद नाले हैदर यंग पार्टी व दोस्ती तरुण मंडळाचे कार्यकर्ते व परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी अरबाज सय्यद यांच्या कार्याचे कौतुक करत त्यांच्या पुढील सेवेस शुभेच्छा दिल्या.

आजच्या स्पर्धेच्या युगात ग्रामीण भागातील युवकांनी परिस्थितीला दोष न देता शिक्षण आणि मेहनतीच्या जोरावर पुढे जाण्याची गरज आहे. अरबाज सय्यद यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून संघर्ष करत मुंबई पोलीस दलात स्थान मिळवले आहे. हे यश केवळ त्यांच्या कुटुंबाचे नसून संपूर्ण नेप्ती गावासाठी अभिमानाची बाब आहे." त्यांनी युवकांना मोबाईल आणि व्यसनांच्या आहारी न जाता ध्येय निश्चित करून सातत्याने परिश्रम घेण्याचे आवाहन केले. गरीबी अडथळा नसून जिद्द आणि शिक्षण हे खरे सामर्थ्य आहे. नेप्ती गावाचा अरबाजने सन्मान वाढवला असे प्रतिपादन प्राध्यापक एकनाथ होले सर यांनी केले. पुढे प्रा. होले म्हणाले, "गरीबी ही कधीच यशाच्या आड येत नाही. आई-वडिलांचे कष्ट, घरातील संस्कार आणि स्वतःची जिद्द असेल तर कोणतेही ध्येय गाठता येते.

अरबाज यांनी मिळेल ते काम करून शिक्षण घेतले आणि आज पोलीस दलात निवड होऊन त्यांनी समाजासमोर आदर्श निर्माण केला आहे. अशा युवकांमुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळणार असून भविष्यात आणखी अनेक तरुण स्पर्धा परीक्षांकडे वळतील," असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. गावातील युवकांनी अरबाज सय्यद यांच्या संघर्षातून प्रेरणा घ्यावी.

# मान्सूनपूर्व पावसाच्या सरींनी किनवट तालुका चिंब

- नागरिकांना उकाड्यापासून दिलासा, शेतकऱ्यांची धाकधूक वाढली

किनवट : (स. गांवकरी)



किनवट शहरासह तालुक्यात गुरुवारी दुपारनंतर मान्सूनपूर्व पावसाच्या सरी कोसळल्याने वातावरणात मोठा बदल झाला. गेल्या काही दिवसांपासून प्रचंड उकाडा व असह्य उष्म्याने हैराण झालेल्या नागरिकांना या पावसामुळे दिलासा मिळाला. तर दुसरीकडे खरीप हंगामाच्या पूर्वतयारीत व्यस्त असलेल्या शेतकऱ्यांची मात्र या अचानक झालेल्या पावसामुळे धाकधूक वाढली आहे. किनवट शहरासह गोकुंदा, पिंपळगाव, सिरमेटी, वंजरावाडी, बेंदी, बोधडी, मांडवा, प्रधानसांगवी, चिखली आदी परिसरात दुपारनंतर ढगाळ वातावरण निर्माण झाले होते. त्यानंतर विजांच्या कडकडाटासह काही ठिकाणी मध्यम तर काही भागात जोरदार स्वरूपाच्या पावसाच्या सरी कोसळल्या. या पावसामुळे रस्त्यांवर पाणी साचल्याचे चित्र दिसून आले. बाजारपेठेत खरेदीसाठी आलेल्या नागरिकांची काही काळ तारांबळ उडाली. दरम्यान, हवामान खात्याने यंदाच्या मान्सून संदर्भात अल निनो प्रभावामुळे पर्जन्यमान कमी राहण्याची शक्यता व्यक्त केली आहे. शासन आणि कृषी विभागाकडूनही वेळोवेळी कमी पाऊस, उशिरा मान्सून आगमन किंवा अनियमित पर्जन्यवृष्टीबाबत सूचना देण्यात येत आहेत. त्यामुळे शेतकरी वर्गात काही प्रमाणात संभ्रमाचे वातावरण आहे. तरीदेखील ग्रामीण भागातील बहुतांश शेतकरी आपल्या पारंपरिक शेती पद्धतीनुसार 'मृग नक्षत्रा'तील पेरणीला प्राधान्य देत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. सध्या तालुक्यात खरीप हंगामासाठी शेतकरी शेत मशागत, नांगरणी, वखरणी, बियाणे व खतांची जमवाजमव या कामात व्यस्त आहेत. अनेक ठिकाणी शेतकऱ्यांनी पेरणीपूर्व मशागतीची कामे सुरू केली असताना झालेल्या या पावसामुळे काही शेतकऱ्यांनी आनंद व्यक्त केला, तर काहींनी "अजून जोरदार व सातत्यपूर्ण पाऊस आवश्यक आहे," अशी प्रतिक्रिया दिली. कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांना घाईघाईने पेरणी न करण्याचा सल्ला दिला आहे. हवामानाचा अंदाज लक्षात घेऊन पुरेशा ओलाव्यानंतरच पेरणी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच प्रमाणित बियाण्यांचा वापर, कमी कालावधीत येणाऱ्या वाणांची निवड आणि हवामान आधारित शेती नियोजन करण्याचे मार्गदर्शनही कृषी विभागाकडून करण्यात येत आहे. मान्सूनपूर्व पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला असून शहरातील नागरिकांनी उष्णतेपासून काहीसा दिलासा मिळाल्याचे सांगितले. दरम्यान, आगामी काही दिवसांतही तालुक्यात ढगाळ वातावरणासह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे.

# संभाव्य पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर पाणी जपून वापरावे

किनवट : (स. गांवकरी)



- नगराध्यक्ष सुजाता येंड्रलवार व उपनगराध्यक्ष हसन खान पठाण यांचे आवाहन

भारतीय हवामान खात्याने यंदाच्या पावसाबाबत व्यक्त केलेल्या अंदाजाच्या पार्श्वभूमीवर किनवट शहरात संभाव्य पाणीटंचाईची परिस्थिती उद्भवू शकते. त्यामुळे नागरिकांनी आतापासूनच पाण्याचा काटकसरीने वापर करावा व आवश्यक उपाययोजनांसाठी मानसिक तयारी ठेवावी, असे आवाहन किनवट नगर परिषद नगराध्यक्ष सौ. सुजाता येंड्रलवार व उपनगराध्यक्ष हसन खान पठाण यांनी केले आहे. नगर परिषद कार्यालयातील नगराध्यक्ष सभागृहात आयोजित बैठकीत शहरातील पाणीस्थिती, आगामी पर्जन्यमानाचा अंदाज तसेच पाणीटंचाई टाळण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी नगराध्यक्ष सौ. येंड्रलवार यांनी सांगितले की, आगामी काळात अपेक्षेप्रमाणे पाऊस न झाल्यास शहराच्या पाणीपुरवठ्यावर परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांनी पिण्याच्या पाण्याचा अपव्यय टाळून आवश्यक तेवढ्याच पाण्याचा वापर करावा. उपनगराध्यक्ष हसन खान पठाण यांनी देखील नागरिकांना सहकार्याचे आवाहन करताना सांगितले की, पाणी ही अत्यंत महत्त्वाची नैसर्गिक संपत्ती असून तिचे संवर्धन करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे.

# जागतिक सायकल दिनानिमित्त भव्य सायकल रॅली

## सायकलप्रेमींचा सत्कार!

अकोला : (स. गांवकरी)






जागतिक सायकल दिनानिमित्त मेरा युवा भारत केंद्र, अकोला, युवा कार्यक्रम व खेल मंत्रालय भारत सरकार संचलित नेहरू युवा बहुउद्देशीय क्रीडा व सांस्कृतिक मंडळ, कोकणवाडी, मूर्तिजापूर, कृष्णा कामिनी क्रीडा प्रसारक संस्था व सिटी तायक्वांदो क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने शहरात भव्य सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले. श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक ते तालुका क्रीडा संकुल या मार्गावर ही रॅली उत्साहात पार पडली. युवा उद्योजक व समाजसेवक प्रशांतभाऊ हजारे यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून रॅलीला प्रारंभ करण्यात आला. यावेळी हम्राहिमभाई घानीवाला, रमेश दर्यानी, सुनील भोजगडिया, विनोद काळबांडे, ज्ञानेश ताले, रवी चव्हाण, मीना बोंडे, विष्णू लोडम, रमेरा तोडले, गांधी साहेब, सोहम सरोवरे, अविनाश यावले, सचिन बोनगिरे आदी मान्यवर उपस्थित होते.

रॅलीमध्ये लहान चिमुकल्यांपासून ते ७० वर्षांपर्यंतच्या ज्येष्ठ नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. मेरा युवा भारत केंद्र, अकोला येथील जिल्हा युवा अधिकारी अक्षय निपाणे यांच्या मार्गदर्शनाखाली या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. विलास वानखडे व दिनेश श्रीवास यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले.

रॅलीचे मुख्य आकर्षण म्हणजे सहभागींच्या हातातील तिरंगी ध्वज आणि पर्यावरण, आरोग्य व इंधन बचतीचा संदेश देणारे फलक. "सायकल चालवा, पर्यावरण वाचवा", "सायकल चालवा, आरोग्य वाढवा", "इंधन वाचवा, देश घडवा", "आठवड्यातून किमान एक दिवस सायकलचा वापर करा" अशा विविध घोषणांद्वारे जनजागृती करण्यात आली. कार्यक्रमाच्या शेवटी सायकलप्रेमींचा सत्कार करण्यात आला तसेच सहभागींना मेरा युवा भारत केंद्र, अकोला व भारत सरकारच्या क्रीडा व युवक कल्याण मंत्रालयातर्फे प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी दिनेश श्रीवास, गजानन चव्हाण, जितू हसानी, अक्षय वानखडे आणि लकी वानखडे यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रवी गोंडकर यांनी केले.

# थोडक्यात पण महत्वाचे

## वाकचौरे साहेबांचा डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या वतीने सत्कार!



श्रीरामपूर (स. गांवकरी) : संपूर्ण राज्यात चर्चेचा विषय ठरलेल्या खरात प्रकरण तसेच वडगाव पाण येथील गडगे प्रकरणाची सखोल चौकशी करून सत्य जनतेसमोर आणण्याचे काम करणारे श्रीरामपूरचे अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे यांची आज सदिच्छा भेट घेण्यात आली. यावेळी विविध सामाजिक, कायदा व सुव्यवस्था तसेच जनहिताच्या विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. "सद्रक्षणाय खलनिग्रहणाय" या महाराष्ट्र पोलीस दलाच्या ब्रीदवाक्यानुसार कर्तव्यनिष्ठपणे सेवा बजावत असलेल्या व वारकरी संप्रदायातील अभ्यासू व संवेदनशील अधिकारी म्हणून ओळख असलेल्या वाकचौरे साहेबांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. याप्रसंगी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या हस्ते अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे यांचा घड्याळ, हरीपाठ व पेन देऊन सत्कार करण्यात आला. समाजात कायद्याबाबत विश्वास निर्माण करण्यासाठी तसेच संवेदनशील प्रकरणांचा निष्पक्ष तपास करण्यासाठी पोलीस प्रशासनाने केलेल्या कार्याचे यावेळी कौतुक करण्यात आले. सदिच्छा भेटीदरम्यान सामाजिक सलोखा, नागरिकांचे प्रश्न, पत्रकारिता आणि पोलीस प्रशासन यांच्यातील समन्वय यासह विविध विषयांवर सकारात्मक चर्चा झाली. वाकचौरे साहेबांच्या कार्यपद्धतीबद्दल समाधान व्यक्त करत त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

## मुरबाडच्या विविध प्रश्नांवर ठाणे जिल्हा एकता मंचचा धडाका!!

मुरबाड (स. गांवकरी) : मुरबाड तालुक्यातील विविध प्रलंबित प्रश्न सोडवण्यासाठी ठाणे जिल्हा एकता मंचने निवेदनांच्या माध्यमातून प्रशासनाचे लक्ष वेधण्याची मोहीम हाती घेतली असून तालुकाभरातील नागरिकांच्या समस्या शासन दरबारी पोहोचवण्याचा धडाका सुरू केला आहे. मंचाच्या वतीने मुरबाड पंचायत समिती, राष्ट्रीय महामार्ग विभाग, ग्रामीण रुग्णालय, वन विभाग तसेच महावितरण कार्यालयाला विविध मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले. पंचायत समिती आवारातील दिव्यांग कक्षाची स्वच्छता व सुशोभीकरण करण्यात यावे, तालुक्यातील दिव्यांगांना घरकुल योजनेचा लाभ मिळावा, फांगुळगव्हाण ग्रामपंचायतीतील वाघाचीवाडीसह पाणीटंचाईग्रस्त गावांमध्ये बोअरवेल करून पिण्याच्या पाण्याची समस्या दूर करावी, अशी मागणी करण्यात आली. याशिवाय राष्ट्रीय महामार्गावरील खड्डे तातडीने बुजवावेत, ग्रामीण रुग्णालयात ऑर्थोपेडिक तज्ज्ञ डॉक्टरांची नियुक्ती करून कर्मचारी संख्या वाढवावी, वन विभागाने जंगलातील आगी रोखण्यासाठी प्रभावी उपाययोजना कराव्यात तसेच पर्यावरण व निसर्ग संवर्धनाबाबत जनजागृतीचे कार्यक्रम राबवावेत, अशीही मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.

# डॉ. विश्वासराव आरोटे यांच्याकडून आगार प्रमुखांचा सत्कार!

अकोले : (स. गांवकरी)

- राज्यस्तरीय पुरस्कारप्राप्त अकोले बसस्थानक
- राज्यात 'ब' वर्गात अकोले बसस्थानक प्रथम
- राज्य व नाशिक विभागाचे दोन मानाचे पुरस्कार, फटाक्यांच्या आतषबाजीत जल्लोष!





प्रवाशांना स्वच्छ, सुंदर आणि दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देण्याच्या कार्याची दखल घेत महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या "हिंदुहृदयसम्राट स्वच्छ सुंदर बसस्थानक" स्पर्धेत अकोले बसस्थानकाने राज्यात आणि नाशिक विभागात प्रथम क्रमांक पटकावला आहे. या उल्लेखनीय यशामुळे अकोले बसस्थानकाला राज्यस्तरावर २५ लाख रुपये तर प्रादेशिक स्तरावर १ लाख रुपये असे एकूण २६ लाख रुपयांचे पारितोषिक जाहीर झाले आहे.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ७८ व्या वर्धापन दिनानिमित्त १ जून २०२६ रोजी मुंबई येथे आयोजित कार्यक्रमात परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते अकोले आगाराचे आगार व्यवस्थापक सुरेश दराडे यांचा सत्कार करून पारितोषिक प्रदान करण्यात आले. अकोले बसस्थानकाने राज्य व विभागीय स्तरावर प्रथम क्रमांक मिळविल्याने अकोले तालुक्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून कर्मचाऱ्यांनी फटाक्यांची आतषबाजी करून जल्लोष साजरा केला.

या यशाबद्दल महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ व दैनिक समर्थ गांवकरी समूह यांच्या वतीने आगार प्रमुख सुरेश दराडे यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

ज्येष्ठ पत्रकार डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या हस्ते शाल, पुष्पगुच्छ, साईबाबांची प्रतिमा व घड्याळ देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. यावेळी अकोले बसस्थानकाच्या स्वच्छता, सुशोभीकरण व प्रवासी सुविधांच्या उभारणीत योगदान देणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांचेही कौतुक करण्यात आले. अकोले बसस्थानकाने मिळविलेल्या या दुहेरी यशामुळे तालुक्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे.

# अहिल्यानगर जिल्हा माहिती कार्यालयातील अधिकारी-कर्मचाऱ्यांचा डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या हस्ते सन्मान!





अहिल्यानगर : (स. गांवकरी)

जिल्ह्यातील वृत्तपत्रांना अनेक वर्षांपासून शासकीय बातमीपत्रे उपलब्ध करून देत पत्रकारिता क्षेत्राला मोलाचे सहकार्य करणाऱ्या अहिल्यानगर जिल्हा माहिती कार्यालयास आज महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ व दैनिक समर्थ गांवकरी समूहाच्या वतीने सदिच्छा भेट देण्यात आली. यावेळी जिल्हा माहिती कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांशी विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. पत्रकार आणि शासकीय यंत्रणा यांच्यातील समन्वय अधिक दृढ करण्यासाठी माहिती कार्यालयाची भूमिका महत्त्वपूर्ण असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

या प्रसंगी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ व दैनिक समर्थ गांवकरी समूहाचे अध्यक्ष डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या हस्ते उपस्थित अधिकारी मित्रांचा साईबाबांची प्रतिमा, घड्याळ, शाल, पुष्पगुच्छ, हरीपाठ, पेन व की-चेन देऊन सत्कार करण्यात आला. जिल्ह्यातील विविध शासकीय योजना, उपक्रम व विकासकामांची माहिती प्रसारमाध्यमांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी जिल्हा माहिती कार्यालयाने सातत्याने केलेल्या कार्याबद्दल यावेळी कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. कार्यक्रमाचे वातावरण आपुलकीचे व उत्साहपूर्ण होते.

# कौटुंबिक स्नेहसंमेलन व विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा!

नाशिक : (स. गांवकरी)

अकोले तालुक्यातील नागरिकांना एकत्र आणण्याच्या उद्देशाने अकोलेकर फाउंडेशन, नाशिक यांच्या वतीने कौटुंबिक स्नेहसंमेलन व विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा आयोजित करण्यात आला आहे. हा कार्यक्रम रविवार, दि. ७ जून २०२६ रोजी सायंकाळी ४ वाजता सौभाग्य लॉन्स, पपाया नर्सरीजवळ, त्र्यंबक रोड, सातपूर, नाशिक येथे होणार आहे. या कार्यक्रमासाठी अकोले तालुक्याचे कार्यसम्राट आमदार डॉ. किरण लहामटे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. तसेच मधुभाऊ नवले, अ‍ॅड. के. डी. आण्णा धुमाळ, डॉ. विश्वासराव आरोटे, ह.भ.प. दिपक महाराज देशमुख, रमेशआण्णा जगताप आणि विलासदादा वाकचौरे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. स्नेहसंमेलनाच्या माध्यमातून नाशिक परिसरात वास्तव्यास असलेल्या अकोलेकर बांधवांना एकत्र येण्याची संधी मिळणार असून, विविध क्षेत्रांत यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा यावेळी विशेष सन्मान करण्यात येणार आहे. सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक एकात्मता वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमास अकोले तालुक्यातील नागरिकांनी व विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन अकोलेकर फाउंडेशनचे अध्यक्ष विलासदादा वाकचौरे यांनी केले आहे.

# अनुसूचित जाती योजनेतील सौर दिवा उखडून नेल्याचा आरोप



ब्राम्हणवाडा : (स. गांवकरी)

ब्राम्हणवाडा येथील अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांसाठी ग्रामपंचायतीमार्फत बसविण्यात आलेला सौर दिवा घरासमोरून काढून नेल्याचा आरोप करत प्रदीप भिवा रोकडे यांनी संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली आहे. प्रदीप रोकडे यांनी अकोले पोलीस ठाणे, तहसीलदार, गटविकास अधिकारी तसेच ग्रामपंचायतीकडे दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, त्यांच्या घरासमोर अनुसूचित जाती योजनेतून बसविण्यात आलेला सौर दिवा दि. ३ जून २०२६ रोजी ठेकेदाराने गौतम शिंदे यांच्या सांगण्यावरून काढून नेला. त्यानंतर तो गावातील इतर समाजाच्या घरासमोर बसविण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

निवेदनात पुढे नमूद करण्यात आले आहे की, संबंधित व्यक्ती ब्राम्हणवाडा गावात वास्तव्यास नसून अशा प्रकारची चुकीची कामे करत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच त्यांच्यापासून स्वतःच्या कुटुंबाला व नातेवाईकांच्या जिवितास धोका असल्याचेही रोकडे यांनी म्हटले आहे. सदर प्रकरणाची चौकशी करून संबंधित दोषींवर योग्य ती कारवाई करण्यात यावी तसेच त्यांच्या घरासमोरील सौर दिवा पुन्हा बसविण्यात यावा, अशी मागणी त्यांनी प्रशासनाकडे केली आहे. या निवेदनामुळे ब्राम्हणवाडा परिसरात चर्चेला उधाण आले असून प्रशासन याबाबत कोणती भूमिका घेते याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# व्यायाम शाळाचे ज्येष्ठ नागरिकांच्या हस्ते लोकार्पण

नेवासा : (स. गांवकरी)

दि. 4 जून रोजी नेवासा तालुक्यातील मौजे धामोरी येथे नेवासा तालुक्याचे लोकप्रिय आमदार विठ्ठलराव लंघे पाटील यांच्या विशेष प्रयत्नातून तरुण युवा वर्गाच्या मागणीने भरभक्कम व्यायाम शाळेचे साहित्य, फिट करून आज त्याचा लोकार्पण सोहळा ग्रामस्थांच्या व ज्येष्ठ नागरिक युवा वर्गांच्या उपस्थितीत संपन्न झाला. धामोरी गावचे ज्येष्ठ भजनी मंडळाचे अध्यक्ष ज्ञानदेव रामचंद्र पटारे यांच्या शुभहस्ते नारळ फोडून व्यायाम शाळा चे लोकार्पण व उद्‌घाटन सोहळा संपन्न झाला त्याप्रसंगी युवा कार्यकर्ते आदिनाथ पटारे , बहिरवाडी सोसायटीचे चेअरमन नवनाथ पाटील पटारे, जगन्नाथ महाराज पटारे,युवा नेतृत्व राम पटारे,रमेश ठोकळ,संदीप पटारे,अविनाश दाणे ,सोमनाथ ठोकळ,सागर दाणे,युवराज गायकवाड,महेश आडगळे, अनिल आढागळे, माधव पटारे, अश्विन पटारे,शुभम पटारे,ओम घोरपडे,भारत पटारे,विठ्ठल दाणे,आदी ग्रामस्थ व युवा वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्व ग्रामस्थ व युवा वर्गाच्या वतीने तालुक्याचे आमदार विठ्ठलराव लंघे साहेबांचे गावाला जिम साहित्य दिल्याबद्दल आभार मानण्यात आले.

# कांदा उत्पादकांचा आक्रोश; दागिने गहाण ठेवून केली लागवड!

आंबेगाव (पुणे) : (स. गांवकरी)



राज्यात कांदा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून बाजारात मिळणारा दर उत्पादन खर्चही भरून काढत नसल्याने कांदा उत्पादक शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. वाढते बियाणे, खते, औषधे, मजुरी आणि सिंचन खर्च यामुळे कांदा लागवडीचा खर्च मोठ्या प्रमाणात वाढला आहे.

पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्यातील गंगापूर येथील महिला शेतकरी सीता ज्ञानेश्वर ठोसर यांनी कांदा पिकवण्यासाठी स्वतःचे दागिने गहाण ठेवावे लागल्याची व्यथा व्यक्त केली. शेतीसाठी कर्ज आणि उसनवारीचा आधार घ्यावा लागत असून, उत्पादन खर्चाच्या तुलनेत बाजारभाव अत्यंत कमी मिळत असल्याने शेतकऱ्यांना मोठे नुकसान सहन करावे लागत आहे.

कांद्याचे दर वाढले की ग्राहकांच्या हिताचा विचार केला जातो, मात्र दर घसरल्यानंतर शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीकडे दुर्लक्ष होत असल्याची भावना कांदा उत्पादकांमध्ये आहे. त्यामुळे कांद्याला उत्पादन खर्चावर आधारित योग्य व हमीभाव देऊन शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी शेतकरी वर्गातून जोर धरत आहे. शेतकऱ्यांच्या या व्यथेमुळे कांदा उत्पादकांच्या समस्यांकडे शासनाने तातडीने लक्ष देण्याची गरज व्यक्त होत आहे.

# १ जूनचे औचित्य साधत सुमारे ४५० ज्येष्ठ नागरिकांचा अनोखा सन्मान!

**रविंद्रशेठ राजदेव यांच्याकडून ज्येष्ठांना फेटा बांधून वाढदिवसाच्या अनोख्या शुभेच्छा**




टाकळी ढोकेश्वर : (स. गांवकरी)

अहिल्यानगर जिल्ह्याचे लोकप्रिय खासदार आणि लोकनेते डॉ. निलेशजी लंके साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली आणि टाकळी ढोकेश्वर जिल्हा परिषद गटाच्या नेत्या सौ. सोनियाताई राजदेव यांच्या माध्यमातून टाकळी ढोकेश्वर गटात एक अत्यंत स्तुत्य आणि भव्य सामाजिक उपक्रम राबविण्यात आला. १ जून या तारखेचे औचित्य साधून या गटातील सुमारे ४५० ज्येष्ठ नागरिकांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात आणि सन्मानपूर्वक साजरा करण्यात आला. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे टाकळी ढोकेश्वर गटाचे नेते रविंद्रशेठ राजदेव यांनी स्वतः गावोगावी जाऊन या ज्येष्ठांना मानाचा फेटा बांधून त्यांच्याप्रती आपला आदरभाव व्यक्त केला. ग्रामीण भागात पूर्वीच्या काळी जन्मनोंदीची अचूक सोय नसल्याने अनेक ज्येष्ठ नागरिकांची जन्मतारीख कागदोपत्री '१ जून' अशीच नोंदवलेली असते. या दिवसाचे महत्त्व ओळखून ज्येष्ठांना त्यांच्या आयुष्यातील एक आनंदाचा आणि सन्मानाचा क्षण देण्याच्या उदात्त हेतूने या भव्य उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. रविंद्रशेठ राजदेव यांनी टाकळी ढोकेश्वर गटातील नांदूर पठार, पिंपळगाव रोठा, गारगुंडी, कासारे, टाकळी ढोकेश्वर, वासुंदे, काकणेवाडी, खडकवाडी, मांडवा, देसावडे, पोखरी, काटाळवेढा

या सर्व गावांमध्ये प्रत्यक्ष जाऊन त्यांनी ज्येष्ठ नागरिकांची भेट घेतली. या संपूर्ण मोहिमेत गटातील सुमारे ४५० ज्येष्ठ नागरिकांना मानाचा फेटा बांधून, प्रेमाने विचारपूस करत त्यांच्या वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात आल्या. आपल्या वाढदिवसानिमित्त असा अनपेक्षित आणि मानाचा सत्कार झाल्यामुळे अनेक ज्येष्ठांचे डोळे आनंदाने पाणावले होते. तरुण पिढीकडून मिळणारा हा सन्मान आणि कृतज्ञता पाहून त्यांच्या चेहऱ्यावरील समाधान आयोजकांसाठी खूप मोठी पावती ठरली. खासदार डॉ. निलेश लंके यांच्या जनसामान्यांशी नाळ जोडलेल्या कार्यपद्धतीचा वसा सौ. सोनियाताई राजदेव आणि रविंद्रशेठ राजदेव अत्यंत समर्थपणे पुढे चालवत आहेत, हेच या उपक्रमातून पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. केवळ राजकारण न करता त्यापलीकडे जाऊन समाजकारण, माणुसकी आणि ज्येष्ठांचा आदर या मूल्यांची जोपासना करण्याच्या या उपक्रमाचे संपूर्ण टाकळी ढोकेश्वर गटात आणि पारनेर तालुक्यात सर्वत्र भरभरून कौतुक होत आहे. या अभिनव उपक्रमामुळे सर्वत्र आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

# '८ वाजून १३ मिनिटे' 'अल्ट्रा झकास' ओटीटी वर प्रदर्शित!



मुंबई : (स. गांवकरी)

आयुष्यातील काही क्षण असे असतात, जे सगळंच बदलून टाकतात... आणि जर त्या क्षणासोबत मृत्यूची चाहूल जोडली गेली, तर? अशाच रहस्य, भावना आणि अनपेक्षित घटनांनी भरलेली '८ वाजून १३ मिनिटे' ही बहुचर्चित मराठी वेब सिरीज आज, २९ मे २०२६ पासून 'अल्ट्रा झकास' मराठी ओटीटी प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित झाली आहे.

प्रदर्शनापूर्वीच आपल्या थरारक ट्रेलरमुळे चर्चेत आलेल्या या वेब सिरीजची प्रेक्षकांमध्ये मोठी उत्सुकता होती. आता ही सिरीज प्रेक्षकांना रहस्य, मानसिक संघर्ष आणि भावनिक गुंतागुंत यांचा वेगळाच अनुभव देण्यासाठी सज्ज झाली आहे. '८ वाजून १३ मिनिटे'मध्ये एका साध्या आणि प्रामाणिक माणसाच्या आयुष्यात अचानक घडणाऱ्या घटनांमुळे निर्माण होणारा तणाव, नात्यांमधील बदल आणि वाढत जाणारे रहस्य प्रभावीपणे मांडण्यात आले आहे. प्रत्येक भागामध्ये सस्पेन्ससोबतच मानवी भावनांचीही तीव्रता जाणवते, त्यामुळे ही सिरीज प्रेक्षकांना शेवटपर्यंत खिळवून ठेवते.

'सौभाग्यवती सरपंच', 'आयपीसी', 'राख' आणि 'खोताची वाडी' यांसारख्या वेगळ्या आशयाच्या ओरिजिनल्सनंतर 'अल्ट्रा झकास' पुन्हा एकदा प्रेक्षकांसाठी दर्जेदार आणि हटके कंटेंट घेऊन आले आहे. या वेब सिरीजमध्ये पहिल्यांदाच सुनील बर्वे आणि ऐश्वर्या नारकर ही लोकप्रिय जोडी एकत्र झळकत असून, त्यांच्या दमदार अभिनयाची विशेष चर्चा होत आहे.

दिग्दर्शक गिरीश मोहिते यांच्या दिग्दर्शनाखाली तयार झालेल्या या वेब सिरीजमध्ये शरद पोंक्षे, उदय सबनीस, संजीव जोटांगिया आणि विनीत शर्मा हे कलाकारही महत्त्वाच्या भूमिकांमध्ये दिसत आहेत.

रहस्य आणि भावनिक नाट्य यांचा उत्तम समतोल साधणारी '८ वाजून १३ मिनिटे' ही वेब सिरीज आता 'अल्ट्रा झकास' मराठी ओटीटीवर प्रेक्षकांसाठी उपलब्ध आहे.

# जळगावला अनुसूचित जमाती प्रमाणपत्र

- तपासणी समितीचे पूर्णवेळ कार्यालय सुरू करण्याची मागणी

रावेर : (स. गांवकरी)



रावेर , यावलचे आमदार अमोल जावळेंकडून मुख्यमंत्री व आदिवासी विकास मंत्री यांचेकडे मागणी केली आहे. जळगाव जिल्ह्यात अनुसूचित जमाती (एसटी) प्रमाणपत्र तपासणी समितीचे पूर्णवेळ व पूर्ण क्षमतेने कार्यरत कार्यालय सुरू करण्यात यावे, अशी मागणी आदिवासी समाजातील नागरिकांनी आमदार अमोल हरिभाऊ जावळे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली होती. या मागणीची दखल घेत आमदार अमोल जावळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांना पत्र पाठवून जळगाव येथे समितीचे पूर्णवेळ कार्यालय तातडीने सुरू करण्याची विनंती केली आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, सध्या धुळे येथील अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीवर मोठ्या प्रमाणात कामाचा ताण असून , त्यामुळे प्रकरणांची सुनावणी अत्यल्प वेळेत होत आहे. डिसेंबर २०२५ व जानेवारी २०२६ या कालावधीतील सुनावण्यांच्या आकडेवारीनुसार एका दिवसात सरासरी ५७ हून अधिक प्रकरणांची सुनावणी झाली. त्यामुळे प्रत्येक प्रकरणाला पुरेसा वेळ मिळत नसल्याने न्यायपूर्ण निर्णय प्रक्रियेबाबत प्रश्न उपस्थित होत असल्याचे निवेदनात म्हटले आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या विविध आदेशांचा दाखला देत जिल्हास्तरावर स्वतंत्र अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समित्या स्थापन करण्याची आवश्यकता अधोरेखित करण्यात आली आहे. समित्यांवरील वाढता ताण कमी करण्यासाठी आणि प्रलंबित प्रकरणांचा जलद निपटारा करण्यासाठी अतिरिक्त समित्या स्थापन करण्याचे निर्देश न्यायालयाने दिल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

जळगाव येथे समितीचे कार्यालय सुरू करण्यासाठी आवश्यक जागा व आर्थिक तरतूद उपलब्ध असूनही तांत्रिक कारणांमुळे कार्यालय सुरू झाले नसल्याचा आरोप निवेदनातून करण्यात आला आहे. जळगाव जिल्ह्यातील आदिवासी नागरिकांना प्रमाणपत्र पडताळणीसाठी धुळे येथे जावे लागत असल्याने आर्थिक, मानसिक व वेळेचा मोठा भुर्दंड सहन करावा लागत आहे. जळगाव येथे पूर्णवेळ कार्यालय सुरू झाल्यास जिल्ह्यातील हजारो आदिवासी नागरिकांना मोठा दिलासा मिळेल, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. दरम्यान, आमदार अमोल जावळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांना पाठविलेल्या पत्रात जळगाव जिल्ह्यातील अनुसूचित जमाती बांधवांच्या सोयीसाठी जळगाव येथे अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीचे पूर्णवेळ कार्यालय तातडीने सुरू करण्याची मागणी केली आहे. त्यामुळे प्रलंबित प्रकरणांचा निपटारा जलद होऊन नागरिकांना न्याय मिळण्यास मदत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

# थोडक्यात पण महत्वाचे



## धोकादायक झाडे अपघाताला निमंत्रण; तातडीने कारवाईची मागणी!

मुरबाड (स. गांवकरी) : कल्याण–मुरबाड राष्ट्रीय महामार्गावर सुरू असलेल्या विविध कामांदरम्यान करण्यात आलेल्या खोदकामामुळे महामार्गालगतची अनेक झाडे धोकादायक अवस्थेत उभी राहिली असून ती कधीही कोसळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे या मार्गावरून प्रवास करणाऱ्या वाहनचालकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. महामार्गाच्या अगदी नजीक असलेल्या काही झाडांच्या मुळांजवळ खोदकाम झाल्याने त्यांचा तोल बिघडला असून जोरदार वारे किंवा पावसामुळे ही झाडे रस्त्यावर कोसळू शकतात. त्यामुळे मोठी दुर्घटना घडण्याची भीती व्यक्त केली जात आहे. या झाडांमुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होण्याबरोबरच नागरिकांच्या जीवितालाही धोका निर्माण झाला आहे. याबाबत सामाजिक कार्यकर्ते भरत दळवी यांनी प्रशासनाचे लक्ष वेधले असून, अपघात होण्यापूर्वीच संबंधित विभागांनी धोकादायक झाडांची तातडीने पाहणी करून आवश्यक ती कार्यवाही करावी, अशी मागणी केली आहे. एखादी दुर्घटना घडल्यानंतर उपाययोजना करण्यापेक्षा ती टाळण्यासाठी आधीच खबरदारी घेणे गरजेचे असल्याचे त्यांनी म्हटले आहे. भरत दळवी युवा विकास मंच, मुरबाड विधानसभा तसेच ठाणे जिल्हा एकता मंच, कल्याण ग्रामीण यांच्या वतीने संबंधित प्रशासनाला निवेदन देऊन त्वरित उपाययोजना करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहून प्रशासनाने तातडीने कारवाई करावी, अशी मागणी करण्यात येत आहे.

## मोहिते पाटील आणि जयकुमार गोरे यांची प्रतिष्ठा पणाला लागणार



सोलापूर (स. गांवकरी) : विधानपरिषदेच्या निवडणुकीच्या निमित्ताने सोलापुरात मोठ्या घडामोडी पाहायला मिळत आहेत. पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी विरोधकांची खिल्ली उडवल्यानंतर आता खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी त्यांना जोरदार प्रत्युत्तर दिले आहेत. बिनविरोध नाहीच ! असे म्हणत विधान परिषद निवडणुकीत अर्ज बाद झालेल्या काँग्रेस उमेदवारांने तर भाजपला थेट चॅलेंज दिले आहे. सोलापूर चे पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी विधान परिषदेची निवडणूक बिनविरोध होण्यासाठी दोन दिवस सूत्र हलवली. बऱ्याच राजकीय हालचाली केल्या पण अखेर मोहिते पाटील यांनी या निवडणुकीत भारतीय जनता पार्टीला चॅलेंज दिले आहे. भारतीय जनता पार्टीचे माजी आमदार राजेंद्र राऊत आणि जिल्हा परिषदेचे माजी सदस्य तथा शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष वसंतराव देशमुख यांच्यात आता ही निवडणूक होत आहे. दरम्यान उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी सहापैकी पाच जणांनी माघार घेतली. वसंतराव देशमुख शेवटपर्यंत अर्ज काढायला आलेच नाही त्यामुळे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी माध्यमांना प्रतिक्रिया देताना "काही नेत्यांच्या इगो मुळे ही निवडणूक लागल्याचे" सांगत या निवडणुकीत आम्ही आमची ताकद दाखवून देणार असे आव्हान दिले. आमदार कल्याणशेट्टी यांची प्रतिक्रिया सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर काँग्रेस पक्षाकडून सूचकाने हरकत घेतल्याने अर्ज बाद झालेले आदित्य फत्तेपुरकर यांनी कल्याणशेट्टी यांच्या प्रतिक्रियावर आपली प्रतिक्रिया दिली आहे. 'कूटनीती करून माझा अर्ज बाद केला आता भोगा कर्माची फळे' असे कमेंट फत्तेपुरकर यांनी दिले असून त्याला लाईक मिळत असल्याचे दिसून येते.

## पर्यावरण दिनानिमित्त वाल ब्रिज येथे नदी स्वच्छता अभियान उत्साहात

पालघर (स. गांवकरी) : जागतिक पर्यावरण दिनानिमित्त निर्माती मिळताती दांडवळ ग्रामपंचायत हद्दीतील वाल ब्रिज परिसरात नदी स्वच्छता अभियान उत्साहात पार पडले. सामाजिक बांधिलकी जपत आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत पोलीस कर्मचारी गुरुनाथ आहेर यांच्या पुढाकाराने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी ८.३० वाजता सुरू झालेल्या या अभियानात सुमारे ४० ते ५० युवा मित्र-मैत्रिणींनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. विशेष म्हणजे मोठ्या संख्येने युवतींनीही सहभाग नोंदवत नदीपात्रातील प्लास्टिक, कचरा व इतर टाकाऊ वस्तू गोळा करून परिसर स्वच्छ करण्यासाठी मोलाचे योगदान दिले. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी गुरुनाथ आहेर यांना त्यांचे सहकारी हॉटेल कणसरीचे मालक जयतम वाघ वाघ, जयराम ठाकरे दिनेश साबळे, गंगाधर वारघडे तसेच युवती प्रतिनिधी चंद्रकला ठाकरे यांचे विशेष सहकार्य लाभले. सर्व युवक-युवतींनी एकजुटीने काम करत नदी परिसर स्वच्छ आणि सुंदर करण्यासाठी मेहनत घेतली. सुमारे दीड तास चाललेल्या या स्वच्छता मोहिमेनंतर सर्व सहभागींसाठी नाश्त्याचे आयोजन करण्यात आले होते. पर्यावरण संवर्धन ही प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी आहे, हा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. यावेळी गुरुनाथ आहेर यांनी युवक-युवतींना पर्यावरण रक्षणासाठी सातत्याने पुढाकार घेण्याचे आवाहन केले. युवा शक्तीने एकत्र येऊन समाजोपयोगी कार्यात सहभाग घेतल्यास समाजात सकारात्मक बदल घडवून आणता येतो, असे त्यांनी सांगितले. या उपक्रमामुळे परिसरातील नागरिकांमध्ये पर्यावरणाबाबत जागृती निर्माण झाली असून सहभागी युवक-युवतींचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. भविष्यातही अशाच सामाजिक व पर्यावरणपूरक उपक्रमांचे आयोजन करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

## साखरी गावात ३,००० वृक्षांची लागवड; पर्यावरण दिन उत्साहात साजरा

पालघर (स. गांवकरी) : जागतिक पर्यावरण दिनानिमित्त रिलायबल ऑटो प्रा. लि. नाशिक व राह फाउंडेशन जव्हार यांच्या संयुक्त विद्यमाने साखरी गावातील गायरान क्षेत्रामध्ये ३,००० वृक्षांची लागवड करण्यात आली. पर्यावरण संवर्धन, जैवविविधतेचे संरक्षण आणि हरित क्षेत्र वाढविण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. या वृक्षारोपण कार्यक्रमात विविध प्रजातींच्या स्थानिक व पर्यावरणपूरक वृक्षांची लागवड करण्यात आली. कार्यक्रमामध्ये ग्रामस्थ, स्वयंसेवक, युवक-युवती तसेच संस्थेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी वृक्षसंवर्धनाचे महत्त्व अधोरेखित करताना लागवड केलेल्या वृक्षांचे संगोपन करण्याचे आवाहन केले. केवळ वृक्षारोपण न करता त्यांचे जतन व संवर्धन करणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी असल्याचे त्यांनी नमूद केले. रिलायबल ऑटो प्रा. लि. नाशिक व राह फाउंडेशन यांच्या या उपक्रमाचे ग्रामस्थांनी स्वागत केले असून भविष्यातही अशा पर्यावरणपूरक उपक्रमांद्वारे हरित महाराष्ट्र घडविण्यासाठी प्रयत्न सुरू राहतील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# निवृत्ती सुरवसे म्हणजे माणसातील देवमाणूस : कमलाकर सोनकांबळे

## ८२व्या वाढदिवसानिमित्त ग्रामस्थांकडून जंगी सत्कार; सामाजिक कार्याचा गौरव

अक्कलकोट : (स. गांवकरी)



### निवृत्ती सुरवसे यांचे कार्य युवा पिढीसाठी प्रेरणादायी

गावातील सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी सदैव तत्पर असणारे निवृत्ती सुरवसे यांनी आयुष्यभर सामाजिक बांधिलकी जपत कार्य केले आहे. धार्मिक सेवा, जनसेवा आणि सामाजिक ऐक्य यांचा सुंदर संगम त्यांच्या कार्यातून दिसून येतो. त्यामुळेच आजही गावातील नागरिक त्यांच्याकडे विश्वासाने पाहतात आणि त्यांना आदर्श समाजसेवक म्हणून मानाचे स्थान देतात.

गोगांव येथील कलेश्वर देवस्थान ट्रस्टचे उपाध्यक्ष, ज्येष्ठ समाजसेवक आणि सर्वधर्मसमभाव जपत समाजसेवेचा वसा जपणारे निवृत्ती सुरवसे बिराजदार यांच्या 82 व्या वाढदिवसानिमित्त ग्रामस्थ, ग्रामपंचायत आणि विविध सामाजिक संस्थांच्या वतीने त्यांचा जंगी सत्कार करण्यात आला. या प्रसंगी परिसरातील नागरिक, ग्रामस्थ आणि विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भाजपा तालुका उपाध्यक्ष प्रदीप जगताप हे होते. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते श्री कलेश्वर महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. त्यानंतर निवृत्ती सुरवसे बिराजदार यांचा शाल, श्रीफळ, पुष्पहार आणि गौरवचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी उपसरपंच कमलाकर सोनकांबळे, प्रदीप जगताप, सूर्यकांत जिरगे, कल्याणराव बिराजदार, कल्लपा वाडे, बाबुराव बिराजदार उपस्थित होते

गावातील 51 ज्येष्ठ नागरिकांचाही सुरवसे परिवाराच्या वतीने सन्मान करण्यात आला.

यावेळी बोलताना उपसरपंच कमलाकर सोनकांबळे यांनी निवृत्ती सुरवसे यांच्या कार्याचा गौरव करताना सांगितले की, "निवृत्ती तात्या सुरवसे हे केवळ एक व्यक्तिमत्त्व नसून समाजासाठी प्रेरणास्थान आहेत. गेली पाच दशके त्यांनी श्री कलेश्वर महाराजांची निस्वार्थ सेवा केली आहे. त्याचबरोबर समाजातील गोरगरीब, वंचित, शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांसाठी ते सातत्याने धावून गेले आहेत. गावातील कोणत्याही व्यक्तीला अन्याय झाला तर त्याच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याची त्यांची वृत्ती आहे. त्यामुळेच त्यांना गावात 'माणसातील देवमाणूस' म्हणून ओळखले जाते."

ते पुढे म्हणाले की, "'एक गाव – एक पाणवठा' या विचारधारेचा अंगीकार करून सर्व जाती-धर्मातील लोकांमध्ये एकोपा निर्माण करण्यासाठी त्यांनी आयुष्यभर प्रयत्न केले. सामाजिक सलोखा, बंधुभाव आणि मानवतेची शिकवण देणारे त्यांचे कार्य युवा पिढीसाठी आदर्शवत आहे. गावातील अनेक विकासकामांमध्ये त्यांचे मोलाचे योगदान असून जनसेवा हेच त्यांचे जीवनध्येय राहिले आहे."

निवृत्ती सुरवसे यांनीही सत्काराबद्दल ग्रामस्थांचे आभार मानत, "समाजाची सेवा करत राहणे हेच माझे कर्तव्य असून पुढील काळातही लोकहितासाठी कार्यरत राहीन," अशी भावना व्यक्त केली.

या कार्यक्रमास गावातील विविध समाजघटकांचे प्रतिनिधी, महिला, युवक आणि ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमामुळे गावात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आयोजक सय्यद नदाफ, नितीन गायकवाड, असलम मुल्ला, शाम पाटील,प्रदीप जगताप, विकास सुरवसे, शाम बाबर, गणेश जगताप, विजयकुमार गायकवाड आदींनी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय सुरवसे सर यांनी केले, तर महादेव सोनकवडे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## अनुकरणीय गणेशोत्सव २०२६ मार्गदर्शन शिबिराचे आयोजन

पुणे : (स. गांवकरी)




आगामी गणेशोत्सव अधिक पर्यावरणपूरक, शिस्तबद्ध आणि सामाजिकदृष्ट्या उपयुक्त पद्धतीने साजरा करण्याच्या उद्देशाने रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३१, पर्यावरण विभाग अंतर्गत "माय सिटी माय प्रॉमिस" शिस्त व पर्यावरणपूरक वर्तन बदलासाठी अभियान आणि जय गणेश व्यासपीठ, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने "अनुकरणीय गणेशोत्सव २०२६ – मार्गदर्शन शिबिर" आयोजित करण्यात आले आहे. हा कार्यक्रम रविवार, दि. ७ जून २०२६ रोजी सायंकाळी ४.३० वाजल्यापासून लोकमान्य सभागृह, टिळकवाडा, नारायण पेठ येथे होणार आहे. अशी माहिती कार्यक्रमाचे समन्वयक विष्णू भेडा व पीयूष शाह यांनी दिली. गणेशोत्सवातील विविध पैलूंवर तज्ज्ञांचे मार्गदर्शन या शिबिरात मिळणार आहे. इतिहासकार, लेखक व संशोधक मंदार लवाटे हे "गणेशोत्सव संस्कृती आणि सामाजिक महत्त्व" या विषयावर मार्गदर्शन करतील. पारंपरिक कला पुनरुज्जीवनासाठी कार्यरत असलेले डिझायनर चंद्रशेखर भेडा (नवी दिल्ली) हे "गणेशोत्सव देखावे व रथ : कला, हस्तकला आणि नावीन्यपूर्णता" या विषयावर विचार मांडतील. संगणक तज्ज्ञ व लेखक डॉ. दीपक शिकारपूर हे "तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (ए.आय.) चा वापर" या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. सामाजिक कार्यकर्ते डॉ. मिलिंद भोई हे ध्वनीप्रदूषण आणि लेझर लाईटमुळे होणारे दुष्परिणाम याबाबत माहिती देतील.

## महाजागर : ८ हजार कलावंतांचा महामेळावा संस्मरणीय

आळेफाटा : (स. गांवकरी)



शिर्डी येथे महाराष्ट्राच्या मातीत रुजलेल्या लोककला व ग्रामीण संस्कृतीचे दर्शन घडविणारा 'लोककलावंत महामेळावा व सन्मान सोहळा' शिर्डी येथे हजारोंच्या साक्षीने उत्साहात संपन्न झाला. लोककलावंत सांस्कृतिक विचार मंचाचे संस्थापक अध्यक्ष गवनेरजी सरोदे यांच्या नेतृत्वाखाली व श्री साईबाबा संस्थान, शिर्डी यांच्या सहकार्याने झालेल्या या सोहळ्यात राज्याच्या कानाकोपऱ्यातून आठ हजारांहून अधिक लोककलावंत एकवटले होते. सकाळी साईबाबांच्या समाधी मंदिरापासून निघालेल्या भव्य प्रभात फेरीने कार्यक्रमाचा शुभारंभ झाला. पारंपरिक वेशभूषा, डोक्यावर फेटे, हातात सनई-संबळ घेऊन हजारो महिला-पुरुष कलावंतांनी लोककलेचा जागर केला. त्यानंतर शताब्दी मंडपात लोककला महोत्सव रंगला. आदिवासी नृत्य, पारंपरिक लोकनृत्य, बँड पथक, भारूड, पोवाडे, तमाशा आदी सादरीकरणाने रसिक मंत्रमुग्ध झाले. सभागृह खचाखच भरल्याने अनेक कलावंतांना उभे राहून कार्यक्रम पाहावा लागला. ग्रामीण व दुर्गम भागातील उपेक्षित कलावंतांना हक्काचे व्यासपीठ मिळवून देण्यासाठी गेली अनेक वर्षे झटणारे गवनेरजी सरोदे व निर्मला सरोदे यांच्या कार्याचा यावेळी गौरव झाला. आज त्यांच्या संघटनेत ५०:हजारांहून अधिक कलावंत जोडले गेले असून गाव-तालुका-जिल्हा स्तरावर कलावंतांचे जाळे उभे करून त्यांनी लोप पावत चाललेल्या कला जिवंत ठेवल्या आहेत. कार्यक्रमात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या ज्येष्ठ कलावंतांना "श्री साई जीवन गौरव पुरस्कार" देऊन सन्मानित करण्यात आले. शिर्डी संस्थानच्या अधिकाऱ्यांनी यशस्वी आयोजनाबद्दल गवनेरजी सरोदे यांचा सत्कार केला.

खासदार भाऊसाहेब वाकचौरे कार्यक्रमास उपस्थित राहू शकले नाहीत, मात्र त्यांनी दूरध्वनीद्वारे शुभेच्छा देत "लोककलावंतांच्या प्रत्येक प्रश्नासाठी मी सदैव सोबत आहे," असे आश्वासन दिले. प्रास्ताविक भांगरे सर, सूत्रसंचालन मंगेश फाटकर तर आभार संपादक पोपट सोनवणे यांनी मानले. सर्जेराव कदम, नवनाथ राक्षे, रवींद्र वाकोडे, धोंडीराम दिवे, राजू मंतोडे, ज्ञानेश्वर गांगड, दिलीप पवार, मच्छिंद्र आसवले, ललित धनगर व हजारो कार्यकर्त्यांनी मेळावा यशस्वी केला. लोककलेचा वारसा जपणारा हा महामेळावा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासात मैलाचा दगड ठरल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

## सलग तिसऱ्या वादळाचा रावेर तालुक्यात दणका

रावेर : (स. गांवकरी)

- राहिलेल्या केळी बागाही जमीनदोस्त, शेतकरी उद्ध्वस्त
- काही बागांचा मुहूर्तही झाला नव्हता



निसर्गाच्या सलग आघातांनी तालुका परिसरातील केळी उत्पादक पूर्णपणे उद्ध्वस्त झाला आहे. दि. 4 जून रोजी दुपारी आलेल्या वादळी पावसाने तिसऱ्यांदा हाहाकार माजवला. या वादळात कसेबसे बचावलेल्या उर्वरित सर्व केळी बागाही जमीनदोस्त झाल्या आहेत.

31 मे आणि 1 जूनच्या वादळातून वाचलेल्या तुरळक बागा आजच्या तडाख्यात पूर्णपणे नष्ट झाल्या असुनु , सलग तीन वादळांमुळे परिसरातील 100 टक्के केळी क्षेत्राचे नुकसान झाले आहे. ताशी 70 किमीपेक्षा अधिक वेगाने सुटलेल्या वाऱ्याने घडांसह झाडे मुळासकट उन्मळून पडली. ऑगस्ट-सप्टेंबरच्या लागवडी आता कापणीवर आल्या होत्या. सध्या 2000 रु. प्रतिक्विंटलचा भाव असताना एकही घड हाती न लागता संपूर्ण वर्षाची मेहनत मातीमोल झाली आहे. सततच्या नुकसानीमुळे केळी उत्पादक आर्थिक संकटात सापडला असून, अनेकांवर कर्जबाजारी होण्याची वेळ आली आहे. सलग तीन नैसर्गिक आपत्तींमुळे शेतकरी पूर्णपणे हवालदिल झाला आहे. उन्मळून पडलेल्या झाडांमुळे निंभोरासह परिसरातील ग्रामीण भागातील अंतर्गत रस्ते पुन्हा बंद झाले आहेत. वीजपुरवठा अजूनही पूर्ववत झालेला नाही. "पहिल्या दोन वादळांत अर्धी बाग गेली. उरलेली आजच्या वादळाने संपवली. आता जगायचं कसं?" असा हताश सवाल केळी उत्पादक प्रशांत काठोके यांनी उपस्थित केला. "नामांकित कंपनीचे रोप ट्रीटमेंट करून बाग फुलवली होती. मुहूर्ताची केळीही कापली नाही तोच बाग जमीनदोस्त झाली. आता जगायचं कसं?" असा प्रश्न लिलाधर भिरूड व हेमंत पवार या शेतकऱ्यांनी व्यथितपणे विचारला. तिन्ही वादळांमुळे झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना हेक्टरी सरसकट मदत जाहीर करावी, अशी मागणी परिसरातून जोर धरत आहे.

## पतीसह ७ जणांवर गुन्हा, सोलापुरात उडाली मोठी खळबळ

सोलापूर : (स. गांवकरी)

प्रसूतीसाठी रुग्णालयात गेल्यानंतर डॉक्टरांना वेगळाच संशय आला. त्यांनी तातडीने महिला व बालविकास विभाग आणि पोलिसांशी संपर्क साधला. आणि खरा प्रकार उघडकीस आला. एका विवाहितेने गोंडस बाळाला जन्म दिला. मात्र, प्रसूतीसाठी रुग्णालयात गेल्यानंतर डॉक्टरांना वेगळाच संशय आला. त्यांनी तातडीने महिला व बालविकास विभाग आणि पोलिसांशी संपर्क साधला. त्यानंतर संबंधित विवाहितेचा पती, आई-वडील, मामा-मामी आणि सासू-सासऱ्यांवर देखील फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. या प्रकरणामुळे सोलापुरात खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सोलापुरातील एका खासगी हॉस्पिटलमध्ये प्रसूतीसाठी विवाहितेला दाखल करण्यात आलं होतं. बाळंतपणासाठी आलेल्या या मुलीच्या वयाचा कोणताही अधिकृत पुरावा, आधार कार्ड किंवा कागदपत्रे नातेवाईकांकडे उपलब्ध नव्हते. त्यामुळे हॉस्पिटल प्रशासनाला यात संशय आला. त्यांनी तात्काळ महिला व बालविकास विभाग आणि पोलिसांशी संपर्क साधला. माहिती मिळताच पोलिसांनी हॉस्पिटल गाठून तपास सुरू केला. तपासाची चक्रे फिरली आणि मुलीच्या वयाची कागदपत्रे समोर आली, तेव्हा पोलीसही चक्रावून गेले. प्रसूती झालेल्या 'त्या' मातेचे वय आजच्या घडीला अवघे 17 वर्षे 27 दिवस होते. म्हणजेच कायदेशीररीत्या ती अजूनही पूर्णपणे अल्पवयीन आहे. रुग्णालय प्रशासनाकडून माहिती मिळताच बालविकास प्रकल्प अधिकारी आणि पोलिसांनी याबाबत माहिती घेतली. पोलिसी खाक्या दाखवताच या बालविवाहाचा माग लागला. पीडित मुलगी 16 वर्षांची (अल्पवयीन) आहे, हे माहीत असूनही, तिच्या आई-वडिलांनी आणि नातेवाईकांनी कायद्याला केराची टोपली दाखवली होती.

## ज्ञानवर्धिनीच्या शालेय सुविधांसाठी संस्था आर्थिक सहाय्य करेल - सुमतीलाल कोठारी

(स. गांवकरी)




ज्ञानवर्धिनी प्राथमिक शाळा व बालकमंदिर येथे नव्याने बसविण्यात आलेल्या पेवर ब्लॉक कामाचे लोकार्पण उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. डॉ. सी. पी. देशपांडे (बाबा) यांच्या स्मरणार्थ हा उपक्रम राबविण्यात आला असून यासाठी सन्माननीय डॉ. सुधाताई देशपांडे यांच्या अर्थिक सहकार्यातून पेवर ब्लॉक चे मोठे काम पूर्ण झाले. पेवर ब्लॉक कामाचे लोकार्पण हिंद सेवा मंडळाचे कार्याध्यक्ष सुमतीलाल कोठारी व कार्यकारिणी सदस्या प्रा . ज्योतीताई कुलकर्णी यांच्या शुभहस्ते करण्यात आले. शालेय परिसरातील विद्यार्थी, शिक्षक व पालकांच्या सोयीसाठी करण्यात आलेल्या या कामामुळे परिसराचे सौंदर्य वाढण्यासोबतच स्वच्छता व सुरक्षिततेच्या दृष्टीनेही मोठा लाभ होणार असल्याचे मान्यवरांनी यावेळी सांगितले. शाळा भरतांना व सुटतांना पालकांना ऊन पाऊस असतांना उभे रहावे लागे त्यांच्यासाठी एक उत्तम शेड बनविण्यात आली आहे. समारंभात बोलताना प्रा. ज्योतीताई कुलकर्णी यांनी, “सामाजीक भान व कर्तव्य भावनेने दान करत रहावे, शिक्षकांनी आपले कार्य मनापासून करावे हेच त्यांचे पुण्य आहे. शिक्षकाची आदर्श प्रतिमा विद्यार्थ्यांच्या मनात कायम राहते. आधुनिक शिक्षणतत्त्वांची जोड देत आदर्श समाज घडविण्यात शिक्षकांची भूमिका महत्त्वपूर्ण आहे,” असे प्रतिपादन केले. यावेळी शाळा व्यवस्थापनाच्या वतीने डॉ. सुधाताई देशपांडे यांचा विशेष सन्मान करण्यात आला. तसेच हिंद सेवा मंडळाचे नवनिर्वाचित कार्याध्यक्ष मा. सुमतीलालजी कोठारी यांचा अकोले विभागातर्फे सत्कार करण्यात आला.त्यावेळी सत्कारास उत्तर देतांना ज्ञानवर्धिनी शाळेचा दर्जा गुणवत्ता व पालकांचा विश्वास यासाठी हिंद सेवा मंडळ नेहमी खंबीरपणे साथ देत अर्थिक सहकार्य करेल . सर्वसामान्यांच्या मुलांना दर्जेदार शिक्षण आणि गुणवत्तेसाठी संस्था काहीही कमी पडू देणार नाही. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मॉडर्न हायस्कूलचे चेअरमन मोरेश्वर धर्माधिकारी होते. याप्रसंगी कार्यकारी सदस्य दिलीपभाई शहा, ज्युनिअर कॉलेजचे चेअरमन बाळासाहेब वडजे, प्राथमिक विभागाच्या चेअरमन स्मिता मुंदडा, बालकमंदिर चेअरमन रामेश्वर रासने, हिंद सेवा मंडळाचे सहाय्यक सचिव योगेश देशमुख, सुरेखा धर्माधिकारी मॅडम, पुष्पा वाणी मॅडम, पत्रकार अमोल वैद्य, मा.प्रा. संतोष कचरे, पर्यवेक्षक सुधीर जोशी सर, दैवज्ञ रावसाहेब यांच्यासह शिक्षक, पालक व ग्रामस्थानी या उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त करून सहकार्यकर्त्यांचे आभार मानले.

कार्यक्रमाचे प्रास्तविक व स्वागत मुख्याध्यापक रावसाहेब नवले यांनी केले .अध्यक्षीय सूचन बाळासाहेब मांडे यांनी तर अनुमोदन सोनाली मालवणकर यांनी दिले .सूत्रसंचलन दत्ताभाऊ पोपेरे यांनी केले.

योगेश नवले यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाचा समारोप राज्गीताने झाला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# थोडक्यात पण महत्वाचे



## मतदार यादी पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत बीएलओ यांना साहित्य किट वाटप

शिवनेरी (स. गांवकरी) : तहसिल कार्यालय जुन्नर निवडणूक शाखा यांनी गुरुवार दि. ४ रोजी भारतीय निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार आगामी काळात राबवल्या जाणाऱ्या 'मतदार याद्यांचा विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम'२०२६ अंतर्गत सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. १९५ जुन्नर विधानसभा मतदार संघात तहसिल कार्यालय जुन्नर येथे मतदान नोंदणी अधिकार पल्लवी घाडगे व सहाय्यक मतदान नोंदणी अधिकारी तथा तहसीलदार बाळासाहेब शिरसट यांच्या मार्गदर्शनानुसार प्रभारी निवडणूक नायब तहसीलदार दीपक मडके यांच्या प्रमुख उपस्थिती कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी संजय उंडे,शिवाजी जाधव,नितीन लांडे,विशाल उतळे हे मतदान केंद्रस्तरीय अधिकारी बी एल ओ किट यांना वाटप करण्यात आले. किटमधील मुख्य लेखन साहित्य , ओळखपत्र लेस , पेन, रजिस्टर, फोल्डर फाईल, हायलायटर आणि साहित्यासाठी विशेष बॅग सह आवश्यक किट अधिकृत वाटप करण्यात आले. या साहित्य वाटप प्रसंगी निवडणूक विभागातील पुंडलिक सुपे ,विवेक डुंबरे, अभिषेक सुतार,विशाल वायाळ, सिद्धार्थ गावतुरे , स्वप्नील दप्तरे हे कर्मचारी उपस्थित होते.

## तालुकाध्यक्षपदी हेमंत डुंबरे यांची पुन्हा निवड

खोडद (स. गांवकरी) : राष्ट्रीय मानवाधिकार सुरक्षा संघ, जुन्नरच्या तालुकाध्यक्षपदी हेमंत वसंतराव पाटील डुंबरे यांची सलग चौथ्यांदा निवड करण्यात आली आहे. समाजहितासाठी केलेले सातत्यपूर्ण कार्य, सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी घेतलेली भूमिका आणि विविध सामाजिक उपक्रमांतील सक्रिय सहभाग याची दखल घेत ही निवड करण्यात आल्याची माहिती संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी दिली. हेमंत डुंबरे यांनी अनेक वर्षांपासून सामाजिक क्षेत्रात कार्य करत नागरिकांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले आहेत. अलीकडेच ओतूर परिसरातील रस्त्यांच्या खड्ड्यांमुळे झालेल्या अपघातानंतर, त्यांनी रस्त्यांची त्वरित दुरुस्ती न झाल्यास आंदोलन करण्याचा इशारा दिला होता. त्यांनी महावितरणच्या मनमानी कारभाराचा निषेध करत नागरिकांना होणाऱ्या त्रासाबाबत आवाज उठवला होता.त्यांच्या कार्यशैलीमुळे नागरिकांमध्ये विश्वास निर्माण झाला असून, त्यांनी यापूर्वीची तीनही कार्यकाळ यशस्वीरीत्या पूर्ण केले आहेत. सलग चौथ्यांदा तालुकाध्यक्षपदी निवड झाल्याने कार्यकर्ते व समर्थकांमध्ये आनंदाचे वातावरण असून, विविध स्तरांतून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.



## सेवानिवृत्त मुख्याध्यापक औटी यांचे निधन

शिवनेरी (स. गांवकरी) : जुन्नर नगर पालिका डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यालयाचे सेवानिवृत्त मुख्याध्यापक सावळेराम महादू औटी वय ७६ यांचे आज बुधवार ता.०४ रोजी पहाटे अल्पशा आजाराने निधन झाले. जुन्नर नगर परिषदेने त्यांचा आदर्श शिक्षक म्हणून गौरव केला होता. येथील जुन्नर तालुका प्राथमिक शिक्षक पतसंस्थेचे सभापती म्हणून त्यांनी काम पाहिले. शिक्षक संघटनेत महत्वाची पदे सांभाळली .कुकडी नदी तीरावर भास्कर घाट येथे अंत्यसंस्कार करण्यात आले . यावेळी बहुसंख्येने माजी विद्यार्थी व विविध क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित राहून श्रद्धांजली वाहिली. त्यांच्या मागे एक मुलगा,मुलगी,पुतणे,नातवंडे असा परिवार आहे. राहुल औटी त्यांचे पुत्र होत.

## BMW कारमधून स्टंटबाजी करणारा सुरतचा तरुण पोलिसांच्या ताब्यात



डांग, गुजरात (स. गांवकरी) : निसर्गसौंदर्य आणि शांत वातावरणासाठी प्रसिद्ध असलेला डांग जिल्हा गेल्या काही काळापासून समाजविघातक प्रवृत्ती आणि धोकादायक स्टंटबाजीच्या घटनांमुळे चर्चेत आला आहे. पर्यटनस्थळे आणि सार्वजनिक रस्त्यांवर बेफाम वाहन चालवून स्वतःसह इतरांच्या जीवितालाही धोका निर्माण करणाऱ्यांविरोधात डांग पोलिसांनी कठोर भूमिका घेतली आहे. अलीकडेच वघई–सापुतारा घाटरस्त्यावर एका आलिशान BMW कारमधून करण्यात आलेल्या धोकादायक स्टंटबाजीचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. या प्रकरणाची दखल घेत डांग पोलिसांनी अवघ्या काही तासांत कारवाई केली. मिळालेल्या माहितीनुसार, वघईहून सापुताऱ्याकडे जाणाऱ्या मार्गावरील बारीपाडा गावाजवळील एका मोकळ्या मैदानात BMW कार (क्रमांक GJ 05 JK 9036) वापरून सार्वजनिक सुरक्षेला धोका निर्माण होईल अशा प्रकारे स्टंटबाजी करण्यात आली होती. हा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होताच डांग जिल्हा वाहतूक पोलिसांनी तातडीने तपास सुरू केला. वाहतूक शाखेचे हेड कॉन्स्टेबल विजयसिंह सरवैया आणि त्यांच्या पथकाने व्हिडिओच्या आधारे तांत्रिक तपास करून वाहनाची माहिती मिळवली. तपासाचा धागा सुरतपर्यंत पोहोचला आणि पथकाने २० वर्षीय रुद्र रावल याचा शोध घेऊन त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. या प्रकरणाचा पुढील सखोल तपास करण्यासाठी संपूर्ण मामला सापुतारा पोलीस ठाण्याकडे सोपविण्यात आला आहे. सोशल मीडियावर प्रसिद्धी मिळवण्यासाठी सार्वजनिक ठिकाणी, पर्यटनस्थळांवर किंवा रस्त्यांवर कायद्याचे उल्लंघन करून स्टंटबाजी करणाऱ्यांसाठी ही कारवाई कठोर इशारा मानली जात आहे. नागरिकांच्या सुरक्षेशी खेळ करणाऱ्यांविरुद्ध कोणतीही तडजोड केली जाणार नसल्याचे डांग पोलिसांनी स्पष्ट केले आहे. डांग वाहतूक पोलिसांनी दाखवलेली तत्परता आणि अल्पावधीत केलेली प्रभावी कारवाई सध्या जिल्हाभर कौतुकाचा विषय ठरत आहे.

## पोटदुखीचे कारण सांगून POCSO प्रकरणातील आरोपी फरार

डांग, गुजरात (स. गांवकरी) : डांग जिल्ह्याच्या मुख्यालय असलेल्या आहवा येथील उपकारागृहातून POCSO आणि खुनासारख्या गंभीर गुन्ह्यांतील दोन आरोपी कारागृह प्रशासनाच्या निष्काळजीपणाचा फायदा घेत फरार झाल्याने संपूर्ण पोलीस यंत्रणेत खळबळ उडाली आहे. या घटनेमुळे कारागृहाच्या सुरक्षा व्यवस्थेवर आणि रक्षकांच्या सतर्कतेवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, गुरुवारी रात्री आहवा उपकारागृहात धक्कादायक घटना घडली. कारागृहात बंद असलेल्या POCSO प्रकरणातील आरोपी गिरीश बागुले याने अचानक तीव्र पोटदुखी होत असल्याचे सांगून जेलगार्डकडून बॅरेकचे कुलूप उघडून घेतले. या संधीचा फायदा घेत त्याच्यासोबत खुनाच्या गुन्ह्यातील आरोपी विजय धूम हाही बॅरेकमधून बाहेर आला.

# विश्व हिंदू परिषदेच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

### प्रस्तावित मंदिर इनामी जमीन हक्क निर्मूलन कायदा तात्काळ मागे घेण्यात येण्याची मागणी

अहिल्यानगर : (स. गांवकरी)



प्रस्तावित मंदिर इनामी जमीन हक्क निर्मूलन कायद्यामुळे मंदिरांच्या आर्थिक स्रोतांवर गंभीर परिणाम होऊन अनेक धार्मिक आणि सामाजिक उपक्रम बंद पडण्याचा धोका निर्माण झाला आहे.हा कायदा हिंदू देवस्थानांच्या बाबतीतच हस्तक्षेप करणारा असून धार्मिक समतेच्या तत्त्वालाही बाधा पोहोचवणारा आहे.संविधानाने दिलेल्या धार्मिक स्वातंत्र्य आणि धार्मिक संस्थांच्या व्यवस्थापनाच्या अधिकारांवर हा कायदा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे मर्यादा आणणारा आहे.

प्रस्तावित मंदिर इनामी जमीन हक्क निर्मूलन कायदा तात्काळ व संपूर्णतः रद्द करण्यात यावा.या मागणीचे निवेदन अहिल्यानगर जिल्ह्यातील मंदिर,विश्वस्त, पुजारी यांच्या वतीने विश्व हिंदू परिषदेचे मंदिर एवंम अर्चक पुरोहित आयामाच्यावतीने निवासी जिल्हाधिकारी श्री.गिते यांना देण्यात आले आहे. याप्रसंगी विश्व हिंदू परिषद मंदिर एवंम पुरोहित आयामाचे विभाग टोळी सदस्य गजेंद्र सोनवणे, जिल्हाप्रमुख श्रीकांत नांदापूरकर,विश्व हिंदू परिषदेचे जिल्हा परिषदेचे जिल्हा प्रसिद्धी प्रमुख अमोल भांबरकर, तुळजाभवानी माता देवीच्या पलंगाचे मानकरी गणेश पलंगे,श्री.राजापुरे, गोशाळेचे गौतम कराळे,अरुण खिची, दिनेश परदेशी,श्री.दुधाले आदी उपस्थित होते.

या निवेदनात असे नमुद केले आहे की,प्रस्तावित मंदिर इनामी जमीन हक्क निर्मूलन कायदा तात्काळ रद्द करावा.तसेच, सनातन आणि प्रस्थापित हिंदू कायदा यांचे अनुषंगाने देवस्थान जमिनींवर झालेले अतिक्रमण तत् काळ काढून टाकून सदरील जमिनी देवस्थान कडे तत्काळ वर्ग करून एकंदरीतच देवस्थान जमिनीच्या संरक्षण,व्यवस्थापन आणि संवर्धनासाठी तज्ञ समिती नियुक्त करून व्यापक अभ्यासानंतर उपरोक्त उद्देश पूर्ती साठी कायद्याचे प्रारूप तयार करण्याची मागणी केली आहे.

राज्यातील सर्व प्रमुख देवस्थानांचे प्रतिनिधी, धर्माचार्य, कायदेतज्ञ, महसूल तज्ञ आणि सामाजिक संस्थांचा समावेश असलेली स्वतंत्र तज्ञ समिती नियुक्त करण्यात यावी.मंदिरांच्या धार्मिक, सामाजिक आणि आर्थिक हितांचा सखोल अभ्यास करून नवीन प्रारूप तयार करण्यात यावे.कोणताही निर्णय घेण्यापूर्वी राज्यभरातील देवस्थान,अर्चक,पुजारी आणि हिंदू समाजाशी व्यापक चर्चा करण्यात यावी.

# भाजप तालुकाध्यक्ष रमेश थोरात यांचा सामाजिक उपक्रम

कनाशी : (स. गांवकरी)

- सुरगाणा येथे स्वीकृत नगरसेवक थोरात यांचा वाढदिवस उत्साहात

सुरगाना येथील स्वीकृत नगरसेवक व भाजपचे तालुकाध्यक्ष रमेश थोरात यांचा वाढदिवस आज विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा करण्यात आला. वाढदिवसाच्या निमित्ताने थोरात यांनी शहरातील विविध ठिकाणी वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. रमेश थोरात यांनी सकाळी सुरगाणा नगरपंचायत परिसर, शासकीय विश्रामगृह, शाळा व सार्वजनिक ठिकाणी कार्यकर्त्यांसह वड, पिंपळ, कडुलिंब, चिंच अशा देशी वृक्षांची लागवड केली. “वाढदिवस केक कापून साजरा करण्यापेक्षा झाडे लावून साजरा केला तर पुढच्या पिढीला चांगले वातावरण मिळेल,” अशी भावना यावेळी थोरात यांनी व्यक्त केली. वाढदिवसानिमित्त भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते व मित्रपरिवाराने थोरात यांना शुभेच्छा दिल्या. सुरगाणा शहरासह तालुक्यातील विविध गावांत त्यांच्या समर्थकांनी वृक्षारोपण, रक्तदान शिबिर व गरजूंना अन्नदान असे उपक्रम राबवले. सुरगाणा नगरपंचायतीच्या आवारात झालेल्या कार्यक्रमात थोरात यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना रमेश थोरात म्हणाले, “पक्षाने माझ्यावर तालुकाध्यक्षपदाची जबाबदारी टाकली आहे. स्वीकृत नगरसेवक म्हणूनही काम करत आहे. जनतेच्या प्रेमामुळेच मी इथवर पोहोचलो. वाढदिवसाच्या निमित्ताने समाजाचे काहीतरी देणे लागतो, या भावनेतून वृक्षारोपण केले. सुरगाणा तालुक्याचा सर्वांगीण विकास हेच माझे ध्येय आहे.

# टोमॅटो व्यवस्थापनासाठी शास्त्रीय पद्धतींचा अवलंब करा : गोरे

खोडद : (स. गांवकरी)

नारायणगाव परिसरातील शेतकऱ्यांसाठी आयोजित मार्गदर्शन कार्यक्रमात टोमॅटो पिकाचे शास्त्रीय व्यवस्थापन, रोग व कीड नियंत्रण, उन्हाळी हंगामात येणाऱ्या विविध अडचणींवर मात करण्याचे उपाय, मल्चिंग पेपरचे फायदे, उत्पादन वाढीसाठी आवश्यक आधुनिक तंत्रांचा वापर , तसेच पाणी व्यवस्थापन याविषयी सविस्तर माहिती देण्यात आली. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून टोमॅटोचे उत्पादन वाढविता येते आणि उत्पादन खर्च कमी करून अधिक आर्थिक लाभ मिळविता येतो, असे प्रतिपादन फार्म डीएसएसचे संस्थापक बी.टी. गोरे यांनी केले. वारूळवाडी येथे जय मल्हार कृषी सेवा केंद्राचे संचालक नितीन भुजबळ यांच्या पुढाकारातून शेतकऱ्यांसाठी मोफत शेतकरी मेळावा तसेच पिक पाहणी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात



आले. यावेळी कृषी तज्ज्ञ बी.टी .गोरे यांनी उपस्थित शेतकऱ्यांना विविध पिकांचे व्यवस्थापन, आधुनिक शेती तंत्रज्ञान आणि उत्पादनवाढीसाठी आवश्यक उपाययोजनांबाबत मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला परिसरातील शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घेतला.

# करंदी गाव "बालविवाह मुक्त करण्याचा ठाम निर्धार!

- 'स्नेहालय'च्या उडान प्रकल्पाचा पुढाकार

पारनेर : (स. गांवकरी)



बालविवाहासारख्या अनिष्ट प्रथेचे समाजातून समूळ उच्चाटन करण्यासाठी आणि बालकांचे हक्क सुरक्षित ठेवण्यासाठी पारनेर तालुक्यातील आदर्श करंदी गावाने 'बालविवाह मुक्त गाव' करण्याचा ठाम निर्धार केला आहे. या अनुषंगाने जनजागृती करण्यासाठी स्नेहालय संस्था संचलित 'उडान' प्रकल्पाच्या वतीने करंदी गावाला सदिच्छा भेट देण्यात आली. यावेळी आयोजित विशेष बैठकीत गावाला बालविवाह मुक्त करण्यासाठी ग्रामस्थ आणि प्रशासनाने एकत्र येऊन काम करण्याचा संकल्प सोडला.

या महत्त्वपूर्ण बैठकीला स्नेहालय संचलित उडान प्रकल्पाचे व्यवस्थापक प्रवीण कदम, करंदी गावच्या लोकनियुक्त सरपंच नंदा भास्कर गव्हाणे, ग्रामपंचायत अधिकारी ओल्विन शेक्सपिअर उपसरपंच अर्जुन ठाणगे, तंटामुक्ती अध्यक्ष राधुजी ठाणगे, मळगंगा देवस्थानचे अध्यक्ष शिवाजी ठाणगे आणि उपाध्यक्ष जिजाभाऊ थोरात प्रामुख्याने उपस्थित होते. याशिवाय भास्कर गव्हाणे, स्नेहआधारचे शाहिद शेख, समन्वयक पूजा दहातोंडे, सामाजिक कार्यकर्ते शशिकांत शिंदे, भगवान गायकवाड, श्रीधर गांगड, पांडुरंग ठाणगे, भाऊसाहेब गांगड, पाटीलबा ठाणगे, गणेश चौधरी, भूषण थोरात, पांडुरंग पिंपरकर, अलका केदार, सोनाली चौधरी, ललिता पिंपरकर, लता ठाणगे, सिंधूबाई ठाणगे, भाऊ गाडेकर, कारभारी रोकडे, महिला सी.आर.पी. एकविरे, विमल चौधरी, दीपा ठाणगे, विमल क्षीरसागर, माधुरी औटी, दीपाली थोरात, सुभद्रा क्षीरसागर, अंगणवाडी सेविका गोरे, शेख, मनिषा चौधरी, ज्योती उघडे, सविता ठाणगे आदींसह महिला व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीत उडान प्रकल्पाचे व्यवस्थापक प्रवीण कदम यांनी उपस्थितांना 'बालविवाह प्रतिबंधक अभियान' अंतर्गत सुरू असलेल्या कामांची सविस्तर माहिती दिली. त्यांनी बालकांसाठी अस्तित्वात असलेले कायदे, त्यांचे हक्क आणि बालकांचे अधिकार संरक्षित करणे किती गरजेचे आहे, यावर अभ्यासपूर्ण मार्गदर्शन केले. बालविवाहामुळे मुलींच्या शिक्षणावर आणि आरोग्यावर होणाऱ्या गंभीर दुष्परिणामांची जाणीव त्यांनी करून दिली. तसेच बालविवाह पीडित बालकांना तातडीने काळजी, संरक्षण आणि पुनर्वसनाच्या संधी मिळवून देणे हे संपूर्ण समाजाचे कर्तव्य असल्याचे त्यांनी सांगितले. अहिल्यानगर जिल्हा बालविवाह मुक्त करून, 'बालविवाह मुक्त भारत' घडवण्याची प्रेरणा संपूर्ण देशात निर्माण करणे हे या अभियानाचे मुख्य उद्दिष्ट आहे. यासाठी देशातील अन्य संस्था आणि कार्यकर्त्यांचे प्रशिक्षण व संघटन केले जात आहे," असे प्रतिपादन प्रवीण कदम यांनी केले. करंदी ग्रामपंचायतीच्या वतीने सरपंच नंदा गव्हाणे आणि उपस्थित ग्रामस्थांनी या मोहिमेला पूर्ण पाठिंबा दर्शवला. गावपातळीवर बालविवाहाबाबत कोणतीही तडजोड न करता, प्रत्येक बालकाला शिक्षणाचा हक्क मिळवून देत करंदी गाव संपूर्ण राज्यासाठी आदर्श बनवू, असा विश्वास यावेळी ग्रामस्थांनी व्यक्त केला.

# खरीप हंगाम नियोजन शेतकरी मार्गदर्शन शिबिर उत्साहात

पारनेर : (स. गांवकरी)




खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेती अधिक फायद्याची व शाश्वत करण्यासाठी, तसेच शासकीय योजनांचा लाभ शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी कासारे (ता. पारनेर) येथे विशेष बैठक व मार्गदर्शन शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. नंदनवन संस्था (पुणे), संजीवनी ग्रामविकास समिती आणि ग्रामपंचायत कासारे यांच्या संयुक्त विद्यमाने, तसेच शिवशंभो, सावता महाराज, खंडेश्वर व सह्याद्री शेतकरी बचत गटांच्या विशेष सहकार्याने हा कार्यक्रम अत्यंत उत्साहात पार पडला.

जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा सामूहिक संकल्प करण्यात आला. 'पर्यावरण संवर्धन आणि आधुनिक शेती हाच आपला ध्यास' हे ब्रीद समोर ठेवून कासारे गावाने शाश्वत शेतीकडे पाऊल टाकले आहे. या कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून तालुका कृषी अधिकारी गजानन घुले आणि कृषी अधिकारी आशिष दिवटे,याखुब शेख, सर -सिजेंठा, किरण लाळगे,थॉमस पडघळमल, ,उपस्थित होते. तालुका कृषी अधिकारी गजानन घुले यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना सांगितले की, खरीप हंगामाच्या तोंडावर आधुनिक बियाणे व योग्य वाणाची निवड करणे अत्यंत गरजेचे आहे. तसेच मल्चिंग आणि ठिबक सिंचन यांसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून पाण्याचे व शेतीचे चोख नियोजन कसे करावे, याचे सविस्तर मार्गदर्शन त्यांनी शेतकऱ्यांना केले.

या बैठकीत प्रामुख्याने शाश्वत शेतीला चालना देणाऱ्या गांडूळ बेड प्रकल्प आणि बायोगॅस प्रकल्पाच्या लाभार्थी निवडीबाबत सखोल चर्चा करण्यात आली. जे शेतकरी या नवीन प्रकल्पात सहभाग घेऊन लाभ घेण्यास इच्छुक आहेत, अशा अनेक शेतकरी बांधवांची या बैठकीच्या ठिकाणीच नाव नोंदणी करण्यात आली. या प्रसंगी देवराम नवले, सोपान शिंदे यांच्यासह कासारे गावचे उपक्रमशील सरपंच शिवाजी निमसे आणि उपसरपंच शैला घनवट प्रामुख्याने उपस्थित होते. सरपंच निमसे यांनी गावातील विविध शेतकरी बचत गटांच्या या संयुक्त उपक्रमाचे विशेष कौतुक केले.

या महत्वपूर्ण मार्गदर्शन शिबिराला आणि बैठकीला गावातील प्रमुख ग्रामस्थ व शेतकरी सचिन निमसे, नारायण निमसे, गोरक्षा घनवट, दादा निमसे, गोकुळ निमसे, आदित्य निमसे, सुनीत निमसे, तुकाराम साळवे, उत्तम साळवे आणि देवराम घनवट उपस्थित होते. तसेच महिला बचत गटांच्या सदस्या व महिला भगिनी मीरा निमसे, अलका निमसे, कल्पना निमसे, गौतमी साळवे, रोहनी पाणमंद, रोहनी निमसे, जानवी साळवे आणि वैष्णवी निमसे यांच्यासह कासारे गावातील शेतकरी बांधव, विविध शेतकरी गटांचे सदस्य आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जलसंधारण कामाला हातभार; खोलीकरण प्रगतीपथावर

टाकळी ढोकेश्वर : (स. गांवकरी)

आम्ही टाकळीकर ग्रामविकास प्रतिष्ठानने नाम फाऊंडेशन व विविध संस्थांच्या सहभागातून सुरू केलेल्या जलसंधारण कामाच्या दुसऱ्या टप्प्याचे काम प्रगतीपथावर असून सध्या निवडुंगेवाडी तलावाचे खोलीकरण सुरू आहे. पावसाळ्यापर्यंत हे काम सुरू राहणार असून स्थानिक धुमाळ वस्तीवरील तरुण, शेतकरी व ग्रामस्थ या अभियानात हितरीने सहभागी झाले आहेत. तन , मन व धनाने धुमाळ वस्ती या कामात सहभागी झाली असून या कामासाठी त्यांनी आज भरीव निधी आम्ही टाकळीकरच्या पदाधिकाऱ्याकडे सुपूर्त केला. तसेच यापुढेही या कामात सर्वोतपरी सहकार्य करण्याची हमी दिली.

यावेळी आम्ही टाकळीकर ग्रामविकास प्रतिष्ठानचे संस्थापक, ज्येष्ठ पत्रकार चाँद शेख, विश्वस्त संदीप कोरडे, स्थानिक समन्वयक संतोष सोनवळे, प्रताप खिलारी, ग्रामपंचायत सदस्य दत्तात्रय निवडुंगे, आदिनाथ पायमोडे, मळगंगा तरुण मित्र मंडळाचे कार्यकर्ते योगेश धुमाळ, अतुल धुमाळ, नितीन धुमाळ, संदीप बोऱ्हुडे, निलेश चव्हाण, शिवाजी कोरडे, अंकुश धुमाळ, पोपट धुमाळ आदी उपस्थित होते. या जलसंधारण कामास विविध स्तरातून मदत सुरु असून विविध क्षेत्रात कार्यरत गावातील भूमिपुत्र मदत करत आहेत. ज्या मुली लग्न करून सासरी गेल्या आहेत त्याही माहेरच्या ओढीतून या कामात हातभार लावत आहेत. एवढेच नव्हे तर चिमुकली मुले आपल्या खाऊचे पैसे या कामास देत आहेत. जेष्ठ नागरिक व सेवानिवृत्त कर्मचारी आपल्या परीने या अभियानात सहभागी होत आहेत व मदत करत आहेत.

# हेमंत रत्नपारखी लिखित मेहेरगाथाचे प्रकाशन

अहिल्यानगर: (स. गांवकरी)




अवतार मेहेरबाबा नगर केंद्रामध्ये हेमंत रत्नपारखी लिखित मेहेरगाथाचे प्रकाशन नगर सेंटरचे अध्यक्ष डॉ.मेहेरनाथ कलचुरी यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी सुमित रत्नपारखी,अनिकेत रत्नपारखी,विना रत्नपारखी, विद्या माने,प्रकाश माने,मोहन जुंद्रे,श्रीमंत माळी, स्वप्निल महामुनी,एड दारुणकर,राहुल मुळे,श्रुती मुळे,प्रशांत डाडर,नीलिमा औटी,माधुरी मिसाळ,एड निंबाळकर,जेनस जॉईन,झारा मलकी आदींसह मोठया संख्येने मेहेरप्रेमी उपस्थित होते. मेहेरनाथ कलचुरी यावेळी बोलताना म्हणाले हेमंत रत्नपारखी लिखित मेहेर गाथा हि काव्यात्मक रचना मराठीतील अवतार मेहेरबाबांच्या आध्यात्मिक कार्यावरील प्रथमच अशी रचना पाहण्यात आली आणि मनास अतिशय आनंद झाला. ह्या पदूय काव्यात्मक रचनेचे कौतुक करावे तितके थोडे आहे.अवतार मेहेरबाबांच्या जीवनातील अनेक प्रसंग, घटना आणि त्यांचे आध्यात्मिक कार्य आपण ओघावत्या शैलीत गुंफण्याचा जो कौतुकास्पद प्रयत्न केलेला आहे तो निश्चितच अभिनंदनीय आहे.हि पदय मेहेर गाथा निश्चितपणे अवतार मेहेरबाबांचे जे काही आध्यात्मिक साहित्य आज उपलब्ध आहे त्यात मोलाची भर टाकेल यात काही शंका नाही.त्याचप्रमाणे महाराष्ट्रातील तमाम मेहेरप्रेमींना देखील हे अनोखे साहित्य उपलब्ध होत आहे हि भुषणास्पद बाब होय. लेखक हेमंत रत्नपारखी म्हणाले मेहेर गाथा या ओवीबद्ध काव्यरचनेतून अवतार मेहेरबाबांचे जीवन, त्यांच्या जीवनात आलेले बरे वाईट प्रसंग, त्यांनी देश विदेशात केलेल्या अध्यात्मिक कार्याचा प्रचार व प्रसार, समस्त प्रेमी जनांना दिलेला संदेश, शिक्षणाविषयी असणारी आस्था व दूरदृष्टी, मौनात राहून संभाषण करण्याची पद्धत तसेच त्यांची सेवाभावी व परोपकारी वृत्ती आणि सर्वांपरी असणारी प्रेम भावना यांचे शब्द चित्रण ओवीबद्ध करण्याचा प्रयत्न माझ्या हातून झाला आहे.हे लेखन कार्य अवतार मेहेरबाबांनीच माझ्या कडून करवून घेतले आहे असे मनापासून वाटते.

ते पुढे म्हणाले मी मंगळवेढा येथे राहत असून सराफी व्यवसाय करत आहे.गेली अनेक वर्षे मेहेरबाबा चा भक्त आहे मला जे सुचले त्याप्रमाणे मी ओवीबद्ध केले, मी सर्व अवतार मेहेरबाबा प्रेमींना ही ओवीबद्ध काव्यरचना आवडेल अशी अपेक्षा व्यक्त करत ही'मेहेरगाथा' मेहेरबाबांच्या चरणी अर्पण करत आहे. यावेळी नगर सेंटरच्या वतीने भजने म्हणण्यात आली. कार्यक्रमाची सांगता मेहेरबाबाची आरती प्रार्थना व महाप्रसादाने झाली.